मे २०२४/पाने ६०/किंमत ₹१०

# लोकराज्य



## राजमाता पुण्यश्लोक

## अहिल्यादेवी होळकर

### त्रिशताब्दी जयंती वर्ष

(३१ मे १७२५ – १३ ऑगस्ट १७९५)




# राज्यगीत

जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा ।।धृ।।

भीती न आम्हा तुझी मुळी ही, गडगडणाऱ्या नभा
अस्मानाच्या सुलतानीला, जबाब देती जिभा
सह्याद्रीचा सिंह गर्जतो, शिव शंभू राजा
दरीदरीतून नाद गुंजला, महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा ।।१।।

काळ्या छातीवरी कोरली, अभिमानाची लेणी
पोलादी मनगटे खेळती, खेळ जीवघेणी
दारिद्र्याच्या उन्हात शिजला
निढळाच्या घामाने भिजला
देश गौरवासाठी झिजला
दिल्लीचेही तख्त राखितो, महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा ।।२।।

– कविवर्य राजा नीळकंठ बढे

(सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण १४२३/प्र.क्र.१२/ कार्या-३१ (राजशिष्टाचार) दि. १ फेब्रुवारी २०२३)

## सांस्कृतिक वारसा

६

सातव्या शतकापासून महाराष्ट्राविषयी परकीय प्रवाशांनी वर्णन केले आहे. महाराष्ट्राच्या राजकीय सीमा आजच्यासारख्या तेव्हा नसल्या, तरी मराठी भाषा ही खास या भूमीचीच उपज असल्याने मराठी भाषा बोलली जाते तो भाग महाराष्ट्राचाच, असे समजून चालायला हरकत नाही.

९

## पायाभूत सुविधांमध्ये अग्रेसर

पायाभूत सुविधा देशाच्या, राज्याच्या आर्थिक; तसेच सामाजिक विकासात महत्त्वाची भूमिका बजावतात. सर्वसाधारणपणे रस्ते, दळणवळणाच्या सुविधा आदींसाठी पायाभूत सुविधा ही संकल्पना वापरली जाते; परंतु प्रत्यक्षात ती व्यापक संकल्पना आहे. अनेक प्रकारच्या आर्थिक कार्यांचा त्यामध्ये समावेश होतो. पायाभूत सुविधा दोन प्रकारच्या असतात. भौतिक पायाभूत सुविधा आणि सामाजिक पायाभूत सुविधा. या सर्वांचा जेव्हा एकात्मिक विकास होतो, तेव्हा तो उद्योग व्यवसायांसाठी पूरक ठरतो. त्याही पुढे जाऊन सर्वसामान्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी उपयुक्त ठरतो.

## महाराष्ट्राची उत्तुंग झेप


१९

भारताच्या स्वातंत्र्यानंतर भाषिक राज्य निर्मितीची चळवळ महाराष्ट्रात व देशभर झाली. भाषावार प्रांत रचना होऊन महाराष्ट्र आणि गुजरात ही बॉम्बे स्टेटमधून स्वतंत्र राज्ये अस्तित्वात आली, हे आपण जाणतो. त्यातून महाराष्ट्र राज्य स्थापनेचा मंगलकलश घेऊन दिवंगत यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र हे नवे राज्य उदयाला आले. स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त १९६० ते २०२४ पर्यंतच्या महाराष्ट्र राज्याच्या प्रगतीचा आणि घवघवीत यशदायी अशा ६४ वर्षांच्या वाटचालीचा थोडक्यात आढावा..

३९

## सांस्कृतिक पुनरुज्जीवन

मातृभूमीसाठी जीवन समर्पित करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांमध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव अग्रक्रमाने येते. अखंड हिंदुस्थानात आपल्या दातृत्वाने त्या अजरामर झाल्या आहेत.



लोकमाता, राजमाता, वीरांगना, पुण्यश्लोक, देवी, गंगाजल निर्मळ, मातोश्री अशा शब्दांतून त्यांच्याविषयीचा आदर आजही जनमानसात दिसतो. अहिल्यादेवी या धर्मशील होत्या. या धर्मशीलतेमागे त्यांची मोठी तपस्या होती. त्यांनी भारतात हिंदू धर्म आणि संस्कृतीचा जीर्णोद्धार केला.

## डिजिटल क्रांतीची बदलती क्षितिजे

५१

भारताचे आर्थिक सामर्थ्य आणि तंत्रज्ञानात्मक कल्पकता यांचा संगम असलेला महाराष्ट्र डिजिटल प्रगतीमध्ये सातत्याने आघाडीवर आहे. मुंबई हे आर्थिक केंद्र, तर पुणे हे आयटी हब असलेल्या या राज्यात एक टेक्नॉलॉजी इकोसिस्टिम विकसित केली आहे. राज्यामध्ये भक्कम पायाभूत सुविधा, पुरोगामी धोरणे असल्यामुळे भारताच्या तंत्रज्ञानाधारित विस्तारात राज्याने अग्रस्थान पटकावले आहे.

५३

## शेतीपूरक व्यवसाय : धिंगरी अळिंबी

मशरूम ही बुरशी गटातील वनस्पती आहे. मशरूमला मराठीत ‘अळिंबी’ असे म्हणतात. पावसाळ्यात निसर्गात ही वनस्पती आपल्याला आढळते. ग्रामीण भागात कुत्र्याची छत्री, भूछत्र, धिंगरी या नावाने ओळखली जाते, मशरूमचे उत्पादन घेण्यासाठी कमी जागा व कमी पाणी लागते आणि मशरूमची मागणी ही भारतासह पूर्ण जगामध्ये मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे जगभरामध्ये मशरूमचे व्यापारी तत्त्वावर मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतले जाते.


| | |
|---|---|
| सांस्कृतिक वारसा | ६ |
| पायाभूत सुविधांमध्ये अग्रेसर | ९ |
| महाराष्ट्राच्या भवितव्याची सफर | १२ |
| लढा मराठी अस्मितेचा... | १४ |
| सुधारकांची भूमी | १७ |
| महाराष्ट्राची उत्तुंग झेप | १९ |
| लोकशाही आणि मराठी साहित्य | २६ |
| ।। वारी एक आनंदयात्रा ।। | ३० |
| लोकमातेची जीवनगाथा | ३५ |
| पुण्यश्लोक अहिल्यादेवी आणि सुशासन | ३६ |
| सामाजिक परिवर्तन | ३८ |
| सांस्कृतिक पुनरुज्जीवन | ३९ |
| राजयोगिनी | ४१ |
| कार्यक्षम राज्यकर्ती अहिल्यादेवी होळकर | ४३ |
| संत महात्मा बसवेश्वर | ४५ |
| छत्रपती संभाजी महाराज | ४७ |
| विज्ञाननिष्ठ स्वातंत्र्यवीर सावरकर | ४९ |
| डिजिटल क्रांतीची बदलती क्षितिजे | ५१ |
| शेतीपूरक व्यवसाय : धिंगरी अळिंबी | ५३ |
| पाटगावच्या मधाचा जगभर गोडवा... | ५६ |

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०

वर्ष ७५ वे | अंक ५ | मे २०२४

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

- मुख्य संपादक — ब्रिजेश सिंह
- प्रबंध संपादक — हेमराज बागुल, डॉ. राहुल तिडके
- संपादक — दयानंद कांबळे
- सहसंपादक — अश्विनी पुजारी, पवन राठोड, गजानन पाटील
- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर, सुशिम कांबळे
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — भाग्यश्री पेठकर
- मुद्रण — मे. क्वार्टरफोल्ड प्रिंटेबिलिटीज, तळोजा एमआयडीसी, नवी मुंबई.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
E-mail : lokrajya2011@gmail.com

**ई - लोकराज्य** http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमत असेलच असे नाही.

# देशातील सर्वोत्तम संचालनालय होण्याचा बहुमान

एनसीसीमध्ये विद्यार्थ्यांवर देशभक्ती, शिस्त व समाजसेवेचे संस्कार घडतात. सर्वांकरिता एनसीसी प्रशिक्षण अनिवार्य झाले, तर ती खरोखरच चांगली गोष्ट होईल, असे प्रतिपादन राज्यपाल रमेश बैस यांनी केले.

राष्ट्रीय छात्र सेनेच्या (एनसीसी) महाराष्ट्र संचालनालयाला 'सर्वोत्कृष्ट संचालनालय' ठरल्याबद्दल राज्यपाल बैस यांच्या हस्ते राजभवन येथे 'राज्यपालांचे प्रशस्तिपत्र' समारंभपूर्वक प्रदान करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. राजभवनातील दरबार हॉल येथे झालेल्या 'प्रशस्तिपत्र प्रदान सोहळ्यात' राज्यपालांच्या हस्ते महाराष्ट्र एनसीसी संचालनालयाचे अतिरिक्त महासंचालक मेजर जनरल योगेंदर सिंह यांना प्रशस्तिपत्र देण्यात आले.




आपण स्वतः एनसीसी कॅडेट होतो, असे नमूद करून देशातील शाळा; तसेच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये शिस्तीचे महत्त्व बाणवले, तर देश अतिशय वेगाने प्रगती करेल, असे राज्यपालांनी सांगितले.

महाराष्ट्र एनसीसी संचालनालयाने आजपर्यंत २३ वेळा प्रधानमंत्र्यांचे ध्वजनिशाण जिंकले; तसेच आठ वेळा महाराष्ट्र संचालनालय उपविजेते ठरले आहे, याबद्दल राज्यपालांनी राज्यातील एनसीसीच्या सर्व अधिकारी व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये एनसीसी कार्यरत असून एकूण १.१७ लाख कॅडेट्स कार्यरत आहेत. पुढील १० वर्षांत कॅडेट्सची राज्यातील संख्या १.८५ लाख इतकी वाढवली जाणार आहे, हे कौतुकास्पद आहे. एनसीसी प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी निवडलेल्या क्षेत्रात काम करताना राष्ट्रहिताला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे आवाहन राज्यपालांनी विद्यार्थ्यांना केले.

या सोहळ्याला भारतीय सैन्य दलातील वरिष्ठ अधिकारी, शासनाचे अधिकारी, विद्यापीठांचे कुलगुरू; तसेच विविध महाविद्यालयांमधील एनसीसीचे कॅडेट्स उपस्थित होते. यावेळी एनसीसीच्या चमूने सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला.

# लोककल्याणकारी राज्य

*बहु असोत सुंदर संपन्न की महा,*
*प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा...*

महाराष्ट्र राज्याचे हे वर्णन सार्थ ठरणारे आहे. राज्याला लाभलेला प्रचंड लांबीचा समुद्रकिनारा, विशाल सह्याद्रीच्या रांगा डोळ्यांचे पारणे फेडतात. महाराष्ट्र राज्याची भूमी ही संतांची, कवींची, लेखकांची, वीरांची आहे. या भूमीतच छत्रपती शिवाजी महाराज होऊन गेले. रयतेचे राज्य ही संकल्पना प्रत्यक्षात आणणारे आदर्श राज्यकारभाराचे उदाहरण त्यांनीच घालून दिले. महात्मा जोतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या थोर समाजसुधारकांनी इथल्या समाजाची जडणघडण केली, समतेचा संदेश दिला. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत एकनाथ, संत नामदेव इत्यादी संतांच्या शिकवणीनुसार महाराष्ट्र वाटचाल करत आहे. त्यांच्या जोडीला पंढरीचा विठोबा भक्कमपणे उभा आहे. संतांच्या सामाजिक सलोख्याच्या शिकवणीमुळे राज्य शक्तिशाली बनले आहे.

महाराष्ट्राची निर्मिती १ मे १९६० रोजी झाली, हे आपण सर्वजण जाणतोच. त्यासाठी राज्यातील १०५ हुतात्म्यांनी हौतात्म्य पत्करले आणि मराठी माणसाला एकरूपी स्वराज्यच मिळवून दिले, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

महाराष्ट्र राज्य निर्मितीनंतर देशाच्या तुलनेत राज्याने अनेक क्षेत्रात आघाडी घेण्यास सुरुवात केली. याकाळात प्रामुख्याने कृषी, औद्योगिक, रोजगार, शिक्षण, आरोग्य, सहकार अशा विविध क्षेत्रांत प्रगतीचे शिखर गाठण्यास सुरुवात झाली. राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्यासह आजवरच्या मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राने देशपातळीवर आपला वेगळा ठसा उमटवला आहे. राज्याच्या निर्मितीपासून ते आतापर्यंतच्या प्रगतीचा थोडक्यात आढावा या अंकात घेण्यात आला आहे.

भारताच्या विकासाचे 'ग्रोथ इंजिन' म्हणून महाराष्ट्राची ओळख आहे. महाराष्ट्राच्या निर्मितीपासून आजपर्यंत आपले राज्य सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, औद्योगिक क्षेत्रात अग्रेसर राहिले आहे. महाराष्ट्र शासनाच्या लोककल्याणकारी ध्येय-धोरणांचा, निर्णयांचा आजपर्यंत राष्ट्रीय स्तरावर अवलंब केला गेला आहे, ही मराठी माणसांसाठी अभिमानाची बाब आहे.

### राजमातेस विन्रम अभिवादन

राजमाता अहिल्यादेवी होळकर हे नाव एक अतिशय दानशूर, कर्तृत्ववान, धर्मपरायण व कार्यक्षम राज्यकर्ती म्हणून मराठ्यांच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिले गेले आहे. अहिल्यादेवी होळकर या एक चाणाक्ष आणि सुधारणावादी राज्यकर्ती होत्या. मातृभूमीसाठी जीवन समर्पित करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांमध्ये राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचे नाव अग्रक्रमाने येते. अखंड हिंदुस्थानात आपल्या दातृत्वाने त्या अजरामर झाल्या आहेत.

लोकमाता, राजमाता, वीरांगना, पुण्यश्लोक, देवी, गंगाजल निर्मळ, मातोश्री अशा शब्दांतून त्यांच्याविषयीचा आदर आजही जनमानसात दिसतो. अहिल्यादेवी या धर्मशील होत्या. पूर्वीच्या कायद्यांमध्ये त्यांनी परिस्थितीनुसार काही सुधारणा केल्या. करपद्धती सौम्य केली. पाटील-कुळकर्ण्यांच्या वतन हक्कांचे संरक्षण करून गावोगावी न्याय देणारे पंच अधिकारी नेमले. अहिल्यादेवी होळकर यांचा राज्यव्यवहार हा लोकाभिमुख होता. त्यांचे राज्य हे लोककल्याणकारी राज्य होते. अहिल्यादेवींचा ग्रंथसंग्रह मोठा व दुर्मीळ होता. त्यात निर्णयसिंधू, द्रोणपर्व, ज्ञानेश्वरी, मथुरा माहात्म्य, मुहूर्त चिंतामणी, वाल्मिकी रामायण, पद्मपुराण, श्रावणमास माहात्म्य इत्यादी ग्रंथांच्या हस्तलिखित प्रती होत्या. त्यांचे हे त्रिशताब्दी जयंती वर्ष साजरे होत आहे, या निमित्ताने या अंकात त्यांच्या कार्याचा परिचय करून देणाऱ्या प्रेरणादायी लेखांचा समावेश करून 'लोकराज्य'ने त्यांना अभिवादन केले आहे.

छत्रपती संभाजी महाराज, संत महात्मा बसवेश्वर आणि स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या गौरवशाली व प्रेरणादायी जीवनकार्याचा आढावाही या अंकात घेण्यात आला आहे. हा अंक वाचकांना संग्रहित करण्यासाठी उपयुक्त ठरेल, अशी आशा आहे.

**ब्रिजेश सिंह**
(मुख्य संपादक)

**सातव्या शतकापासून महाराष्ट्राविषयी परकीय प्रवाशांनी वर्णन केले आहे. महाराष्ट्राच्या राजकीय सीमा आजच्यासारख्या तेव्हा नसल्या, तरी मराठी भाषा ही खास या भूमीचीच उपज असल्याने मराठी भाषा बोलली जाते तो भाग महाराष्ट्राचाच असे समजून चालायला हरकत नाही. अन्य प्रांतांशी भाषिक-सांस्कृतिक आदानप्रदान झाले असले, तरी घेतलेल्या सांस्कृतिक व भाषिक बाबी महाराष्ट्राने आपल्या साच्यात बसवून स्वीकारल्या आहेत.**

# सांस्कृतिक वारसा

**संजय सोनवणी**

जसे माणसाला एक व्यक्तिमत्त्व असते, तसेच व्यक्तिमत्त्व राज्य आणि राष्ट्राचेही असते. आपण महाराष्ट्राचे रहिवासी आहोत. मराठी माणूस म्हणून आपली ठळक वैशिष्ट्ये आहेत. ही वैशिष्ट्ये आपण परकीय वा परराज्यातल्या लोकांच्या दृष्टिकोनातून पाहिली तर आपले व्यक्तिमत्त्व काय आहे, याचा अंदाज येऊ शकेल. कारण अनेकदा आपल्यालाच आपले व्यक्तिमत्त्व उलगडलेले नसते.

एकाच ढाच्यातल्या व्यक्तींसोबत राहताना आपणा सर्वांचे मिळून काय व्यक्तित्त्व बनले आहे, याची सहसा जाणीव होत नाही; पण परराज्यातल्या किंवा विदेशी व्यक्तींना मात्र हे सामूहिक वेगळेपण सहज जाणवू शकते.

## चीनी प्रवाशाकडून वर्णन

युवान श्वांग हा चीनी प्रवासी सातव्या शतकात महाराष्ट्रात आला होता. त्याने तेलंगणातून महाराष्ट्रात प्रवेश केला होता. या प्रवासाच्या दरम्यान त्याने जे अनुभवले व पाहिले ते त्याने लिहून ठेवले. तो म्हणतो, येथील लोक स्वभावाने साधे आणि प्रामाणिक आहेत. शरीरयष्टी (चीनी लोकांच्या तुलनेत) उंच असून ते शिस्तप्रिय आणि अन्यायाविरुद्ध चटकन पेटून उठणारे आहेत. चांगल्याशी चांगूलपणाने वागतात, वाईट वागणाऱ्याची खोड जिरवतात. त्यांचा कोणी अपमान केला तर स्वतःच्या प्राणांची पर्वा न करता प्रतिशोध घेतात. येथील माणसांना अध्ययनाची आवड आहे. ते रूढीनुसार चालत आलेल्या आणि धार्मिक अशा दोन्ही प्रकारच्या पुस्तकांचा अभ्यास करतात. आणि तत्कालीन राजकीय परिस्थितीबद्दल तो म्हणतो की, सद्यपरिस्थितीत, महाराज शिलादित्य (हर्षवर्धन) यांनी पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत (पंजाबपासून-बंगालपर्यंत) संपूर्ण प्रदेशावर ताबा मिळवला आहे. अगदी दुर्गम भागही सोडले नाहीत. फक्त या महाराष्ट्र देशातील लोकांनीच हर्षवर्धनापुढे शरणागती पत्करलेली नाही. यांचा बिमोड करायला, महाराज हर्षवर्धनांनी पाचही नद्यांच्या प्रदेशांतून सैन्य गोळा केले आहे.

देशोदेशीच्या उत्तम योद्ध्यांना बोलावणे पाठवले आहे. स्वतः सैन्याचे नेतृत्त्व पत्करले आहे; पण इतके सगळे करूनही, अजून तरी महाराष्ट्राच्या सैन्याने हत्यारे टाकलेली नाहीत.

## जैन मुनींकडून वर्णन

परकीय प्रवाशाने केलेले हे सध्या उपलब्ध असलेले सर्वात जुने महाराष्ट्री समाजाचे वर्णन. हे वर्णन परिपूर्ण असेल असे नाही; पण महाराष्ट्राचे जे व्यक्तिमत्त्व त्याच्या डोळ्यात भरले ते त्याने लिहून ठेवले. आठव्या शतकात उद्योतन सुरी या परराज्यातील जैन मुनींनीही महाराष्ट्राचे थोडक्यात वर्णन केले आहे. तो कुवलयमाला या मरहठ्ठी प्राकृत काव्यात म्हणतो,

*दढमह सामलंगे सहिरे अहिमाण कलहसीले य ।*
*दिन्नले गहिल्ले उल्लविरे तत्थ मरहट्टे ।।*

म्हणजे बळकट, ठेंगण्या, धटमुट, काळ्यासावळ्या रंगाच्या ‘दिले, घेतले’ असे बोलणाऱ्या मऱ्हाट माणसाला त्याने पाहिले.

## अरबी प्रवाशाकडून वर्णन

दहाव्या शतकात अल मसुदी नामक एक अरबी प्रवासी भारतात आला होता व त्याने चौल, कल्याण या कोकण किनारपट्टीवरील बंदरांना भेट दिली होती. तत्कालीन कोकणातील काही विचित्र चाली-रीतीबद्दलही त्याने लिहिलेले आहे. राजा वा कोणी धनिक मेल्यानंतर त्याचे जवळचे मित्रही स्वत:ला समारंभपूर्वक जाळून घेत असल्याच्या विचित्र प्रथेबाबतही त्याने लिहिले आहे. तो झंझ राजाच्या कारकिर्दीत चेउल येथे आला होता. चेउल बंदरावर हजारो बैलांवर माल लादून आणला जात होता व पुढे व्यापारासाठी जहाजे भरून पाठवली जात असल्याचा आणि कोकणातील अनेक विद्वानांना भेटी दिल्याचा उल्लेखही तो करतो.

## रशियन प्रवाशाकडून वर्णन

पंधराव्या शतकात अफानासी निकितीन हा रशियन प्रवासी भारतभेटीच्या दरम्यान चेउल व जुन्नर येथे आला होता. आपल्या वृत्तांतात त्याने तेथील लोकजीवनाचे उत्तम वर्णन केले आहे. ही झाली परकी प्रवाशांची निरीक्षणे. सातवे शतक ते पंधरावे शतक या काळात येऊन गेलेल्या प्रवाशांच्या वर्णनात भिन्नता वाटली, तरी मराठी माणूस संघर्षशील, प्रेमळ आणि स्वातंत्र्यप्रिय आहे. शत्रुत्व केले तर तो टोकाला जाऊ शकतो. त्याची भाषा राकट आहे, असे सांस्कृतिक व्यक्तिमत्त्व-विशेष आपण सहज नोंदवू शकतो आणि विचार केला तर कोणाही मराठी माणसाला ते सहज पटेल; पण ही झाली परकीय लोकांची निरीक्षणे.

## भौगोलिक ओळख

कोणत्याही प्रदेशाचे भूशास्त्रीय वैशिष्ट्य आगळेवेगळे असते हे तर आपण सारे जाणतो. स्थानिक भूगर्भीय स्वरूपावरून त्या भागात राहणाऱ्या लोकांची एकुणातील मानसिकता बनते आणि हीच मानसिकता भाषा व वर्तनाच्या रूपातून अभिव्यक्त होते. या अभिव्यक्तीलाच आपण संस्कृती म्हणतो. ज्वालामुखीच्या उद्रेकांनी कोट्यवधी वर्षांपूर्वी सह्याद्रीच्या पर्वत रांगा आणि लाव्हारसापासून बेसाल्ट खडकाचे पठार पसरले ते पार चंद्रपूरपर्यंत विरळ होत जात वेगळ्याच प्रकारच्या खडकांनी बनले व तेलंगणा, छत्तीसगढ राज्यात प्रबळ होत गेले. 'राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा।' ही ओळख महाराष्ट्राला मिळाली ती अशी. या भौगोलिक स्थितीमुळे महाराष्ट्राचे स्वाभाविकपणे पाच भाग पडले. कोकण, घाट, खानदेश, मराठवाडा व विदर्भ असे हे ढोबळमानाने पाच भाग आहेत. महाराष्ट्र तसा कोकण आणि विदर्भ वगळता निमपावसाळी प्रदेश आहे. अर्थात नेहमीच ही स्थिती नव्हती. महाराष्ट्राचे पुरापर्यावरण पाहिले तर याच भूमीवर एके काळी महाराष्ट्रात पाणथळ जमिनी मोठ्या प्रमाणावर होत्या व पाणघोड्यासारख्या पाण्यातच हुंदडणाऱ्या अनेक प्रजाती येथे निवास करत होत्या, हे कोणाला सांगूनही खरे वाटणार नाही. प्राचीन हिमयुगात येथे हिमनद्याही होत्या याचे पुरावे मिळालेले आहेत. सर्व्हे ऑफ इंडियाच्या फ्रांसिस फेडन यांना चंद्रपूरजवळील इरई नदीच्या काठी फारसबंदी दगडांवर हिमनदीच्या घर्षणाच्या खुणा आढळलेल्या आहेत. त्यावरून महाराष्ट्रातही एके काळे हिमनद्या होत्या, या अंदाजाला पुष्टी मिळालेली आहे. पुढे ही स्थिती बदलली. इ.स.पू. १८०० च्या दरम्यान कोरडे सत्र सुरू झाले आणि महाराष्ट्र दुष्काळी परिसरात मोडू लागला. तुरळक मानवी वस्ती नद्यांच्या खोऱ्यात विस्थापित झाली. जगण्याचे मार्ग बदलले. जंगले जाऊन माळराने मोठ्या प्रमाणावर तयार झाली. लोक मेंढपाळी ते गोपालन, पक्षीपालन याकडे वळाले. महाराष्ट्राचे दुसरे सांस्कृतिक व्यक्तिमत्त्व या काळात तयार होऊ लागले. पशुपालक भटके असल्याने त्यांची मनोवृत्तीही संघर्षशील आणि खुल्या आभाळाखाली राहावे लागल्याने व्यापक बनली. पुढे याच पशुपालकांनी स्थानिक सत्ताही निर्माण केल्या. आपापल्या दैवतश्रद्धा आणि धर्मश्रद्धा जतन केल्या. खंडोबा, विठोबा, बिरोबा, जोतिबा, मायाक्का, मरीआई, जोखाई, अंबाबाई यांसारख्या बा आणि आई पदांत मातृ-पितृ देवता ही महाराष्ट्राची खरी ओळख. यांची उत्पत्तीच मुळात मराठी श्रद्धायुक्त मानसिकतेचे प्रतीक म्हणून झाली. त्यात पूर्वज पूजेचाही भाग होताच. महाराष्ट्राच्या राजकीय सीमा आजच्यासारख्या तेव्हा नसल्या तरी मराठी भाषा ही खास या भूमीचीच उपज असल्याने मराठी भाषा बोलली जाते तो भाग महाराष्ट्राचाच असे समजून चालायला हरकत नाही. अन्य प्रांतांशी भाषिक-सांस्कृतिक आदानप्रदान झाले असले तरी घेतलेल्या सांस्कृतिक व भाषिक बाबी महाराष्ट्राने आपल्या साच्यात बसवून स्वीकारल्या.

### पहिला स्वातंत्र्यदिन

आजचा महाराष्ट्र राजकीयदृष्ट्या एका छत्राखाली आणला तो सातवाहनांनी. महाराष्ट्र शकांच्या तावडीत सापडला तेव्हा गौतमीपुत्र सातवाहनाने इ.स. ७८ मध्ये नाशिकजवळ शक क्षत्रप नहपानाचा पराजय करून त्याची हत्या केली आणि महाराष्ट्राला स्वातंत्र्य मिळवून दिले. हा महाराष्ट्राचा पहिला स्वातंत्र्यदिन आपण आजही 'गुढीपाडवा' म्हणून साजरा करतो. शक संवाताची सुरुवातही तेव्हापासून सुरू झालेली. जेथे जेथे सातवाहनांचे साम्राज्य होते, तेवढ्या भागातच गुढीपाडवा हा दिवस नववर्षाचा दिवस म्हणून साजरा होतो, अन्यत्र नाही. हा सण सातवाहनांची देणगी आहे व ती अस्सल मराठी आहे.



सातवाहनांपूर्वीचा राजकीय इतिहास आपल्याला आज माहीत नसला तरी या पाचही भागांवर कोणत्या ना कोणत्या स्थानिक सत्ता होत्या. सम्राट चंद्रगुप्त किंवा अशोकाने या भागाला कागदोपत्री मांडलिक बनवले असले तरी शासक मात्र स्थानिकच असले पाहिजेत, हे अनुमान आपण काढू शकतो कारण भारतीय सम्राटांची ही पूर्वापार रीत आहे. उत्तरेतील साम्राज्ये नष्ट झाल्यानंतर मात्र महाराष्ट्रात सातवाहनांचा उदय झाला. माहाराष्ट्री प्राकृताला राजभाषेचे स्थान मिळाले. महाराष्ट्रात बौद्ध आणि जैन धर्मांचेही प्राबल्य वाढू लागले. पहिल्या शतकाच्या आसपास वैदिक धर्माचाही महाराष्ट्रात प्रवेश झाला. परंपरागत लोकधर्म असलेल्या हिंदू धर्माने या धर्मांपासून अनेक गोष्टी घेतल्या तसेच दिल्याही. महाराष्ट्रात बेसाल्ट खडकामुळे महाराष्ट्राची ओळख बनलेली लेणी खोदायला सातवाहन काळातच सुरुवात झाली. डोंगरी किल्ले बांधायची सुरुवातही याच काळातील. सातवाहनांनी व्यापाराला महत्त्व दिल्याने नगरांची संख्या जशी वाढली तसेच चेउल, कल्याणसारखी बंदरेही तयार करण्यात आली. 'पेरिक्लिज ऑफ अरिथ्रीयन सी' या एका ग्रीक लॉगबुकमध्ये ही बंदरे भरभराटीला आल्याची वर्णने जशी मिळतात, तशीच पैठण, जुन्नर, कल्याणसारख्या व्यापार व निर्मिती केंद्रांचीही माहिती मिळते. हाल सातवाहनाने गाथा सप्तशतीमध्ये दरबारी व ग्रामीण कवी-कवयित्रींच्या काव्यरचना गोळा करून ७०० गाथांचा संग्रह सिद्ध केला जो जागतिक वाङ्मयात स्थान प्राप्त करून बसला आहे. मरहठ्ठी प्राकृत भाषेला साहित्यिक माहात्म्य याच काळात मिळाले.

## सातवाहनांचे मोलाचे कार्य

सातवाहनांनी गुजरात, मध्यप्रदेश, आंध्र व कर्नाटकपर्यंत साम्राज्याचा विस्तार केला. या काळात महाराष्ट्र वैभवाच्या शिखरावर पोहोचला. केवळ सातवाहनांमुळे कुशाण आक्रमक विंध्य पर्वत ओलांडून दक्षिणेत घुसू शकले नाही. संपूर्ण दक्षिण भारत त्यांच्यामुळे सुरक्षित राहिला. एवढेच नव्हे तर मराठी भाषा व संस्कृती वाढवण्याचे, घडवण्याचे मोलाचे कार्य सातवाहन करू शकले, याचे कारण इ.स.पू २२० ते इ.स २३० अशी ४५० वर्ष टिकलेली त्यांची सत्ता. महाराष्ट्राला एक राष्ट्रीय महत्त्व मिळाले ते या काळात. महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख निर्माण झाली तीही या काळात. माहाराष्ट्री प्राकृत ही देशातील श्रेष्ठ प्राकृत मानली जाऊ लागली व अन्य प्राकृत भाषिकही मराठीलाच प्राधान्य देऊ लागले तेही याच काळात. पहिल्या शतकात, म्हणजे सातवाहनकाळात रामाच्या जीवनावरील आद्य महाकाव्य लिहिले ते विमल सुरी या जैन मुनींनी तेही माहाराष्ट्री प्राकृतात. वाल्मिकीचे रामायण तिसऱ्या ते पाचव्या शतकात लिहिले गेले. मराठी माणसाला

या गोष्टीचा अभिमान वाटला पाहिजे. थोडक्यात या काळात महाराष्ट्राचे व्यक्तिमत्त्व अत्यंत प्रखर बुद्धिवैभव, वीरवैभव आणि ऐहिक सौख्यात प्रबळ बनलेले होते आणि तोच मराठी व्यक्तित्वाचा एक भाग बनून राहिला. महाराष्ट्राची धार्मिक परंपरा स्वतंत्र असून दैवतश्रद्धाही स्वतंत्र आहेत. त्यावर उत्तर अथवा दक्षिणेचा विशेष प्रभाव किमान दहाव्या शतकापर्यंत नव्हता. वि. का. राजवाडे वगैरे विद्वान लिहितात तसे आर्यांचे येथे आगमन होऊन येथील समाजसंस्कृतीवर लक्षणीय फरक पडला या मतात ऐतिहासिकदृष्ट्या कसलेही तथ्य नाही. कारण येथील राजकीय सत्ता नेहमीच महाराष्ट्री लोकांच्या हातात होती. अगदी उत्तरेतील मौर्य ते दक्षिणेतील राष्ट्रकुट, होयसळ, चालुक्यांसारख्या राजवटींनी महाराष्ट्रावर सत्ता स्थापित केली असली तरी ती प्रत्यक्षात राबवली गेली ती येथील मांडलिक सत्तांच्या मार्फत. यादव घराणेही आधी राष्ट्रकुटांचे मांडलिकच होते. त्यामुळे यादवांचे सुरुवातीचे शिलालेखही दक्षिणी भाषेतील आहेत. त्यामुळे यादव घराणे दक्षिणेतील असावे, असे समज निर्माण झाले होते; पण ते मूळचे सिन्नर येथीलच हे आता ऐतिहासिकदृष्ट्या सिद्ध झाले आहे. पाचव्या भिल्लम यादवाने कलचुरीचा पराभव करून सार्वभौमत्त्व घोषित करून राज्याभिषेक करून घेतला. कोकणात शिलाहार वंशाची सत्ता होती. हे सारे महाराष्ट्रीय उत्पत्तीचे राजे होते. कोणते राजघराणे मूळचे कोठले याची चर्चा अनेक इतिहासकार करतात व ही राजघराणी उत्तरेतून अथवा दक्षिणेतून आली असे दाखवायचा प्रयत्न करत असतात; पण असे करणे निष्फळ आणि अनैतिहासिक आहे.

दहाव्या शतकानंतर महाराष्ट्रात अनेक सांस्कृतिक व आर्थिक घडामोडी घडल्या. सन १०२२ पासून प्रलयंकारी दुष्काळांचे सत्र सुरू झाले. सन १०२२, १०३३ व १०५२ असे सलग तीन भीषण राष्ट्रव्यापी दुष्काळ भारतात पडल्याची नोंद आहे. महाराष्ट्र मुळात निमपावसाळी भूभाग असल्याने या दुष्काळाचा फटका महाराष्ट्रालाही बसणे स्वाभाविक होते. या दुष्काळाने अन्न-पाण्याच्या शोधात फार मोठ्या प्रमाणावर विस्थापन तर झालेच; परंतु लक्षावधी माणसे व जनावरे मरण पावली. मुख्य उत्पादन अन्नधान्याचे...तेही पुरते ठप्प झाले. मोठ्या प्रमाणात पशुसंहार झाल्याने धनगर-गोपालही अवनतीला पोहोचले. अन्य उत्पादनांची मागणीही अर्थातच पुरती घटली. अन्न विकत घ्यायला पैसा नाही, पैसे असले तरी अन्न उपलब्ध नाही तेथे अन्य उत्पादनांना कोण विचारतो? त्यामुळे उत्पादन केंद्रेही ओस पडणे स्वाभाविक होते. त्यामुळे देवशरण प्रवृत्तीचा महाराष्ट्री लोकांत अधिक शिरकाव झाला. सामाजिक अपप्रवृत्तीही वैदिक धर्माच्या संगतीमुळे वाढल्या. त्याविरोधातील संत चळवळीच्या उगमामागे हेही एक कारण आहे. संतांनी महाराष्ट्राची मनोभूमिका घडवण्यात मोठा हातभार लावला हे वास्तव अमान्य करता येत नाही.

## महाराष्ट्राचे महानायक

छत्रपती शिवाजी महाराज मात्र या भावभक्तीच्या लाटांपासून अलिप्त राहू शकले आणि म्हणूनच महाराष्ट्रावर पुन्हा एकदा स्वातंत्र्यसूर्य उगवला असे म्हणता येईल. छत्रपती शिवाजी महाराज हे सातवाहन साम्राज्यानंतर उदयास आलेले एक महान तेजस्वी व इतिहास घडवणारे व्यक्तिमत्त्व बनले ते त्यांच्या रयतेबाबतच्या उदार मानवतावादी भूमिकेमुळे आणि जिवावरची संकटे झेलत त्यांनी जुलुमी सत्तेच्या विरोधात उभ्या केलेल्या स्वातंत्र्य संग्रामामुळे. महाराष्ट्राचे ते महानायक ठरले हे त्यांच्या उत्तुंग कर्तृत्वामुळे.

पेशवाईचा उदय ही महाराष्ट्राच्या राजकारणातील एक अपरिहार्य घटना होती. या काळात मराठी सेनांनी उत्तर व दक्षिण भारत व्यापला. इंदोर, उज्जैन, धार इ. मराठी संस्थाने निर्माण झाली व दिल्लीच्या तख्तावर वर्चस्व गाजवायला सुरुवात झाली. मराठ्यांची शक्ती मध्ययुगात कळसाला पोहोचली, पण पेशव्यांना दुर्दैवाने आपल्या जिंकलेल्या प्रान्तांवर स्थिर प्रशासन स्थापित करता येणे शक्य झाले नाही. चौथाई वसूल करणे आणि सरळमार्गाने ती नाही मिळाली तर लढाया करणे हाच लष्करी सेनानींचा निरंतर उद्योग बनला. अर्थात देशभरातील अन्य सत्ताही तोच कित्ता गिरवत राहिल्याने ब्रिटिशांना मोकळे रान मिळाले. ते स्थानिक राजकारभारात हस्तक्षेप करू लागले. त्याची परिणती अशी झाली की, १८१८ साली पेशवाई बुडून इंग्रज शासन आले आणि देशभर पारतंत्र्याचा काळा कालखंड सुरू झाला. महाराष्ट्र आपले खरे व्यक्तिमत्त्व तोवर हरवून बसला होता. मुंबईचे बंदर व्यापारासाठी वापरायला सुरुवात झाली. स्वातंत्र्याचा लढा सुरू करण्यात मुंबईचा आणि म्हणूनच मराठी माणसाचा फार मोठा वाटा राहिलेला आहे.

महात्मा जोतिराव फुले या महान समाजसुधारकाने 'शेतकऱ्यांचा आसूड' व 'गुलामगिरी' हे ग्रंथ लिहून भारतीय अर्थविचारांचा पाया घातला. आणि हे कार्य पुढे नेले ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी. छत्रपती शाहू महाराजांनी समतेच्या चळवळीला कृतिशील नेतृत्व दिले. महाराष्ट्र अशा रीतीने बौद्धिक क्षेत्रातही देशाचे नेतृत्व करू शकला. इंग्रजांशी स्वातंत्र्याचा लढा देण्यासाठी महाराष्ट्राने जिवाचे रान केले. 'लाल-बाल-पाल' अशी एक घोषणा लोकमान्य टिळकांमुळे बनली. ते राष्ट्रीय काँग्रेसचे प्रभावशाली अध्यक्षही होते. महाराष्ट्राचा प्रभाव राष्ट्रीय राजकारणावर पडायला सुरुवात झाली. छत्रपती शिवाजी महाराज भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे एक आयडॉल बनले. इतके की, रवींद्रनाथ टागोरांनी त्यांच्यावर प्रदीर्घ कविताही लिहिली. महात्मा गांधीजींचा राष्ट्रीय पटलावर उदय झाला आणि महाराष्ट्र त्यांच्या निष्ठावंत अनुयायाच्या भूमिकेत गेला. साने गुरुजी, विनोबा भावे, अच्युतराव पटवर्धनांसारखे असंख्य वैचारिक नेते गांधीजींच्या प्रभावात निर्माण झाले आणि त्यांनी आपला स्वतंत्र ठसा उमटवला. महाराष्ट्रातील समाजजीवन यामुळे ढवळून निघाले. सामाजिक चळवळी घराघरात पोहोचू लागल्या. चळवळी आणि साहित्याने अन्यायप्रेरित समाजविचाराची दिशाच बदलली. पण आजही समाजजीवन स्थिर आहे असे नाही; पण आदर्शाकडे जाण्याची प्रवृत्ती मात्र मराठी माणसात विद्यमान आहे, कारण त्याला हजारो वर्षांच्या सांस्कृतिक अधिष्ठानाचा अमूल्य वारसा लाभलेला आहे.

महाराष्ट्राचा सांस्कृतिक आणि राजकीय इतिहास हा त्याच्या मराठीपणाचा जिवंत उद्गार आहे. त्यात चढउतार आलेले आहेत; पण मराठी माणूस कधी खचलेला दिसून येणार नाही. आपल्यातले वाईट हेरून त्याच्यावर मात करण्याचे एक नैसर्गिक सामर्थ्य त्याला लाभलेले आहे. भविष्यात महाराष्ट्र भारतीय परिप्रेक्ष्यात सांस्कृतिक नेतृत्व करेल, एवढी शक्ती त्याच्याच स्वतंत्र सांस्कृतिक वारशात आहे. मराठी माणूस दिक्कालावर मात करून आपल्या सांस्कृतिक महत्तेचा उद्घोष करत राहील, याची मला खात्री आहे.

**(लेखक हे इतिहास संशोधक आहेत.)**

**पायाभूत सुविधा देशाच्या, राज्याच्या आर्थिक; तसेच सामाजिक विकासात महत्त्वाची भूमिका बजावतात. सर्वसाधारणपणे रस्ते, दळणवळणाच्या सुविधा आदींसाठी पायाभूत सुविधा ही संकल्पना वापरली जाते, परंतु प्रत्यक्षात ती व्यापक संकल्पना आहे. अनेक प्रकारच्या आर्थिक कार्यांचा त्यामध्ये समावेश होतो. पायाभूत सुविधा दोन प्रकारच्या असतात. भौतिक पायाभूत सुविधा आणि सामाजिक पायाभूत सुविधा. भौतिक पायाभूत सुविधांमध्ये ऊर्जा, वाहतूक, दळणवळण, व्यापार, बँकिंग, विमा, इंटरनेट, पोस्ट अशा सुविधांचा समावेश होतो. सामाजिक पायाभूत सुविधांमध्ये शिक्षण, आरोग्य, पिण्याचे पाणी, सामाजिक सेवा, स्वच्छता या सुविधांचा समावेश होतो. या सर्वांचा जेव्हा एकात्मिक विकास होतो, तेव्हा तो उद्योग व्यवसायांसाठी पूरक ठरतो. त्याही पुढे जाऊन सर्वसामान्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी उपयुक्त ठरतो.**

# पायाभूत सुविधांमध्ये अग्रेसर

**डॉ. विजय चोरमारे**

केंद्र शासनाच्या आर्थिक व्यवहार विभागाने काही काळापूर्वी जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार सन १९९० नंतरच्या ३४ वर्षांत पायाभूत सुविधा निर्माण करण्यात महाराष्ट्र देशात अव्वल ठरला होता. मध्य प्रदेश दुसऱ्या स्थानावर, तर कर्नाटक पायाभूत सुविधा निर्माण करण्यात तिसऱ्या स्थानावर होता. राजस्थान चौथ्या स्थानावर, तर तामिळनाडू क्रमवारीत पाचव्या स्थानावर होता.



## विकासाचा समतोल

महाराष्ट्र आज प्रगत राज्य म्हणून उभे आहे, त्याचे निर्विवाद श्रेय या राज्याची मजबूत पायाभरणी करणाऱ्या यशवंतराव चव्हाण यांच्याकडे जाते. माणसाच्या जीवनाशी संबंधित असे कुठले क्षेत्र सांगता येत नाही की, जिथे यशवंतराव चव्हाण यांनी काम केले नाही. रस्त्यामध्ये खड्डे दर पावसाळ्यानंतर होत असतात आणि उन्हाळा सुरू झाला की, पाणीटंचाई व भारनियमन सुरू होते. यांसारख्या अनेक समस्यांचा पाढा आजही वाचता येईल तरीसुद्धा देशाच्या पातळीवर महाराष्ट्र सर्वच क्षेत्रांमध्ये आघाडीवरील राज्य म्हणून ओळखले जाते. यशवंतराव चव्हाण केवळ राजकारणी नव्हते, तर समाजसुधारकांचा वारसा पुढे चालवणारे राज्यकर्ते होते. त्यामुळे केवळ भौतिक पायाभूत सुविधा आणि मर्यादित अर्थाने सामाजिक पायाभूत सुविधांवर ते थांबले नाहीत. सामाजिक, सांस्कृतिक, कला क्षेत्राचीही नीट पायाभरणी होईल, याकडे त्यांनी लक्ष पुरवले. त्याअर्थाने सामाजिक पायाभूत सुविधांच्या कक्षा त्यांनी विस्तारल्या. यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राच्या कृषी व औद्योगिक विकासाचा समतोल पाया रचला. सहकाराचे जाळे विणले आणि ग्रामीण महाराष्ट्राला सहकारातून समृद्धीचा मंत्र दिला. शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या. आर्थिकदृष्ट्या मागास पालकांच्या मुलांसाठी ईबीसीची सवलत सुरू केली, त्यातून शिक्षणप्रसाराला चालना मिळाली. पंचायतराज व्यवस्था बळकट करून समाजातील शेवटच्या घटकाला लोकशाही व्यवस्थेतील त्याच्या ताकदीची जाणीव करून दिली.

## सिंचन प्रकल्पांची उभारणी

वसंतराव नाईक हे तब्बल ११ वर्षे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते.

त्यांच्याच काळात हरितक्रांती झाली. अन्नधान्याच्या बाबतीत महाराष्ट्र स्वयंपूर्ण करण्यासाठी त्यांनी महत्त्वाची पावले उचलली. धवलक्रांतीला चालना देऊन सामान्य शेतकऱ्यांच्या हातात चार पैसे येतील, यासाठी प्रयत्न केले. रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून दुष्काळी महाराष्ट्रालाच नव्हे, तर देशाला मोठी देणगी दिली. त्यांच्यानंतरच्या काळात शंकरराव चव्हाण यांनी शेतीच्या आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी कळकळीने प्रयत्न केले. दुष्काळी भागात पाणी पोहोचवले. पाटबंधारे मंत्री आणि मुख्यमंत्री असताना राज्यातील धरणांसाठी आर्थिक तरतूद केली. राज्यातील अनेक सिंचन प्रकल्पांच्या उभारणीत त्यांचा मोठा वाटा राहिला. वसंतदादा पाटील हे महाराष्ट्रातील कर्तृत्ववान मुख्यमंत्री. राज्यातील सहकार आणि शिक्षण क्षेत्राला निर्णायक वळण देण्यामध्ये त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. विनाअनुदानित शिक्षणाचे धोरण आणून वैद्यकीय, अभियांत्रिकी शिक्षणाचे दरवाजे सर्वसामान्यांच्या मुलांसाठी खुले केले. राज्याच्या औद्योगिक विकासाला चालना देण्यामध्येही वसंतदादा पाटील यांची भूमिका महत्त्वाची होती. त्याशिवाय त्यांनी झोपडपट्ट्यांच्या सुधारणेकडे लक्ष दिले. स्वतंत्र पर्यावरण विभाग स्थापन केला. मुलींसाठी प्रत्येक जिल्ह्यात वसतिगृहे आणि कृषी विद्यापीठांमध्ये 'कमवा आणि शिका' योजना सुरू केली. पाणी अडवा, पाणी जिरवा चळवळीचा सातत्याने पाठपुरावा केला.

## अनेक क्रांतिकारी निर्णय

यशवंतराव चव्हाण यांच्याप्रमाणेच व्यापक सामाजिक आकलन असलेले दुसरे मुख्यमंत्री म्हणजे शरद पवार. उत्तम व्यवस्थापन कौशल्य असलेले आधुनिक विचारांचे मुख्यमंत्री म्हणून पवारांचा उल्लेख करावा लागेल. औद्योगिक, शेती क्षेत्रात त्यांनी अनेक क्रांतिकारी निर्णय घेतले. फलोत्पादनाला चालना दिली. पीक पद्धतीत बदल करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रवृत्त केले. मुंबईतील वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स हे शरद पवार यांच्या संकल्पनेतून साकारले आहे. मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव दिले आणि नांदेड येथे स्वामी रामानंदतीर्थ विद्यापीठाची त्यांनी स्थापना केली. राज्य मराठी विकास संस्थेची स्थापना केली. कृषिपूरक उद्योगांना, कुक्कुटपालन, फलोद्योगाला उत्तेजन दिले. पाणलोट क्षेत्र विकास योजनेद्वारे पाण्याचे नियोजन करण्याचे धोरण आखले. महात्मा फुले विकास मंडळाची स्थापना केली, तसेच कृषिसिंचन आयोगाची स्थापना केली.

## मोफत शिक्षण

गतिमान कामकाजासाठी ओळखल्या जाणाऱ्या बॅरिस्टर ए. आर. अंतुले यांनी तळागाळातल्या घटकांच्या उत्थानासाठी संजय गांधी निराधार योजना सुरू केली. राज्यभर हुतात्मा स्मारकांची उभारणी केली. रत्नागिरी व छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) जिल्ह्यांचे विभाजन केले. कुलाबा जिल्ह्याचे नाव बदलून ते रायगड केले. अमरावती व नाशिक या दोन विभागांची निर्मिती केली. मानखुर्द-नवी मुंबई रेल्वे मार्गास मंजुरी दिली. त्यांच्यानंतर मुख्यमंत्रिपदावर आलेल्या बॅरिस्टर बाबासाहेब भोसले यांनी दहावीपर्यंत मुलींना मोफत शिक्षण देण्याचा निर्णय घेतला. अमरावती विद्यापीठाला परवानगी दिली. चंद्रपूर जिल्ह्याची निर्मिती, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) खंडपीठाची स्थापना हे निर्णय त्यांच्याच काळात झाले.

शिवाजीराव पाटील-निलंगेकर यांनी मराठवाड्यासाठी ४२ कलमी, विदर्भासाठी ३३ कलमी आणि कोकणासाठी ४० कलमी विकासाचा कार्यक्रम घोषित केला. पहिली ते बारावीपर्यंत मुलींना मोफत शिक्षण सुरू केले. तालुका पातळीपर्यंत एमआयडीसी स्थापन करण्याची योजना राबवली. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) खंडपीठाची मंजुरी व बांधकाम ही त्यांच्या कारकिर्दीतील महत्त्वाची कामे. सुधाकरराव नाईक यांच्या काळात महिला व बालकल्याण विभागाची स्थापना झाली. अल्पसंख्याक आयोग त्यांनीच स्थापन केला. चैत्यभूमीच्या नूतनीकरणाचे काम हाती घेतले. मनोहर जोशी यांच्या काळात कृष्णा खोरे विकास मंडळाची स्थापना झाली. त्यांच्या कारकिर्दीत मुंबईत उड्डाणपुलांचे जाळे निर्माण झाले. मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाचा प्रकल्प मार्गी लागला. झोपडपट्टीवासीयांना मोफत

## साखर उद्योगाचा विस्तार



विलासराव देशमुख यांच्या काळात मुंबई मेट्रोची सुरुवात झाली. त्यांनी दुर्गम भागात शाळा सुरू केल्या. मराठवाड्यात प्रत्येक जिल्ह्याचे मुख्यालय चौपदरी रस्त्यांनी जोडण्याचा निर्णय घेतला. गोदावरी आणि मांजरा नदीवर बंधारे बांधण्याची कामे हाती घेतल्याने मराठवाड्यात ऊसाचे क्षेत्र वाढून साखरेचा उद्योग विस्तारला. सुशीलकुमार शिंदे यांनी पाणीपुरवठ्यासाठी ग्रामीण भागात टँकर सेवा सुरू केली. वीजचोरी रोखण्याकरिता स्वतंत्र न्यायालये उघडली. अनुसूचित जातींसाठी एक आणि दुसरा बालहक्क आयोग स्थापन केला. हातमाग व यंत्रमाग मजुरांकरिता स्वतंत्र प्राधिकरण स्थापन केले. सोलापूर विद्यापीठाच्या स्थापनेचा निर्णय घेतला. अशोक चव्हाण यांच्या काळातच मराठी भाषेसाठीचा स्वतंत्र विभाग सुरू करण्याचा निर्णय झाला. मुंबई मोनोरेल प्रकल्पाचा प्रारंभही त्यांच्याच मुख्यमंत्रिपदाच्या कारकिर्दीत झाला. मराठवाड्याचे विभागीय आयुक्तालय लातूरहून नांदेडला नेण्याचा निर्णय त्यांनी घेतला.

घर योजना, धारावी झोपडपट्टीचे सुशोभीकरण, सुलभ स्वच्छतागृहांची उभारणी, क्रीडाप्रबोधिनींची स्थापना, मातोश्री वृद्धाश्रम अशा विविध योजना त्यांनी राबवल्या. नारायण राणे यांनी प्रशासकीय सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. जिजामाता महिला आधार योजना, बळीराजा संरक्षण योजना यांना चालना दिली. स्त्रियांमध्ये औद्योगिक शिक्षणाची आवड निर्माण करण्यासाठी औद्योगिक शिक्षण संस्थांमध्ये त्यांना शुल्कमाफी दिली. दुय्यम सेवा मंडळ स्थापन केले.

### विमानतळाला चालना

माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी नवी मुंबई येथील विमानतळाला चालना दिली. या विमानतळापुढे पर्यावरणदृष्ट्या अनेक अडचणी होत्या. विमान वाहतूक मंत्री प्रफुल्ल पटेल आणि केंद्रीय पर्यावरणमंत्री जयराम रमेश यांच्याकडे प्रयत्न करून त्यांनी संबंधित अडचणी दूर करून नवी मुंबई विमानतळाचा मार्ग मोकळा केला. मुंबईतील मोनो आणि मेट्रो प्रकल्पांना गती दिली. मेट्रो प्रकल्पाचे नाव मुंबई मेट्रो राहावे, यासाठी आग्रही राहिले.





### पायाभूत सुविधांचा विकास

महाराष्ट्रातल्या पायाभूत सुविधांचा विचार करताना राजधानी मुंबईतील प्रकल्पांचा प्राधान्याने विचार करावा लागतो. रस्त्यांचा विषय येतो, तेव्हा थोड्या कालावधीत खराब होणाऱ्या रस्त्यांचे चित्र सातत्याने समोर येत असते, परंतु रस्त्याचे काम किती उत्तम करता येते, याचे उदाहरण म्हणून मुंबईतील पूर्व मुक्त मार्गाचा (इस्टर्न फ्री वे) उल्लेख करावा लागेल. विलासराव देशमुख यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या कारकिर्दीत २००४ मध्ये या रस्त्याचे काम सुरू झाले आणि पृथ्वीराज चव्हाण यांच्या कारकिर्दीत २००८ मध्ये हा रस्ता वाहतुकीसाठी खुला झाला. दक्षिण मुंबईला थेट पूर्व उपनगरांशी जोडणारा हा रस्ता आहे. महाराष्ट्राच्या इतिहासात ज्या पायाभूत सुविधांची नावे घेण्याजोगी कामे झाली आहेत, त्यामध्ये या रस्त्याचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. खासगीकरणातून बांधलेले रस्ते भरमसाठ टोल वसूल करत असतात आणि दीड-दोन वर्षांतच खड्ड्यांचे साम्राज्य पसरते असा अनुभव असताना साडेसोळा किलोमीटरचा हा रस्ता १६ वर्षे खणखणीत आहे. पश्चिमेकडचा राजीव गांधी सागरी सेतू (सी लिंक) हासुद्धा अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प आहे. हा प्रकल्पसुद्धा अशोक चव्हाण मुख्यमंत्री असताना पूर्ण झालेला आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या कारकिर्दीतही महाराष्ट्रात अनेक पायाभूत सुविधा असणारे प्रकल्प मार्गी लागले. त्यामध्ये प्रामुख्याने मुंबई-नागपूर समृद्धी महामार्ग, मुंबई, पुणे, नागपूर, नवी मुंबईतील मेट्रो प्रकल्प आदींचा उल्लेख करावा लागेल. जलयुक्त शिवार हा त्यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या काळातील अत्यंत महत्त्वाकांक्षी कार्यक्रम होता. महाराष्ट्राला सातत्याने भेडसावणाऱ्या दुष्काळाच्या समस्येचा विचार करून त्यावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याच्या उद्देशाने त्यांनी हा कार्यक्रम राबवला. लोकांच्या आकांक्षा समजून घेण्याचे आणि या आकांक्षांना एका मोहिमेचे स्वरूप देण्याचे उदाहरण म्हणून या कार्यक्रमाकडे पाहता येते. पाच वर्षांचा सलग कार्यकाळ पूर्ण करणारे वसंतराव नाईक यांच्यानंतरचे दुसरे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांची नोंद झाली आहेच, परंतु त्यांचे कर्तृत्व केवळ कार्यकाळापुरते मर्यादित नाही. त्यांचा मुख्यमंत्रिपदाचा एकूण कार्यकाळ महाराष्ट्राला विकासाच्या महामार्गावर नेणारा ठरला. ज्ञानाधारित धोरणनिर्मितीसह लोककेंद्रित सर्वसमावेशक प्रशासन, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि गतिमान विकासाचा दृष्टिकोन ही त्यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या कार्यकाळाची वैशिष्ट्ये होती.

पायाभूत सुविधांच्या विकासाला कोविड काळात ब्रेक लागला, परंतु उद्धव ठाकरे यांनीही कोस्टल रोड, समृद्धी महामार्गासारखे प्रकल्प मार्गी लावण्याचे प्रयत्न केले. नंतर एकनाथ शिंदे यांच्या काळात पायाभूत सुविधांचा प्रवास अधिक सुसाटपणे निघाला. समृद्धी महामार्ग, अटल सेतू, शक्तिपीठ, वसई-विरार मल्टिमॉडेलर कॉरिडॉर, मुंबई-गोवा ग्रीनफिल्ड एक्सप्रेस वे अशा विविध प्रकल्पांची कामे प्रगतिपथावर असून ती मार्गी लावण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे.

पायाभूत सुविधा निर्माण करणे ही एक निरंतर प्रक्रिया असते. राज्याच्या नेतृत्वाला त्याकडे प्राधान्याने लक्ष द्यावे लागते. एका पक्षाच्या मुख्यमंत्र्यांनी सुरू केलेला प्रकल्प सरकार बदलले म्हणून थांबवता येत नाही. विकासकामातील निरंतरता राखावी लागते. त्यावर राज्याची विश्वासार्हता अवलंबून असते. महाराष्ट्राच्या आजवरच्या राज्यकर्त्यांनी पक्षीय आणि राजकीय मतभेदाच्या पलीकडे जाऊन विकासकामातील ही निरंतरता राखण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळेच महाराष्ट्राने देशातील अग्रेसर राज्य म्हणून ओळख टिकवली आहे.

**(लेखक हे ज्येष्ठ पत्रकार आहेत.)**

**महाराष्ट्राला गौरवशाली ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा लाभला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची निर्मिती केली. रयतेमध्ये स्वराज्य, स्वधर्म, भाषा व स्वसंस्कृतीविषयी जागृती घडवून आणली. त्यामुळे मराठी माणसात अस्मिता निर्माण झाली. ब्रिटिश काळात धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक जागृती होऊन राष्ट्रवाद वाढीस लागला. त्यातून राष्ट्रीयत्वाची भावना वाढीस लागली. महाराष्ट्रात मराठी भाषिक राज्याची मागणी करणारी संयुक्त महाराष्ट्र चळवळ १९४६ पासून सुरू झाली होती. अनेक स्थित्यंतरांतून या चळवळीची वाटचाल सुरू झाली आहे. यातून महाराष्ट्र राज्य मे १९६० रोजी भाषावार प्रांतरचनेच्या तत्त्वानुसार अस्तित्वात आले.**

# महाराष्ट्राच्या भवितव्याची सफर

**डॉ. अशोक चौसाळकर**

मे १९६० रोजी भारताचे प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते संयुक्त महाराष्ट्राचे उद्‌घाटन करण्यात आले. त्याचवेळी अहमदाबाद येथे भारताचे राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या हस्ते गुजरात राज्याचे उद्‌घाटन करण्यात आले. अशा प्रकारे १९५१-५२ पासून सुरू झालेल्या भाषावार प्रांत रचनेच्या चळवळीचा यशस्वी समारोप झाला. १ मे चे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे या दिवशी जगभराचे कामगार, कामगार - दिवस म्हणून कामगारांच्या बलिदानाचे स्मरण करतात. महाराष्ट्राच्या स्थापनेला १ मे रोजी ६४ वर्ष पूर्ण झाली असून महाराष्ट्र राज्याने ६५ व्या वर्षात प्रवेश केला आहे.

आजचा महाराष्ट्र हा पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाडा या तीन भागांचा मिळून बनलेला आहे; परंतु गेली अनेक शतके हे तीन विभाग एकमेकांपासून दुरावलेले होते. मराठेशाहीच्या काळात पश्चिम महाराष्ट्र आणि बरासचा विदर्भ एकत्र आलेला असला तरी मराठी भाषा आणि संस्कृती यांचे उगमस्थान असणारा मराठवाडा मात्र निजामाच्याच ताब्यात होता. इंग्रजांच्या कारकिर्दीत मराठवाडा हैद्राबाद संस्थानात समाविष्ट करण्यात आला. नागपूरच्या भोसल्यांचे राज्य खालसा केल्यानंतर तो भाग नव्याने निर्माण केलेल्या मध्य प्रांतास जोडण्यात आला आणि नागपूर त्या राज्याची राजधानी बनली. या तीनही भागांना एकत्र करण्यासाठी करण्यात आलेली चळवळ ही संयुक्त महाराष्ट्राची चळवळ होय. या चळवळीमध्ये १०५ लोकांना आपले प्राण अर्पण करावे लागले.




## नागपूर करार

विदर्भाचा प्रश्न यापेक्षा वेगळा होता. हा भाग मराठवाड्यापेक्षा जास्त सुधारलेला आणि आर्थिकदृष्ट्या त्यापेक्षा जास्त विकसित होता. नागपूर ही मध्यप्रांताची राजधानी होती व तिला मोठी प्रतिष्ठा होती. लोकमान्य टिळकांच्या काळापासून आणि स्वराज्य पक्षात विदर्भातील नेत्यांची मोठी भूमिका होती. महात्मा गांधी आणि विनोबा भावे यांचे आश्रम वर्धा येथे आहेत. त्यामुळे विदर्भाची मराठवाड्याप्रमाणे बिनशर्त महाराष्ट्रात येण्याची तयारी नव्हती. त्यासाठी पश्चिम महाराष्ट्रातील नेत्यांना विदर्भातील नेत्यांबरोबर प्रथम अकोला आणि नंतर नागपूर करार करावा लागला तरीही एक गट आग्रहाने स्वतंत्र विदर्भ राज्याची मागणी करतच राहिला; परंतु विदर्भातील महत्त्वाच्या नेत्यांनी संयुक्त

## संयुक्त महाराष्ट्राची वाटचाल

संयुक्त महाराष्ट्रामध्ये या तीन भागांबरोबर गोव्याचाही समावेश करावा, अशी मराठी भाषिकांची मागणी होती. १९६१ साली गोवा स्वतंत्र झाल्यानंतर या मागणीचा जोर वाढला. परंतु गोव्याच्या विलीनीकरणाला दक्षिण गोव्यातील लोकांचा विरोध होता, म्हणून तेथे १९६५ साली जनमत संग्रह करण्यात आला. या जनमतसंग्रहात गोव्याच्या वेगळ्या अस्तित्वाच्या मागणीच्या बाजूने जनतेने कौल दिला आणि कायमचा हा प्रश्न मिटला, संयुक्त महाराष्ट्राची वाटचाल अशी बिकट होती. कारण या तीन भागात वेगवेगळ्या राजकीय संस्कृती अस्तित्वात होत्या. हैद्राबाद राज्यात मराठी भाषिक लोक तुलनात्मकदृष्ट्या जास्त पुढारलेले असले तरी नव्या प्रातिनिधिक लोकशाहीमध्ये ते अल्पसंख्य होते आणि त्यांची संयुक्त महाराष्ट्रामध्ये सामील होण्याची तीव्र इच्छा होती. त्यामुळे मराठवाड्याचे नेते स्वामी रामानंद तीर्थ यांनी पंडित नेहरूंची नाराजी ओढवून घेऊन भाषावार प्रांतरचनेच्या मागणीचा पुरस्कार केला, ही गोष्ट खरी होती की, हैद्राबाद राज्याच्या सरकारमध्ये मराठी भाषिक मंत्र्यांना महत्त्वाची खाती मिळालेली होती तरीही त्यांचा ओढा संयुक्त महाराष्ट्राकडे होता, त्यामुळे कोणतीही अट न घालता पश्चिम महाराष्ट्रापेक्षा बराच मागास असणारा हा भाग महाराष्ट्रात सामील झाला. त्यामुळे मराठवाड्यातील लोकांना विषम स्पर्धेला तोंड द्यावे लागेल व त्यात त्यांचे नुकसान होईल अशी भीती डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना वाटत होती.

महाराष्ट्राच्या बाजूने कौल दिल्यानंतर पुढील काम सोपे झाले.

## भावनिक ऐक्य

संयुक्त महाराष्ट्र स्थापन झालेला असला तरी त्यासमोर अनेक महत्त्वाचे प्रश्न होते. राज्याचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांना त्याची जाणीव होती. आपल्या एका भाषणामध्ये त्यांनी असे मत व्यक्त केले की, महाराष्ट्राला सध्या तीन प्रकारच्या भावनिक ऐक्याची गरज आहे. त्यातील पहिले ऐक्य म्हणजे महाराष्ट्राच्या तीन विभागामधील ऐक्य, दुसरे ऐक्य म्हणजे मराठी आणि बिगर मराठी भाषिक लोकांमधील ऐक्य, आणि तिसरे ऐक्य म्हणजे सामाजिक ऐक्य. ते असे म्हणाले की, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाडा या भागातील लोक शेकडो वर्षांपासून एकमेकांपासून वेगळे राहत होते. त्यामुळे त्यांना नव्या परिस्थितीशी जुळवून घ्यावे लागते व त्यासाठी त्यांना आपण पुरेसा वेळ दिला पाहिजे. विदर्भ आणि मराठवाड्यातील लोकांना नव्या राज्यात आपल्यावर अन्याय होत आहे असे वाटू न देण्याची जबाबदारी राज्यकर्त्या वर्गावर आहे. मुंबईला महाराष्ट्रामध्ये समाविष्ट करण्याच्या विरुद्ध मुंबईच्या गुजराती भाषिक लोकांचा आणि भांडवलदारांचा मोठा विरोध होता. त्यांना असे वाटत होते की, एक भाषिक मराठी राज्यामध्ये त्यांच्यावर अन्याय होईल; पण यशवंतराव चव्हाण यांनी असे आश्वासन दिले की, महाराष्ट्रातील बिगर मराठी भाषिक लोकांना त्यांचे सर्व अधिकार उपभोगता येतील आणि त्यांच्याविरुद्ध कोणताही अन्याय केला जाणार नाही. चव्हाण यांच्या आश्वासनानंतर बिगर मराठी भाषिक लोकांच्या मनामध्ये निर्माण झालेल्या शंका दूर होण्यास मदत झाली.

## तिसरा प्रश्न सामाजिक ऐक्याचा

महाराष्ट्रामध्ये १९२० पासून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली दलित चळवळ सुरू झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अपेक्षेप्रमाणे अस्पृश्यता दूर झाली नाही आणि अस्पृश्य मानल्या गेलेल्या लोकांवर होणारे अन्यायही दूर झाले नाहीत. त्यामुळे १९३५ साली त्यांनी घोषणा केल्याप्रमाणे १९५६ मध्ये आपल्या लाखो अनुयायांसह बौद्ध धर्माचा स्वीकार केला. या धर्मांतरामुळे समाजात दुरावा निर्माण न झाला पाहिजे आणि या धर्मांतराचे स्वागतच केले पाहिजे, अशी यशवंतराव चव्हाणांची भूमिका होती. त्यामुळेच अनुसूचित जातींना देण्यात येणाऱ्या राखीव जागांची तरतूद त्यांनी नवबौद्धांनाही लागू केली. याचप्रमाणे महाराष्ट्राला ब्राह्मण, ब्राह्मणेतर मराठा - मराठेकर हे जे वाद आहेत ते पण संपुष्टात आले पाहिजेत आणि मागास जातीच्या कल्याणासाठी राज्य सरकारने वेगवेगळ्या उपाययोजना केल्या पाहिजेत असे त्यांचे मत होते. त्यानुसार महाराष्ट्र सरकारने १९६१ साली इतर मागास वर्ग आणि भटक्या विमुक्त जाती यांच्यासाठी शेकडा १४ टक्के जागा शिक्षण आणि नोकऱ्यांमध्ये आरक्षित केल्या. महाराष्ट्राच्या भावनिक ऐक्यासाठी या तीनही बाबी महत्त्वाच्या होत्या.

यातील भावनिक ऐक्याचा खरा प्रश्न प्रादेशिक अस्मितेचा होता. विदर्भामध्ये वेगळ्या विदर्भाची मागणी करणारा गट प्रभावी होता म्हणूनच १ मे १९६० रोजी - आपल्या उद्‌घाटनपर भाषणात पंडित नेहरूंनी 'विदर्भाला आनंदी ठेवा' असा सल्ला महाराष्ट्राच्या राज्यकर्त्यांना दिला होता.

महाराष्ट्रामध्ये विदर्भ, मराठवाडा आणि गुजरातमध्ये सौराष्ट्र, कच्छ हे मागासलेले भाग आहेत. त्यामुळे घटनेच्या कलम-३७१ नुसार या राज्यात या भागांसाठी प्रादेशिक विकास मंडळे स्थापन करावेत अशी तरतूद करण्यात आली आहे. अजूनही या दोन्ही राज्यांतील या भागांच्या विकासाचा अनुशेष मोठ्या प्रमाणात आहे आणि खऱ्या अर्थाने भावनिक ऐक्य साध्य करण्यासाठी अनुशेष दूर करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्रामध्ये मुंबई हे महत्त्वाचे शहर आहे. हे शहरही ज्याप्रमाणे महाराष्ट्राची राजधानी आहे त्याचप्रमाणे देशाची वित्तीय राजधानी आहे. १९६० च्या दशकात कलकत्याचे महत्त्व कमी झाले आणि मुंबईचे महत्त्व वरचेवर वाढत गेले. हे शहर सर्व प्रकारच्या आर्थिक व्यवहारांचे केंद्र असून तेथून मोठ्या प्रमाणात आंतरराष्ट्रीय व्यापार चालतो. १९६० साली या शहराची लोकसंख्या ४० लाख होती. आता ती एक कोटीपेक्षा जास्त आहे. त्याचप्रमाणे मुंबईलगत असणाऱ्या नवी मुंबई, ठाणे, कल्याण, उल्हासनगर इत्यादी शहरातही आणखी ६० लाख लोक राहतात. मुंबईचे नागरी प्रशासन चालवण्यासाठी मुंबई महानगरपालिकेची योजना करण्यात आली आहे. ही देशातील सर्वात जुनी महानगरपालिका आहे. हिचे वार्षिक अंदाजपत्रक ५५ हजार कोटी रुपयांचे असून, त्यामध्ये सुमारे एक लाख कर्मचारी काम करतात. मुंबई शहराचे व्यवस्थापन करणे हे अत्यंत जिकिरीचे काम आहे कारण, जगातील सर्व प्रकारचे लोक येथे राहतात. मुंबई महापालिका वेगवेगळ्या १८ भाषिक गटांसाठी त्यांच्या भाषांच्या माध्यमातून शाळा चालवते. महाराष्ट्र शासनाचा कारभार ज्याप्रमाणे मुंबईतून चालतो, त्याचप्रमाणे अनेक केंद्रीय वित्तीय संस्था येथून आपला कारभार चालवतात.

## विकसित राज्य

आज महाराष्ट्र हे देशातील सर्वात विकसित राज्य असून त्याचे सकल घरेलू उत्पादन (जीडीपी) ३४ लाख कोटी रुपये म्हणजे ४०० अब्ज डॉलरपेक्षा जास्त आहे. राज्याचे दरडोई उत्पन्न हे २,४०,००० रुपये असून ते मोठ्या राज्यात पाचव्या क्रमांकावर आहे. तामिळनाडू, गुजरात आणि कर्नाटकचे दरडोई उत्पन्न महाराष्ट्रापेक्षा जास्त आहे. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे महाराष्ट्रात प्रादेशिक विषमता मोठ्या प्रमाणात आहे. मुंबई-पुणे, मुंबई-नाशिक आणि मुंबई-पनवेल या भागात उद्योगधंद्यांचे आणि व्यवसायांचे केंद्रीकरण झाले असून राज्यातील आदिवासीबहुल भाग खूप मागासलेला आहे. अगदी विकासित जिल्ह्यातसुद्धा काही तालुके मागासलेले आहेत. महाराष्ट्राच्या विशिष्ट अशा भू-रचनेमुळे, भारतातील सर्वात जास्त धरणे महाराष्ट्रात असून शेकडा २२ टक्के जमीनच पाण्याखाली येते.

१ मे १९६० पासून ही आपली भवितव्यतेकडे चालणारी सफर अनेक यशापयशांनी भरलेली आहे. पण गेली ६४ वर्षे आपण निर्धाराने पुढे पावले टाकत आहोत. पुढील प्रवासामध्ये दरमजल यशाची गुढी पुढे रोवत आपल्याला जायचे असेल, तर यशवंतराव चव्हाणांनी सांगितल्याप्रमाणे तीन प्रकारचे भावनिक ऐक्य साध्य करणे आवश्यक आहे. श्रीपाद कृष्णांच्या महाराष्ट्र गीतात सांगितल्याप्रमाणे मराठी माणसाने स्फूर्ती, धृती आणि कृती या तीन बाबी अंतरात ठसवून पुढील वाटचाल करावी.

**(लेखक हे ज्येष्ठ विचारवंत आहेत.)**

**संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन ही एक शौर्यगाथा आहे. १०५ हुतात्म्यांचे बलिदान आणि अनेक सामान्यजनांच्या असीम त्यागातून संयुक्त महाराष्ट्राचा मंगलकलश अवतरला. मराठी जनता या आंदोलनात प्राणपणाने लढली. महाराष्ट्राच्या पुढच्या पिढीला प्रेरणादायी ठरलेल्या या लढ्याचा इतिहास उलगडत आहेत, आचार्य अत्रे यांच्या कन्या शिरीष पै...**

# लढा मराठी अस्मितेचा...

महाराष्ट्राच्या इतिहासात संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन हे एक असे अभूतपूर्व आंदोलन झाले की, ज्याला देशाच्या इतिहासात तोड नाही. हे आंदोलन आम मराठी जनतेचे आंदोलन होते. यच्चयावत सारा मराठी समाज महाराष्ट्र राज्याची निर्मिती व्हावी, महाराष्ट्राचे स्वतंत्र राज्य व्हावे या भावनेने एकत्र आला होता आणि एकच गर्जना या राज्याच्या भूमीवर दुमदुमत होती आणि ती म्हणजे मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे! भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशाची पुनर्रचना भाषावार प्रांतरचनेच्या तत्त्वानुसार करावयाची हे काँग्रेस पक्षाने मान्य केले होते, त्याप्रमाणे सगळ्या देशाची भाषावार प्रांतरचना करण्यात आली होती; मात्र आंध्रप्रदेशची रचना करताना काही त्रुटी राहून गेल्या आणि तेथेही महान आंदोलन सुरू झाले. सरकार त्या मागणीला दाद देईना. तेव्हा पोट्टी रामलू यांनी आंध्रप्रदेशात प्राणांतिक उपोषण सुरू केले. त्यात त्यांनी प्राणार्पण केले आणि सारा आंध्रप्रदेश खवळला. तेव्हा नाइलाजाने नेहरू सरकारने आंध्रप्रदेशची भाषावार पुनर्रचना केली. मात्र हा न्याय महाराष्ट्राला अजून मिळाला नव्हता. महाराष्ट्राचा कितीतरी भाग अजून महाराष्ट्र राज्यात सामील झाला नव्हता. विदर्भ, कारवार, बेळगाव इत्यादी म्हणून मराठी जनता असंतुष्टच होती. महाराष्ट्राबाबत आता काहीतरी पाऊल उचलायलाच हवे म्हणून नेहरू सरकारने 'फाजल अली समिती'ची नेमणूक केली आणि १० ऑक्टोबर १९५५ रोजी या समितीने आपला अहवाल सादर केला. या अहवालानुसार द्विभाषिक राज्याची घोषणा केली गेली. या समितीच्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र आणि गुजरात या दोन राज्यांचे मिळून एक द्विभाषिक राज्य होणार होते आणि मुंबई ही या दोघांची सामायिक राजधानी असणार होती. या शिफारशीमागे मुंबईमधील भांडवलदारांचे कारस्थान होते हे उघड होते, कारण गुजराती भांडवलदारांचे प्रमुख भांडवल मुंबईमध्ये गुंतले होते आणि ही मुंबई जर महाराष्ट्राला मिळाली, तर गुजराती भांडवलदारांचे फार मोठे नुकसान होणार होते. शिवाय या समितीने बेळगाव, कारवार आणि विदर्भ या प्रदेशांना महाराष्ट्रापासून तोडले होते. हा अहवाल जाहीर होताच महाराष्ट्रात एकच असंतोष उसळला आणि आंदोलनाला तोंड फुटण्याची लक्षणे दिसू लागली.




प्रल्हाद केशव अत्रे


त्यानंतर पंडित जवाहरलाल नेहरूंनी स्वतंत्र घोषणा करून स्वतंत्र मुंबई राज्य निर्माण करण्याची योजना जाहीर केली. या योजनेनुसार महाराष्ट्र, गुजरात आणि मुंबई अशा तीन स्वतंत्र राज्यांची निर्मिती होणार होती. या घोषणेमुळे मराठी जनतेचा विश्वासच उडाला आणि प्रचंड आंदोलन सुरू होण्याची लक्षणे स्पष्टपणे दिसू लागली. १८ नोव्हेंबर रोजी विधानसभेवर एक मोठा मोर्चा नेण्याची घोषणा काँग्रेस विरोधी पक्षांनी केली. ठरल्याप्रमाणे हा मोर्चा विधानसभेवर गेला आणि सत्याग्रहींना अटक करून तुरुंगात डांबले. या सत्याग्रहींमध्ये सेनापती बापट होते. पुढे सर्व नेत्यांची जामिनावर सुटका झाली. पुढे २० नोव्हेंबर रोजी स. का. पाटील आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांनी गिरगाव चौपाटीवर सभा घेतली. त्या सभेत्त स. का, पाटील विरोधी पक्षांना उद्देशून म्हणाले, 'सूर्य, चंद्र' असेपर्यंत मुंबई तुम्हाला मिळणार नाही. पाच हजार वर्षे मुंबई महाराष्ट्राला मिळणार नाही.' सभेला हजर असलेली जनता इतकी प्रक्षुब्ध झाली की, तिने स. का. पाटील आणि मोरारजी देसाई यांची सभा उधळून लावली.

सरकारच्या विरोधात एकत्र येऊन सर्व विरोधी पक्षांनी संयुक्त महाराष्ट्र समिती स्थापन केली होती. त्यात समाजवादी, कम्युनिस्ट, हिंदू महासभा, रिपब्लिकन, शेतकरी कामगार पक्ष हे सारे पक्ष एकत्र येऊन कार्य करत होते. आचार्य अत्रे, एस. एम. जोशी, कॉम्रेड डांगे, सेनापती बापट, प्रबोधनकार ठाकरे इ. नेते समितीचे पुढारी होते.


२१ नोव्हेंबर रोजी संयुक्त महाराष्ट्र समितीने फिरून विधानसभेवर मोर्चा काढला. तो फोर्टमधील फ्लोरा फाउण्टन येथे येऊन पोहोचला. घोषणा करत जनता फ्लोरा फाऊण्टनपर्यंत येऊन पोहोचली. तेथे काही दगडफेक झाल्याचे निमित्त होऊन पोलिसांनी जनतेवर लाठीमार



सेनापती बापट



एस. एम. जोशी




कॉम्रेड डांगे

सुरू केला आणि अश्रुधुरांचा वापर केला; पण जनता मागे हटेना, तेव्हा मोरारजी देसाईंनी गोळीबाराचा आदेश दिला आणि पोलिसांनी गोळीबार सुरू केला. या गोळीबारात १५ माणसे मेली. जनता इतकी संतप्त झाली की, तिचा प्रक्षोभ पोलिसांना आवरेना. या गोळीबारात निष्पाप माणसेच अधिक मेली, ज्यांचा चळवळीशी काही संबंध नव्हता. वास्तविक ही दगडफेक काही गुंडांनी मुद्दामच केली असे म्हणतात. या गोळीबारानंतर जनआंदोलन अधिकच तीव्र झाले. २२ डिसेंबर रोजी मुंबई महापालिकेने एकमुखी ठराव पास केला की, मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे! कुठेही मराठी लोक एकत्र आले आणि घोषणा करू लागले की, मोरारजी गोळीबाराचे आदेश देऊ लागले. १५ जानेवारी १९५६ रोजी झालेल्या गोळीबारात ठाकुरद्वार येथे बंडू गोखले या निष्पाप तरुणाचा बळी गेला, या सगळ्या गोळीबारात एकंदर १०५ हुतात्मे प्राणाला मुकले.

आचार्य अत्रे या काळात आपल्या ‘नवयुग’ साप्ताहिकातून संयुक्त महाराष्ट्राचा प्रचार करण्यासाठी अतिशय जहाल अग्रलेख लिहीत होते. त्यांचे अग्रलेख वाचून मराठी जनता स्वाभिमानाने जणू पेटली होती. मोरारजी देसाई यांच्या बेछूट गोळीबाराचे भीषण स्वरूप उघड करणारा एक अग्रलेख त्यांनी ‘नवयुग’मध्ये लिहिला. तो अग्रलेख एकटाकी बारा पाने भरतील इतका मोठा लिहिला होता. या अंकाचा एक लाखाहून अधिक खप झाला. मोरारजी सरकारने हा अंक जप्त केला आणि आचार्य अत्रे यांची रवानगी प्रतिबंधक स्थानबद्धतेच्या कायद्याखाली तुरुंगात केली. २७ जानेवारी १९५६ रोजी ही अटक झाली आणि ५ एप्रिल १९५६ रोजी त्यांची तुरुंगातून मुक्तता झाली. तुरुंगातून बाहेर आल्यावरही त्यांचे ‘नवयुग’ मधील स्फूर्तिदायक लिखाण चालूच राहिले.

१९५६ च्या जुलैमध्ये संयुक्त महाराष्ट्र समितीने दिल्ली येथे मोर्चा नेला आणि सत्याग्रह केला. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीला सरकार अनुकूल नाही म्हणून विरोध दर्शवण्यासाठी मध्यवर्ती सरकारचे अर्थमंत्री चिंतामणराव देशमुख यांनी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला. लोकसभेतच महाद्विभाषिक कायद्याला मंजुरी दिली. त्याच्या निषेधार्थ ७ ऑगस्ट १९५६ रोजी संयुक्त महाराष्ट्र समितीने शिवाजी पार्क येथे प्रचंड सभा घेतली. या सभेत आचार्य अत्रे यांनी ‘मराठा’ हे दैनिक काढण्याची घोषणा केली. इतर मराठी




ज्येष्ठ चित्रकार एम. आर. आचरेकर यांच्या प्रतिमेतून साकारलेल्या ‘महाराष्ट्र स्टेट इज लॉंच्ड्’ या पुस्तकातून.



**ज्येष्ठ चित्रकार एम. आर. आचरेकर यांच्या प्रतिमेतून साकारलेल्या 'महाराष्ट्र स्टेट इज लाँच्ड्' या पुस्तकातून.**

दैनिके ही भांडवलदारांच्या मालकीची असल्यामुळे ती संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाच्या बातम्यांना प्रसिद्धी देत नाहीत. यास्तव समितीच्या कार्याची माहिती आणि प्रचार करण्यासाठी 'मराठा' दैनिक काढण्याचे आचार्य अत्रे यांनी ठरवले. जसे महाराष्ट्रात, त्याचप्रमाणे गुजरातमध्येही महाद्विभाषिकविरोधी आंदोलन सुरू झाले होते. त्या आंदोलनाने पेट घेतला आणि ८ ऑगस्टला अहमदाबाद येथे पोलिसांनी बेछूट गोळीबार केला. १५ नोव्हेंबर १९५६ रोजी दै. 'मराठा'च्या प्रकाशनाला सुरुवात झाली. अल्पावधीतच 'मराठा'ची लोकप्रियता एकसारखी वाढत गेली. १९५६ च्या सार्वजनिक निवडणुकीत संयुक्त महाराष्ट्र समितीला प्रचंड यश मिळाले आणि विधानसभेत विरोधी पक्ष म्हणून समितीला महत्त्वाचे स्थान मिळाले. त्याप्रमाणे मुंबई महापालिकेच्या निवडणुकीतही समितीचे



**प्रबोधनकार ठाकरे**

उमेदवार यशस्वी होऊन समितीला महापालिकेत बहुमत मिळाले. ३० नोव्हेंबर १९५६ रोजी प्रतापगडावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे उदघाटन करावयासाठी पंडित जवाहरलाल नेहरू महाराष्ट्रात आले असताना संयुक्त महाराष्ट्र समितीतर्फे मूक मोर्चा काढण्यात आला. १९ डिसेंबर १९५८ रोजी समितीने दिल्लीला पुन्हा सत्याग्रह मोर्चा नेला, अशा रितीने काही केल्या मराठी जनता आपले आंदोलन मागे घेत नाही हे उघड झाले आणि काँग्रेस सरकारने संयुक्त महाराष्ट्र निर्मितीचा निर्णय घ्यावयाचे ठरविले. महाराष्ट्र राज्यातील काँग्रेस पक्षाचे भवितव्यही या निर्णयावरच अवलंबून होते. पंडित जवाहरलाल नेहरू यांनी याबाबत इंदिरा गांधींशीही विचारविनिमय केला असे सांगितले जाते. विचारांती नेहरू सरकारने मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र निर्माण करण्याची घोषणा केली आणि महाराष्ट्रात एकच आनंदी आनंद झाला. सतत पाच वर्षे निर्धारपूर्वक चाललेल्या एका आंदोलनाचा आता यशस्वी शेवट झाला होता. १ मे १९६० रोजी मुंबईच्या शिवाजी पार्कवरील जाहीर सभेत पंडित जवाहरलाल नेहरूंनी महाराष्ट्र राज्याची जाहीर घोषणा केली आणि अखेरीस एक महान पर्व समाप्त झाले. ज्या मराठी जनतेने कठोर निर्धाराने सतत पाच वर्षे हे उग्र आंदोलन चालू ठेवले, त्या मराठी जनतेचे, महाराष्ट्राचे कृतज्ञतेने स्मरण करायला हवे. तसेच आंदोलनात बळी गेलेल्या १०५ हुतात्म्यांचेही विशेषतः तरुण पिढीचे संयुक्त महाराष्ट्र समितीचे जे नेते या आंदोलनात प्राणपणाने लढले, त्या सर्व नेत्यांना या प्रसंगी कदापिही विसरून चालणार नाही.

जनतेचे नेतृत्व करून त्यांनी हा लढा शांतपणे चालू ठेवण्याची दिशा जनतेला दाखवली. एस. एम. जोशी, भाई डांगे, सेनापती बापट, प्रबोधनकार ठाकरे, माधवराव बागल आणि साहित्यसम्राट आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांनी जी जनजागृती घडवून आणली तिला तोड नाही. महाराष्ट्रातले एक गाव असे नव्हते, एक घर असे नव्हते की, जिथे आचार्य अत्रे यांची वाणी आणि लेखणी पोहोचली नाही. मराठी जनता जर इतक्या शर्थीने लढली नसती, तर मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र राज्याची निर्मिती झालीच नसती.

लोकराज्य एप्रिल–मे २०१० मधून पुनर्मुद्रित

महाराष्ट्राला समाजसुधारणेची व्यापक पार्श्वभूमी लाभली आहे. देशपातळीवरील समाजसुधारणांना गती आणि दिशा देणारे समाजसुधारक येथे जन्माला आले. जातिभेद, वर्णव्यवस्था, अंधश्रद्धा, कर्मकांड, विधवाविवाह अशा विविध सामाजिक-धार्मिक प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी ते आजीवन प्रयत्नरत राहिले. महाराष्ट्राचा आजचा पुरोगामी चेहरा निर्माण करण्यामागे या समाजसुधारकांची निश्चितच महत्त्वाची भूमिका राहिली. या काळात स्थापन झालेल्या विविध संस्था-संघटनांद्वारे मोठ्या प्रमाणात सुधारणा घडवून आणल्या गेल्या. महाराष्ट्रातील या चळवळींचा ज्येष्ठ अभ्यासक सदानंद मोरे यांनी घेतलेला चिकित्सक आढावा...

# सुधारकांची भूमी

आपण जेव्हा महाराष्ट्रातील सुधारणा आणि सुधारक यांची चर्चा करतो, तेव्हा आपल्या दृष्टीपुढे मुख्यत्वे इंग्रजी राजवटीतील घडामोडी अभिप्रेत असतात आणि म्हणूनच या सुधारणांचा संबंध इंग्रजी शिक्षण आणि आधुनिकता यांच्याशी जोडला जातो. एका मर्यादेपर्यंत चर्चेचे हे धोरण योग्यही आहे; परंतु एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी की, मराठी समाजाला स्वतःच्या अशा प्राचीन परंपरा होत्या. महाराष्ट्रात काही धर्मसंप्रदाय व धर्मश्रद्धा दृढमूल झालेल्या होत्या. त्याचा जनमानसावर विलक्षण प्रभावही होता. थोडक्यात म्हणजे अमेरिका, ऑस्ट्रेलिया किंवा आफ्रिका येथील रानटी समूहांप्रमाणे महाराष्ट्राची पाटी कोरी नव्हती, तर महाराष्ट्राला स्वतःची अशी संस्कृती तर होती; शिवाय या राज्याने ब्रिटिशांशी बरोबरीने आणि तडफेने झुंज देऊन त्यांना दमवलेदेखील होते. ते त्यांचे खरे प्रतिस्पर्धी होते. त्यामुळे ब्रिटिश सत्ताधारी नेते ठरल्यानंतरसुद्धा महाराष्ट्र त्यांचे जसेच्या तसे अनुकरण करणे शक्य नव्हते. युरोपियन मूल्ये आणि देशी संस्कृती यांच्यात देवाणघेवाण होऊनच पुढचा प्रवास होणार होता.

भारतीय आणि पर्यायाने महाराष्ट्रीय समाजाचे वैशिष्ट्य म्हणजे त्याच्या रचनेचा धर्माशी असलेला अतूट संबंध, विशेषतः वर्ण-जाती व्यवस्था ही धर्माचाच हिस्सा समजला जाऊन धर्माचे समर्थन तिच्यामागे उभे केले गेले होते. त्यामुळे येथील समाजसुधारणांची सुरुवात धर्मसुधारणांपासूनच करणे स्वाभाविक व अपरिहार्यही होते. एकट्या आगरकरांचा अपवाद वगळता येथील सर्व समाजसुधारक धर्मसुधारक होते आणि आगरकरांना स्वतःला धर्मसंस्थेविषयी फारशी आस्था नसली, तरी त्यांना हिंदू धर्माची दखल घ्यावी लागली, या धर्माशीच सामना करावा लागला. आपणही त्याचे कैवारी असल्याचाच दावा करावा लागला. धर्मसंस्था मोडीत काढू पाहणाऱ्या मार्क्सवाद्यांचा शिरकाव येथील लोकव्यवहारात तसा उशिराच झाला आणि त्यांच्या धर्मविषयक भूमिकेचा येथील जनतेवर काही विशेष प्रभाव पडला, असे म्हणता येत नाही.

ब्रिटिशांचा आणि आपला तुल्यबळाने सामना होऊन ब्रिटिश जिंकले. यामागची कारणे शोधणाऱ्या मराठी विचारवंतांचे लक्ष आपल्या राज्यपद्धतीकडे म्हणजेच पेशवाईकडे पहिल्यांदा गेले. तेव्हा पेशवाईतील सामाजिक दोष दिसायला त्यांना वेळ लागला नाही आणि या सामाजिक दोषांना कारणीभूत अवनत अवस्थेप्रत पोहोचलेला आपला धर्म असल्याचेही त्यांच्या लवकरच लक्षात आले. साहजिकच समाजकारण करणारे विचारवंत मग ते महात्मा फुले असोत की लोकहितवादी असोत किंवा अगदी न्या. रानडे असोत, केव्हाना केव्हा पेशवाईवर घसरल्याशिवाय राहत नाहीत. पेशवाईत जातिभेदाची, अंधश्रद्धांची, पोथीवादाची परिसीमा झाल्याचे आढळले व तीही



महात्मा जोतिराव फुले



राजर्षी शाहू महाराज



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर

धर्माच्या नावाने.

आधुनिक काळाला अनुरूप अशी वृत्तपत्रांसारखी साधने वापरून त्यांच्यामार्फत सुधारणा करण्याची दिशा 'दर्पण'कार बाळशास्त्री जांभेकर यांनी दाखवली. बाळशास्त्रींनीच ज्ञानेश्वरी ग्रंथाचे पहिल्यांदा मुद्रण करून धर्मग्रंथांचे सार्वत्रिकीकरण करण्यास प्रारंभ केला. बाळशास्त्रींचे शिष्य व्याकरणकार दादोबा पांडुरंग तर्खडकर यांना धर्माच्या अंगाने समाजसुधारणा करण्याचा प्रयत्न करण्याचे श्रेय द्यावे लागते. हिंदू धर्माच्या प्रचलित चौकटीत धर्मशास्त्राचा आणि रूढींचा प्रभाव असल्यामुळे त्यांनी हिंदू धर्म न सोडता त्याच्या अंतर्गत धर्मसंप्रदाय स्थापन करून त्याच्या माध्यमातून हिंदू धर्माची समीक्षा करण्याचे व दुष्ट सामाजिक रूढींवर टीकाप्रहार करण्याचे धोरण अवलंबले. त्यांनी पहिल्यांदा गुजरातमध्ये असताना मानवधर्मसभा काढली. दादोबा पांडुरंग हे बाळशास्त्री यांचेच शिष्य होते. ते मुंबई सरकारच्या शिक्षण खात्यात अधिकारपदावर होते. गुजरातेतून मुंबईला बदली झाल्यानंतर त्यांनी मुंबईत 'परमहंस सभा' नावाचा जनसंप्रदाय काढला. हा संप्रदाय हिंदू धर्मातील जातिभेद, स्त्रीदास्य, मूर्तिपूजा इत्यादींच्या विरोधात असून तो ब्राह्मण वर्चस्वाचा कठोर टीकाकारही होता. परमहंस सभेचा प्रसार करण्यासाठी दादोबांनी आपले शिष्य व सहकारी केशवराव भवाळकर यांना पुण्याला बदलीवर पाठवले. तेथे भवाळकरांचा जोतिराव आणि सावित्रीबाई या फुले दाम्पत्याशी परिचय झाला. भवाळकर शिक्षण खात्यात होते आणि महात्मा फुलेही शैक्षणिक कार्यात अग्रेसर होते, भवाळकरांमार्फत त्यांना परमहंस सभेची माहिती झाली. सभेचे अध्वर्यू राम बाळकृष्ण जयकर (राणे) यांच्याशी महात्मा फुले यांचा निकट संपर्क होता. आपला शिवछत्रपतींवरील पोवाडा त्यांनी राम बाळकृष्ण यांनाच अर्पण केला. परमहंस सभेची जातपातविरुद्ध भूमिका तत्कालीन समाजास रुचली नाही. सभेविरुद्ध तीव्र प्रतिक्रिया उमटल्या व दादोबांना हा नवधर्मसंप्रदाय बरखास्त करावा लागला. त्याची वाताहत झाली, अर्थात असे झाले तरी धर्माच्या माध्यमातून समाजसुधारणा करू इच्छिणाऱ्यांचा उत्साह मावळला नाही. दादोबांचे बंधू आत्माराम पांडुरंग यांनी पुढाकार घेऊन प्रार्थना समाज या नव्या संप्रदायाची स्थापना केली. लवकरच त्यांना न्या. म.गो. रानडे, डॉ. रामकृष्ण गोपाल भांडारकर, न्या. का. त्र्यं. तेलंग, शंकर पांडुरंग पंडित, वामन आबाजी मोडक इ. नवपदवीधर मिळाले. या सर्व मडळींची धर्मभावना सखोल होती. समाजाची सर्वांगीण सुधारणा करण्याची त्यांनी तीव्र इच्छा होती. आपापल्या क्षेत्रात ही मंडळी सर्वो च्च स्थानांवर पोहोचलेली होती. धार्मिक सुधारणा हा सामाजिक सुधारणांचा पाया असल्याचीही त्यांची खात्री होती; परंतु पूर्वीच्या 'परमहंस' सभेने जातिभेदाविरुद्ध घेतलेल्या टोकाच्या भूमिकेविरुद्ध तीव्र प्रतिक्रिया उमटून या सभेचीच इतिश्री करावी लागली होती. हा अनुभव विचारात घेऊन परमहंस सभेच्याच अवशेषांवर 'प्रार्थना समाजा'ची नवी इमारत उठवणाऱ्या प्रार्थना समाजिकांनी आपली जातिभेदाविरुद्धची भूमिका काहीशी सौम्य केली.


गोपाळ गणेश आगरकर


दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर

परमहंस सभेविषयी विशेष आस्था असणारे महात्मा फुले या प्रकारामुळे अत्यंत व्यथित झाले. प्रार्थना समाजाची जातिभेदाविषयीची सौम्य भूमिका पाहून त्यांना या समाजाच्या हेतूविषयी संशय आला. विसर्जित परमहंस सभेचे कार्य अधिक जोमाने पुढे चालवण्याच्या उद्देशाने त्यांनी 'सत्यशोधक समाज' हा नवा धर्मपंथ स्थापन केला. अशा प्रकारे 'प्रार्थना समाज' आणि 'सत्यशोधक समाज' या दोन्ही संप्रदायांनी आपले कार्य सुरू केले.

जोतिरावांनी सत्यशोधक समाज काढताना 'सार्वजनिक सत्यधर्म' हे पुस्तक लिहिले. या धर्मपुस्तकातून त्यांनी सर्व मानवाचा उत्पन्नकर्ता एकच ईश्वर असल्यामुळे सर्व मानवांचे एकमेकांशी बहीणभावंडांचे नाते असल्याचे सांगितले. या ईश्वराला त्यांनी निर्मिक अशी संज्ञा दिली. या निर्मिकापर्यंत जाण्यासाठी कोणत्याही मध्यस्थाची जरूर नाही, असे म्हणत त्यांनी पुरोहितशाहीवर हल्ला केला. जातिव्यवस्था, अस्पृश्यता आणि स्त्रीदास्य यांना समर्थन देणाऱ्या धार्मिक कल्पनांची त्यांनी कठोर चिकित्सा केली. त्याचे हे क्रांतिकारक विचार पुढे छत्रपती शाहू महाराजांनाही प्रेरक ठरले. परमहंस, प्रार्थना आणि सत्य या तिन्ही धर्मसमाजांना समान असणारी बाब म्हणजे त्यांची संत तुकाराम महाराजांवरील निष्ठा. तुकोबा त्यांचे महानायक होते, असे म्हणण्यात काहीही अतिशयोक्ती नाही. प्रार्थना आणि सत्यशोधक समाजांचे कार्य चालू असतानाच महाराष्ट्रात स्वामी दयानंदांच्या आर्य समाजाचे आगमन झाले. 'आर्य समाज स्वतःला खराखुरा वैदिक धर्मी मानी. मूळ वेदांमध्ये अस्पृश्यता, जातिभेद, स्त्रीदास्य यांना स्थान नसल्याचे त्याचे मत असल्यामुळे तो सुधारणावादीच म्हणावा लागतो. किंबहुना त्यामुळेच महर्षी दयानंद पुण्यात आले असता न्या. रानडे आणि महात्मा फुले यांनी त्यांना संरक्षण देऊन त्यांचा पुण्यातील सनातनी ब्रह्मवृंदाच्या हल्ल्यापासून बचाव केला. दलित चळवळीतील किसन फागुजी बनसोडे, गणेश आकाजी गवई या प्रारंभीच्या नेत्यांवर प्रार्थना समाजाचा प्रभाव होता. पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतंत्र विचार करून बौद्ध धम्माचा स्वीकार केला. बौद्ध धम्मात त्यांना केवळ सामाजिकच नव्हे, तर राजकीय समस्यांचीही उत्तरे दिसली. या धम्माच्या स्वीकारामुळे अस्पृश्यतेच्या समस्येचे तर निराकरण होईलच; परंतु, भारतीय लोकशाही व्यवस्थेला बळकट असा वैचारिक धार्मिक आधारही मिळेल, असे त्यांना वाटले. दादोबा पांडुरंगपासून सुरू झालेली आधुनिक महाराष्ट्रातील धर्मचिंतनाची ही परंपरा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामार्फत अविच्छिन्नपणे चालू राहिली. महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणांना या धर्मचिंतनाने तात्त्विक अधिष्ठान दिले. सामाजिक परिवर्तनासाठी कायदा आवश्यक असला तरी पुरेसा नसतो. त्यासाठी माणसांच्या धार्मिक कल्पनांमध्येही बदल व्हावा लागतो. महाराष्ट्रात तो तसा झाला, हे महाराष्ट्रातील सामाजिक सुधारकांचे वैशिष्ट्य होय.

लोकराज्य एप्रिल-मे २०१० मधून पुनर्मुद्रित

**भारताच्या स्वातंत्र्यानंतर भाषिक राज्य निर्मितीची चळवळ महाराष्ट्रात व देशभर झाली. भाषावार प्रांत रचना होऊन महाराष्ट्र आणि गुजरात ही बॉम्बे स्टेटमधून स्वतंत्र राज्ये अस्तित्वात आली, हे आपण जाणतो. त्यातून महाराष्ट्र राज्य स्थापनेचा मंगलकलश घेऊन दिवंगत यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र हे नवे राज्य उदयाला आले. स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त १९६० ते २०२४ पर्यंतच्या महाराष्ट्र राज्याच्या प्रगतीचा आणि घवघवीत यशदायी अशा ६४ वर्षांच्या वाटचालीचा थोडक्यात आढावा घेण्याचा हा प्रयत्न आहे.**

# महाराष्ट्राची उत्तुंग झेप

**प्रा. डॉ. सुधीर गव्हाणे**

महाराष्ट्र राज्याची निर्मिती १ मे १९६० रोजी झाली. संयुक्त महाराष्ट्र चळवळीची फलनिष्पत्ती म्हणून व महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री दिवंगत यशवंतराव चव्हाण यांच्या केंद्र सरकारकडील कुशल व सातत्यपूर्ण पाठपुराव्याने मराठी भाषकांचे, मराठी संस्कृतीचे व परंपरेचे महाराष्ट्र राज्य नवी स्वप्ने व नवी ध्येये घेऊन मराठी मातीत अवतरले. तीन लाख आठ हजार चौरस किलोमीटर्सचे भौगोलिक क्षेत्र व ७२० किलोमीटरचा समुद्रकिनारा असणारे हे महाराष्ट्र खरोखरीच महा असलेले राष्ट्रघटक बनले. भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात आपल्या लढाऊ बाण्याने हजारो स्वातंत्र्यसैनिकांनी समर्पणवृत्तीने सर्वोच्च बलिदान करायलाही पुढेमागे पाहिले नाही. महाराष्ट्र भूमी ही देशभक्तांची आणि समाजसेवकांची भूमी आहे. देशाला स्वातंत्र्याची प्रेरणा देणारे छत्रपती शिवाजी महाराज, दादाभाई नौरोजी, महाराज सयाजीराव गायकवाड, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, न्या. रानडे, नामदार गोखले, महात्मा फुले, आगरकर, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, जेधे-जवळकर, स्वातंत्र्यवीर सावरकर, क्रांतीसिंह नाना पाटील, सेनापती बापट, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी कर्वे,



डॉ.पंजाबराव देशमुख, डॉ. शिवाजीराव पटवर्धन, कर्मवीर भाऊराव पाटील, महर्षी वि. रा. शिंदे, भाई माधवराव बागल, स्वामी रामानंद तीर्थ, एस. एम. जोशी, भाई उद्धवराव पाटील, बापूसाहेब लाड, गोविंदभाई श्रॉफ, हुतात्मा चाफेकर, राजगुरू या व अशा अनेक नामवंतांनी महाराष्ट्राला नव्हे, तर सर्व देशातील देशभक्तांना प्रेरणा दिली. थोडक्यात महाराष्ट्र राज्यातील अनेक नररत्ने ही भारताच्या राजकीय व सामाजिक स्वातंत्र्यलढ्यात अग्रणी राहिली आणि देशातील लाखो नागरिकांना आदर्शवत ठरली.

ब्रिटिशांची राजवट येण्याआधी या परकीय सत्तेविरुद्ध शेवटपर्यंत लढा महाराष्ट्राने व देशभरातील मराठा राजवटींनी दिला, हा इतिहास कसा विसरता येईल?

१९६० साली महाराष्ट्राचे थोर व देशभक्त नेते आणि पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी सांगितलेले विचार येथे मांडावे वाटतात, 'महाराष्ट्राचे हे जे राज्य निर्माण झाले आहे ते मराठी




जनतेच्या कल्याणाचे काम करीलच, परंतु मराठी भाषकांच्या जवळ जे देण्यासारखे आहे, त्यांच्या जीवनामध्ये जे चांगले आहे, जे उदात्त आहे, त्याचा त्याग जर करावयाचा असेल तर तो आम्ही भारतासाठी प्रथम करू. कारण आमचा हा पहिलेपासून विश्वास आहे की, भारत राहिला तर महाराष्ट्र राहील, भारत मोठा झाला तर महाराष्ट्र मोठा होईल. भारताचे आणि महाराष्ट्राचे हित जेव्हा एकरूप होते, तेव्हा भारतही मोठा होतो आणि महाराष्ट्रही मोठा होतो, हा इतिहास महाराष्ट्राच्या रक्तारक्तातून भिनलेला आहे.' (यशवंतराव चव्हाण : महाराष्ट्र राज्य उद्घाटन समारंभ : १ मे १९६०) महाराष्ट्राने गेल्या ६४ वर्षांत वा सुमारे सात दशकात आजवर स्वत:चा सक्षमतेने विकास साधत साधत भारत देशालाही सबळ करण्याचे काम केले आहे. ही नक्कीच अभिमानाची आणि गौरवाची बाब आहे.

### १९६० चा महाराष्ट्र : कसा व कुठे होता?

महाराष्ट्राची साक्षरता ही १९६० मध्ये अवघी ३५% होती व त्यातही प्रादेशिक असमतोल कमालीचा होता. मुंबई विभागात साक्षरता ३७.८%, तर पुणे विभागात ती २९.३% आणि मागासलेल्या विदर्भात २७.९% व अतिमागासलेल्या मराठवाड्यात अवघी १६.३% होती. त्यातही मराठवाड्यातील महिलांची साक्षरता धक्कादायक अशी म्हणजे ५.८% एवढी होती. थोडक्यात ७५ ते ९५% नागरिक-महिला निरक्षरतेच्या अंधारात खितपत पडलेल्या होत्या. याच मराठी भाषक मराठवाडा प्रदेशात १९५१ साली साक्षरता ही ८.९३% होती आणि महिलांची साक्षरता ही अत्यल्प म्हणजे २.२६% होती, यावर आज विश्वास बसत नाही.

उद्योगांचा विचार करता नवस्थापित महाराष्ट्र राज्यात एकूण उद्योग हे अवघे १६० होते, त्यातही विदर्भ-मराठवाडा सोडून उर्वरित महाराष्ट्रात ९०, विदर्भात ६०, तर मराठवाडा प्रदेशात १० उद्योग उभे राहिलेले होते. कापड उद्योगाबाबत (टेक्सटाईल इंडस्ट्री) पाहिले, तर महाराष्ट्रात एकूण १०१ मिल्स होत्या. कापूस पिकवणाऱ्या विदर्भात ८, तर मराठवाड्यात फक्त २ टेक्सटाईल मिल्स होत्या. व्यापारउदीम हा मुंबईतच अस्तित्वात होता, तेही हे शहर एक बंदर असल्याने. अशा अज्ञानाच्या अंधकारात असणारा व प्रादेशिक आणि सामाजिक-आर्थिक विषमतेच्या अशा महाराष्ट्र राज्याला नव्या आधुनिक, उद्योगप्रवण, कृषी-सहकारकेंद्रित, ज्ञानविज्ञानकेंद्रित राज्यात रूपांतरित करण्याचे आव्हान दूरदृष्टीच्या महाराष्ट्राच्या समर्थ नेत्यांनी व आजवरच्या मुख्यमंत्री महोदयांनी स्वीकारले. देशातील अव्वल क्रमांकाचे राज्य म्हणून गतिमान प्रगती झपाटलेपणाने आणि झपाट्याने करून अक्षरश: घडवले, हे कुणीही नाकारू शकत नाही. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण, मारोतराव कन्नमवार, वसंतराव नाईक, शंकरराव चव्हाण, वसंतदादा पाटील, बॅ. ए. आर. अंतुले, शरद पवार, बाबासाहेब भोसले, शिवाजीराव पाटील-निलंगेकर, सुधाकरराव नाईक, मनोहर जोशी, नारायण राणे, विलासराव देशमुख, सुशीलकुमार शिंदे, अशोकराव चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण, देवेंद्र फडणवीस व उद्धव ठाकरे यांचे योगदान आपापल्यापरीने राहिलेले आहे. महाराष्ट्राचे नवनियुक्त वर्तमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार हेही राज्याला आपल्या क्षमतेने नव्या प्रगतिपथावर घेऊन जात आहे. महाराष्ट्र आज देशातील एक संपन्नता, सुबत्ता असणारे आघाडीचे प्रगत राज्य झाले आहे. गेल्या सात दशकातील सर्व नागरिक, नेते, उद्योगपती, व्यावसायिक, युवक, शेतकरी, मजूर, सर्व राजकीय पक्षांचे समंजस कार्यकर्ते, संशोधक, युवक, खेळाडू, प्राध्यापक, शिक्षक व स्वयंसेवी संस्था-सहकारी संस्थांचे जाळे यांच्या अथक प्रयत्नांनी व सर्व घटकांना सामावून घेण्याच्या महाराष्ट्रीय वृत्तीने व महाराष्ट्र संस्कृतीने झाले आहे. जिथे शांतता नांदते, तिथेच सुबत्ता

# समर्थ महाराष्ट्राचे समर्थ नेतृत्व

**मुख्यमंत्री
१९६० - २०२४**



**यशवंतराव चव्हाण**
१ मे १९६० ते १९ नोव्हेंबर १९६२



**मारोतराव कन्नमवार**
२१ नोव्हेंबर १९६२ ते २४ नोव्हेंबर १९६३



**वसंतराव नाईक**
५ डिसेंबर १९६३ ते २० फेब्रुवारी १९७५



**शंकरराव चव्हाण**
२१ फेब्रुवारी १९७५ ते १६ एप्रिल १९७७
१४ मार्च १९८६ ते २४ जून १९८८



**वसंतदादा पाटील**
१७ एप्रिल १९७७ ते ६ मार्च १९७८
७ मार्च १९७८ ते १७ जुलै १९७८
२ फेब्रुवारी १९८३ ते ९ मार्च १९८५
१० मार्च १९८५ ते १ जून १९८५



**शरद पवार**
१८ जुलै १९७८ ते १७ फेब्रुवारी १९८०
२५ जून १९८८ ते ३ मार्च १९९०
४ मार्च १९९० ते २५ जून १९९१
६ मार्च १९९३ ते १३ मार्च १९९५




**बॅ. ए. आर. अंतुले**
९ जून १९८० ते १२ जानेवारी १९८२



**बाबासाहेब भोसले**
२० जानेवारी १९८२ ते १ फेब्रुवारी १९८३



**शिवाजीराव पाटील-निलंगेकर**
३ जून १९८५ ते ७ मार्च १९८६



**सुधाकरराव नाईक**
२५ जून १९९१ ते २३ फेब्रुवारी १९९३



**मनोहर जोशी**
१४ मार्च १९९५ ते ३० जानेवारी १९९९



**नारायण राणे**
१ फेब्रुवारी १९९९ ते १७ ऑक्टोबर १९९९



**विलासराव देशमुख**
१८ ऑक्टोबर १९९९ ते १८ जानेवारी २००३
१ नोव्हेंबर २००४ ते ७ डिसेंबर २००८



**सुशीलकुमार शिंदे**
१८ जानेवारी २००३ ते
३१ ऑक्टोबर २००४



**अशोक चव्हाण**
८ डिसेंबर २००८ ते ८ नोव्हेंबर २००९
९ नोव्हेंबर २००९ ते १० नोव्हेंबर २०१०



**पृथ्वीराज चव्हाण**
११ नोव्हेंबर २०१० ते २७ सप्टेंबर २०१४



**देवेंद्र फडणवीस**
३१ ऑक्टो. २०१४ ते ८ नोव्हें. २०१९
२३ नोव्हें. २०१९ ते २६ नोव्हें. २०१९



**उद्धव ठाकरे**
२८ नोव्हेंबर २०१९ ते २९ जून २०२२



**एकनाथ शिंदे**
३० जून २०२२ ते आजतागायत

(संदर्भ : http://mls.org.in)

येते. जिथे सर्वांना सामावून घेणारी समावेशकवृत्ती असते, तेथे चौफेर विकासाचा वटवृक्ष बहरतो; हे महाराष्ट्र राज्याने सिद्ध केले आहे. कोणत्याही महाराष्ट्रीय माणसाचा ऊर भरून यावा, अशी ही गौरवगाथा आहे.




## गौरवास्पद गरुडझेप

मुंबई महानगर गेल्या सात दशकात नुसतेच विस्तारलेच नाही; तर भारताची आर्थिक राजधानी झाले. मुंबई हे भारतीय व जागतिक उद्योगसमूहांचे कॉर्पोरेट कॅपिटलही झाले. चित्रपट, संगीत व कला उद्योगाचे मुंबई केंद्र झाले आहे. महाराष्ट्र सरकारने फिल्मसिटी उभी करून चित्रपटसृष्टीला नवी बळकटी व सोयीसवलती दिल्या आहेत. सर्जनशीलतेचे तसेच मनोरंजन व माध्यम उद्योगाचे मुंबई व महाराष्ट्र महाकेंद्र बनले आहे हे कोणी नाकारू शकेल काय?

महाराष्ट्रात औद्योगिकीकरण हे केवळ मुंबईत वेगाने झाले असे नाही, तर ते पुणे-पिंपरी-चिंचवड, कोल्हापूर, नागपूर, औरंगाबाद, नाशिक, जळगाव, कोकण या सर्वदूर महाराष्ट्रात उद्योगांचे जाळे उभे राहिले. रोजगार निर्मिती झाली व व्यापारउदीम-सेवा क्षेत्र विस्तारले. पर्यटन उद्योगानेही लक्षणीय गती घेतली आहे.

पुढील तालिकेवरून हे लक्षात येते की, महाराष्ट्र कारखाने उभे करण्यास प्रोत्साहक वातावरण देण्यात प्रमुख राज्यांच्या फारच पुढे आहे. कारखान्यांची संख्या सर्वाधिक तामिळनाडूमध्ये व त्यानंतर गुजरात आणि महाराष्ट्रात आहे. उत्तरप्रदेश, बिहार, मध्यप्रदेश, आसाम, ओडिशा, प.बंगाल, राजस्थान, कर्नाटक ही राज्ये कितीतरी पिछाडीवर आहेत. महाराष्ट्र उद्योगात आघाडीवर का आहे, त्याचा हा ठोस पुरावा म्हणता येईल.

साखर कारखान्यांची संख्या पाहिली तरी महाराष्ट्र भारतात पुढेच आहे. भारतातील एकूण ५३२ साखर कारखान्यांपैकी महाराष्ट्रात १७५ साखर कारखाने आहेत.

भारतातील ३५% साखर एकटा महाराष्ट्र निर्माण करतो आणि तो परदेशात निर्यातही करतो आहे. या उद्योगामुळे हजारो शेतकरी, ऊसतोड कामगार, व्यावसायिक यांना उत्पन्न व रोजगार मिळतो. अनेक साखर कारखान्यांनी आपल्या परिसराचा विकास व शैक्षणिक सुविधा दिल्या आहेत हेही विसरता येत नाही, पण अलीकडे काही आजारी साखर कारखान्यांचा व आर्थिक गैरप्रकारांचा प्रश्नही गंभीर झालेला दिसतोय. तरीही साखर कारखाने हे शेतकरी व ग्रामीण विकासाचे माध्यम राहिलेले आहेत व ग्रामीण भागात याशिवाय दुसरी मोठी कारखानदारी नाही हे लक्षात घेणेही आवश्यक आहे.

**महाराष्ट्र व प्रमुख राज्यातील कारखाने-उद्योग : तुलनात्मक चित्र**

| राज्य | कारखान्यांची संख्या |
|---|---|
| तामिळनाडू | ३८,८३७ |
| गुजरात | २८,४७९ |
| महाराष्ट्र | २५,६१० |
| आंध्र प्रदेश | १६,९२४ |
| उत्तर प्रदेश | १६,१८४ |
| तेलंगणा | १५,२७१ |
| कर्नाटक | १४,१६९ |
| पंजाब | १३,०९२ |
| हरियाणा | ११,२५२ |
| राजस्थान | ९,६९४ |
| पश्चिम बंगाल | ९,६५० |
| केरळ | ७,७९६ |
| आसाम | ५,१९६ |
| मध्य प्रदेश | ४,७७१ |
| छत्तीसगढ | ३,८९२ |
| बिहार | ३,४२९ |

(आधार - रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया : २०१९-२०)

## देशाचा आर्थिक आधारस्तंभ

महाराष्ट्रातील ही औद्योगिक व वाणिज्यिक गरूडझेप एवढी जबरदस्त आहे की, महाराष्ट्र हा भारत सरकारच्या आर्थिक उत्पन्नाचा महावाटेकरी आहे. एकूण जीएसटी (गुड्स ॲण्ड सर्व्हिसेस टॅक्स) या केंद्र सरकारच्या कर उत्पन्नात महाराष्ट्र राज्याचा वाटा हा देशात सर्वाधिक म्हणजे १५% आहे. कोणतेही राज्य महाराष्ट्राएवढे कर उत्पन्न देत नाही. आपणास आश्चर्यचकित व अभिमानास्पद वाटेल अशी बाब म्हणजे केंद्र सरकारला इनकम टॅक्स व कॉर्पोरेट टॅक्स हा थेट कर (डायरेक्ट टॅक्स) सर्वाधिक देणारे राज्य आपले महाराष्ट्रच आहे. एकट्या आपल्या महाराष्ट्र राज्याचा या करातील देशपातळीवरील वाटा हा ३६.३८% एवढा घसघशीत आहे. २०२२-२३ साली महाराष्ट्राने एकूण ६ लाख

५ हजार २६८ कोटी रुपयांचा थेट कर (डायरेक्ट टॅक्स) भारत सरकारला दिला आहे व दरवर्षी हा आकडा वाढतोच आहे. साधारणपणे असे म्हणता येईल की, भारत सरकारचे जवळपास ४०% थेट कर उत्पन्न तुमचा आमचा महाराष्ट्र देते व ही आजच्या काळातील देशभक्ती व देशशक्ती म्हणायला हवी. म्हणजेच आपला महाराष्ट्र हा भारताचा अर्थआधारस्तंभ आहे, असे ठामपणे म्हणू शकतोच की!


## ग्रामीण विकासाचे रोल मॉडेल

भारत देशातील पंचायत राज्यव्यवस्था पहिल्यांदा महाराष्ट्र राज्याने बळकट केलेली आहे. या व्यवस्थेत महाराष्ट्रात महिला आरक्षण ५०% करणारे आणि महिला धोरण देशात पहिल्यांदा राबवले गेलेले आहे. राज्यात १९६०-६१ साली २१,६३६ ग्रामपंचायती होत्या. त्यांची संख्या २०२१-२२ साली २७,८३२ झाली व जिल्हा परिषदांची संख्या ही १९६० साली २५ होती, ती आता ३४ झाली आहे व पंचायत समित्यांची संख्या ही १९६०च्या २९५ वरून २०२१-२२ साली ३५१पर्यंत वाढलेली आहे. नगरपालिका १९६०ला २१९ होत्या, त्या २०२१-२२ साली २४४ झाल्या आहेत व त्यात १३९ नव्या नगरपंचायतींची भर पडलेली आहे. विकेंद्रित लोकशाहीची प्रभावी अंमलबजावणी महाराष्ट्र राज्य करत आहे. महाराष्ट्र राज्य हे सहकार क्षेत्रात नेहमीच पुढे राहिले आहे. १९६० साली महाराष्ट्रात ३१,५६५ सहकारी सोसायट्या व सदस्य २२ लाख होते हीच संख्या २०२१-२२ या वर्षी २ लाख २२ हजार ७३८ सहकारी सोसायट्या आहेत. यावरून सहकार महाराष्ट्रात खेडोपाडी रुजलेला आहे हे मान्य करावे लागते.

ग्रामीण महाराष्ट्र हा विकासाचा केंद्रबिंदू मानल्याने यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक व त्यानंतरच्या मुख्यमंत्री महोदयांनी व सरकारांनीही प्रोत्साहन देत देशातील सर्वात प्रभावी पंचायतराज व्यवस्था, जिल्हा परिषदा, हजारो सहकारी संस्था, कृषी पतसंस्था, खेडोपाडी सहकारी सोसायट्या, राज्य व जिल्हा सहकारी बँका, ग्रामीण कृषी व बिगरकृषी पतपेढ्यांचे दमदार जाळे निर्माण केले. भारतीय सहकारी चळवळीचे पितामह मानले गेलेले वैकुंठभाई मेहता, काकासाहेब गाडगीळ व विठ्ठलराव विखे-पाटील, वसंतदादा पाटील यांच्या नेतृत्वाखाली सहकारी साखर कारखाने, सूत गिरण्यांसारख्या कृषिआधारित उद्योगांमुळे ग्रामीण महाराष्ट्राचा चेहरामोहरा बदलला.

सहकार व कृषी औद्योगिक धोरणाने महाराष्ट्र देशातील कृषी क्षेत्रातील पंजाबप्रमाणे अव्वल राज्य झाले. पुढे फळबाग योजना, अन्न व फळप्रक्रिया, भाजीपाला व कृषी विद्यापीठांचे आधुनिक संशोधित वाण यामुळे महाराष्ट्र राज्याने देशाला अन्नधान्याचे बाबतीत आत्मनिर्भर करणाऱ्या हरितक्रांतीमध्ये महत्त्वाचे योगदान ७०च्या दशकात शेतकरी वर्गाच्या समर्थ साथीने दिले हे कसे विसरता येईल? पुन्हा त्याला पूरक अशा दुग्धव्यवसायाची जबरदस्त जोड देऊन लाखो शेतकरी, शेतमजूर व महिला यांना रोख उत्पन्नदायी जोडधंदा दिला; पण हे घडावे म्हणून हजारो सहकारी दूध संघांचे जाळे सरकार, सहकार खात्याच्या व ग्रामीण कार्यकर्ते यांच्या उपक्रमशीलतेतून उभे केले गेले. शिवाय कुक्कुटपालन, शेळीपालन, मेंढीपालन याद्वारे पूरक उत्पन्नाचे मार्ग दिले गेले.

महाराष्ट्रात हजारो महिला बचतगटांच्या स्थापनेतून लाखो ग्रामीण व वंचित महिलांचे सक्षमीकरण केले गेले व त्यांना राज्याच्या अर्थकारणातील सक्रिय घटक केले गेले. महिला बचतगट ही एक सहकारी चळवळ आहे व याची परंपरा असल्यानेच हे घडले आहे. भारतातील महाराष्ट्राप्रमाणे मोजक्या राज्यांनाच महिला बचतगटांच्या विधायक व आर्थिक सबलीकरणात घवघवीत यश आले हे मान्य करावे लागेल. आता तर शेतकरी उत्पादक गट शेती व शेतकरी



उत्पादन कंपनी स्थापन करून पुन्हा सहकाराच्या मार्गानेच शेतमाल, ज्वारी-बाजरी, तांदूळ, कांदा, द्राक्षे, आंबा, तेल व अन्य फळे, पालेभाज्यांची व फुलांची निर्यात करण्यापर्यंत नव्या पिढीच्या शेतकरी युवकांची मजल गेली आहे. कृषी उत्पादन व प्रक्रिया केलेल्या उत्पादनातही जागतिक बाजारपेठ महाराष्ट्र काबिज करून देशाला परकीय चलन मिळवून देऊन प्रगत शेतकरी राज्याला व शेतकरीवर्गाला पुढे नेत आहेत.

सहकारी कृषिआधारित उद्योगाचे हे नवे दणकट दालन महाराष्ट्राला नव्या उंचीवर नेताना दिसत आहे. मात्र शेती किफायतशीर केली गेली, तरच महाराष्ट्र राज्यातील आत्महत्यांचे महासंकट दूर होऊ शकेल.

| महाराष्ट्र १९६० व महाराष्ट्र २०२२ : एक आकलन | | | | |
|---|---|---|---|---|
| क्षेत्र | १९६०-६१ | १९८०-८१ | २०१०-११ | २०२१-२२ |
| प्राथमिक शाळा | ३४,५९४ | ५१,०४५ | ७५,६९५ | १,०५,८४८ |
| माध्यमिक शाळा | २,४६८ | ६,११९ | २१,३५७ | २८,६१२ |
| रुग्णालये | उपलब्ध नाही | ५३० | १,३६८ | ५८६ |
| रस्ते (कि.मी.) | ३९,२४१ | १,४१,१३१ | २,४१,७१२ | ३,२३,८७३ |
| सहकारी सोसायटी | ३१,५६५ | ६०,७४७ | २,२४,३०६ | २,२२,७३८ |
| रेल्वे (कि.मी.) | ५,०५६ | ५,२३३ | ५,९८४ | ६,२४२ |

(आधार – आर्थिक सर्वेक्षण महाराष्ट्र)

## वैभवशाली वाटचाल !

महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले तेव्हा महाराष्ट्राची वीज उत्पादन, आरोग्य व शिक्षण अशा प्रमुख क्षेत्रातील स्थिती काय होती. आज महाराष्ट्र कुठे आहे हे अभ्यासणे उद्‌बोधक ठरते. यावरून महाराष्ट्र राज्याने केलेली वैभवशाली वाटचाल व अभिमानास्पद विकासप्रवास लक्षात येतो.

| महाराष्ट्र आणि अखिल भारतातून झालेली निर्यात | | |
|---|---|---|
| वर्ष | महाराष्ट्र | अखिल भारत |
| २०२०-२१ | ४,३१,५३२ | २१,५९,०४३ |
| २०२१-२२ | ५,४५,०८४ | ३१,४७,०२१ |
| २०२२-२३+ | २,४७,१४१ | १५,३४,४४३ |

(आधार – महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०२२-२३)

## गुंतवणुकीत 'महा'योगदान

कोणतेही राज्य देशाला किती बळकट करते हे पाहायचे असेल, तर ते राज्य देशाच्या निर्यातीत किती वाटा उचलते व देशाला किती परकीय चलन मिळवून देते आणि त्याद्वारे देशाची अर्थव्यवस्था किती मजबूत करते हे पाहावे लागते. महाराष्ट्र राज्य हे जसे भारताला आयकर व कार्पोरेट कराच्या माध्यमातून जसे खंबीर अर्थबल देते, त्याचप्रकारे महाराष्ट्र निर्यात वा एक्सपोर्टद्वारे देशात दणदणीत वाटा उचलते. देशाच्या एकूण निर्यातीतील महाराष्ट्र राज्याचा वाटा हा घसघशीत १६.१०% आहे ही नक्कीच गौरवाची बाब आहे. महाराष्ट्राचे निर्यातीतील २०२२-२३ या वर्षातील सहभाग हा २ लाख ४७ हजार १४१ कोटी रुपयांचा आहे, तर मार्च २०२४ या महिन्यातील भारतातील एकूण जीएसटी कर संकलन हे १ लाख ७८ हजार ४८४ कोटी झाले व त्यात एकट्या महाराष्ट्र राज्याचा वाटा देशातील सर्वाधिक म्हणजे २७ हजार ६८८ कोटी राहिलेला आहे व हे प्रमाण देशाच्या एकूण जीएसटीतील १५.५१% एवढे भरते. महाराष्ट्रविना राष्ट्र गाडा न चाले असे उगीच नाही म्हटले जात.

| वस्तू व सेवा कर (जीएसटी) : महाराष्ट्र देशात अव्वल (मार्च २०२४ महिन्याचे) संकलन | | |
|---|---|---|
| क्रम | राज्य | जीएसटी वाटा (कोटींमध्ये) |
| १ | महाराष्ट्र | २७, ६८८ |
| २ | कर्नाटक | १३,०१४ |
| ३ | गुजरात | ११,३९२ |
| ४ | तामिळनाडू | ११,०१७ |
| ५ | हरियाणा | ९,५४५ |
| ६ | उत्तरप्रदेश | ९,०८७ |

(आधार – जीएसटी कौन्सिल, भारत सरकार)

## रोजगार निर्मिती योगदान

महाराष्ट्र राज्य हे कृषिउद्योग केंद्रित राज्य असल्याने व प्रारंभापासून हेच महाराष्ट्र राज्याचे सर्वसमावेशक धोरण राहिलेले आहे आणि महत्त्वाचे म्हणजे महाराष्ट्र सरकारने व राज्यातील प्रयोगशील, समाजशील, उद्योगशील धुरीणांनी मनुष्यबळ निर्मितीसाठी अत्यावश्यक असणारे शिक्षण-उच्चशिक्षण व्यवस्थेचे बळकट असे गुणवत्तेचे जाळे उभे केले आहे. त्याच्या परिणामी महाराष्ट्र राज्य हे गेल्या सात दशकात देशातील चांगल्या आणि गुणवत्तेच्या शिक्षणाचे केंद्र झाले आहे.

महाराष्ट्रात दरवर्षी हजारो गुणवान विद्यार्थी महाराष्ट्रात येतात आणि इथल्या गुणवंत विद्यार्थीवर्गाच्या बरोबर येथेच उच्चशिक्षण घेऊन स्थायिक होतात व महाराष्ट्राच्या विकासात लक्षणीय योगदान देतात. महाराष्ट्रात म्हणूनच सूक्ष्म, लघु व मध्यम व कॉर्पोरेट उद्योगांचे महाविश्व तयार झाले आहे, हे कोणालाही मान्य करावे लागेल.

## नावीन्यता आणि स्टार्टअपमध्ये प्रथम

नावीन्यता आणि स्टार्टअपमध्ये महाराष्ट्र राज्य देशात प्रथम क्रमांकावर आहे. स्टार्टअप रँकिंग २०२२ मध्ये महाराष्ट्र राज्याचा टॉप परफॉर्मर श्रेणीमध्ये आहे. डिसेंबर २०२२ पर्यंत देशातील एकूण ८५,६८८ स्टार्टअप्सपैकी १६,०१४ स्टार्टअप्स महाराष्ट्रातील आहेत.

| निवडक राज्यांतील स्टार्टअपची संख्या व त्यातील रोजगार (३१ डिसेंबर २०२२ पर्यंत) – संख्या | | |
|---|---|---|
| राज्य | स्टार्टअप | रोजगार |
| आंध्रप्रदेश | १,३४१ | १२,५५७ |
| गुजरात | ६,१८० | ६४,४२३ |
| कर्नाटक | १०,१३९ | १,१३,५४६ |
| **महाराष्ट्र** | **१६,०१४** | **१,६७,५७१** |
| तामिळनाडू | ५,००४ | ४८,८९८ |
| उत्तरप्रदेश | ७,९५७ | ७८,९५० |

(आधार – महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०२२-२३)

| सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगातील (एमएसएमई) महाराष्ट्राची घोडदौड (नोव्हेंबर २०२२ पर्यंत) | | |
|---|---|---|
| उद्योग | संख्या | रोजगार (लाख) |
| सूक्ष्म | १९,७९,८७७ | ८४.१३ |
| लघु | ५७,१०६ | १४.६३ |
| मध्यम | ६,४५६ | ९.९१ |

(आधार – महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०२२–२३)

### महाराष्ट्र इलेक्ट्रिक व्हेईकल प्रोत्साहन धोरण २०१८

माहे फेब्रुवारी २०१८ मध्ये जाहीर करण्यात आलेल्या 'महाराष्ट्र इलेक्ट्रिक व्हेईकल प्रोत्साहन धोरण'अंतर्गत पाच इलेक्ट्रिक वाहन उत्पादन घटक आणि एका बॅटरी उत्पादन घटकाकडून ८,४२० कोटी प्रस्तावित गुंतवणुकीचे व ९,५०० अपेक्षित रोजगार निर्मितीचे प्रस्ताव प्रगतिपथावर आहेत.



राज्य शासनाने माहे जुलै २०२१ मध्ये 'सुधारित महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण २०२१ जाहीर केले आहे. इलेक्ट्रिक वाहन उत्पादक कारखाने आणि अनुषंगिक संशोधन व विकास सुविधा उभारण्यासाठी प्रोत्साहने देऊन इलेक्ट्रिक वाहन उत्पादन आणि संशोधन व विकास परिसंस्था विकसित करण्यासाठी राज्यात गुंतवणूक आकर्षित करणे, हे धोरणाचे उद्दिष्ट आहे. तसेच राज्यामध्ये ॲडव्हान्स केमिस्ट्री सेल बॅटरीच्या निर्मितीसाठी सन २०२३ पर्यंत किमान एक गिगा फॅक्टरी आकर्षित करण्याचेही उद्दिष्ट आहे. या धोरणांतर्गत ६४,३३७ इलेक्ट्रिक वाहनांकरिता २९,०३३ लाख रुपये प्रोत्साहन निधी मंजूर केला असून, त्यापैकी माहे जानेवारी २०२३ पर्यंत १६,८२४ इलेक्ट्रिक वाहनांकरिता ११,८२७ लाख रुपये निधी वितरित केला आहे.

### सामाजिक न्यायाचे कार्य

सामाजिक न्याय व समतेच्या चळवळीतील महाराष्ट्र राज्याचे मौलिक योगदान राहिलेले आहे. महात्मा जोतिराव फुले, गोपाळ गणेश आगरकर, सावित्रीबाई फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील, महर्षी धोंडो केशव कर्वे, डॉ. पंजाबराव देशमुख, प्रबोधनकार ठाकरे यांच्या समता चळवळीचा अलौकिक वारसा आहे. त्यामुळेच महाराष्ट्र सामाजिक न्यायाबाबत सदैव देशात अव्वल स्थानी राहिलेला आहे, हा इतिहास आहे. राज्यात १९७० च्या दशकात गंभीर दुष्काळ पडला होता, तेव्हा माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक व तत्कालीन विरोधी पक्ष नेत्यांनी एकत्र येऊन क्रांतिकारक अशी रोजगार हमी योजना निर्माण केली. त्यातून गोरगरीब मागासवर्गीयांसाठी रोजगाराची व आजीविकेची हमी दिली. दुष्काळात महाराष्ट्रात लाखो मजुरांना रोजगार मिळाला. अभिमानास्पद बाब म्हणजे पुढे भारत सरकारने ही योजना देशभरात मनरेगा (महात्मा गांधी रोजगार हमी योजना) या नावाने राबवली गेली व अजूनही ती देशभर कार्यरत आहे. महाराष्ट्र राज्याची ही पुरोगामी रोजगार देणगी राष्ट्राला भेट दिली आहे. कोट्यवधी गरिबींची ती आजीविका जगण्याचे माध्यम झाली आहे.

महाराष्ट्रात मनरेगाद्वारे २०२२-२३ वर्षात १९ लाख ३५ हजार कुटुंबांना रोजगार दिला आहे. महिला बचतगट चळवळीत महाराष्ट्र देशात उत्तम कामगिरी करत आहे. लाखो ग्रामीण व शहरी गरीब महिलांना महाराष्ट्राने आर्थिक न्याय व सामाजिक न्यायाचे मौलिक काम केले आहे. महाराष्ट्र राज्याने बहुजन वर्गातील अक्षरशः लाखो पहिल्या पिढीच्या पदवीधर व संशोधक, प्रशासक, प्राध्यापक, अधिकारी-कर्मचारी वर्गाच्या जीवनात मन्वंतर घडवले आहे.

महाराष्ट्र राज्यातील बहुजन वर्गातील हजारो बुद्धिमान युवक भारताच्या सर्व राज्यांमध्ये व जगभरात उत्तम कार्य करताहेत व शेकडोंनी उद्योजकही झालेले आहे. त्यांचे व्यवसाय परिवर्तन ही समाज उन्नतीचा महामार्ग असतो आणि महाराष्ट्राने १९६० ते २०२४ पर्यंतच्या वैभवशाली वाटचालीत लोकविलक्षण असा चौफेर, सर्वांगीण व शाश्वत विकास साधला आहे आणि ही विकासयात्रा यापुढेही अशी व अधिक वेगवान होत जाईल, याची मला अभ्यासक म्हणून खात्री आहे. सामाजिक न्यायाची अधिक गतीने कृती करणारे राज्य महाराष्ट्र आहे, हे कोणीही मान्य करेल.

**(लेखक हे माजी कुलगुरू व सामाजिक शास्त्रांचे अभ्यासक आहेत.)**

( लेख लोकराज्य ऑगस्ट २०२२ मधून पुनर्मुद्रित केला असून लेखातील समाविष्ट सांख्यिकी माहिती अद्ययावत करण्यात आली आहे.)

**देशामध्ये महाराष्ट्र हे पुरोगामी आणि सुसंस्कृत असे अग्रेसर राज्य आहे. कारण महाराष्ट्राच्या हे मोठेपण, अग्रेसरपणाला शाहू-फुले-आंबेडकरांच्या विचारांचा भक्कम पाठिंबा आहे. महाराष्ट्राचे पुरोगामित्व, सुसंस्कृतपणा कशामुळे; त्याची दोन कारणे आहेत. एक म्हणजे महाराष्ट्राची विकेंद्रित आणि ग्रामपातळीपर्यंत पोहोचलेली व रुजलेली अहिंसक पद्धतीची लोकशाही आणि दुसरे म्हणजे मराठी साहित्याची सर्वसमावेशकता होय.**

# लोकशाही आणि मराठी साहित्य

**लक्ष्मीकांत देशमुख**

या लेखातून लोकशाही आणि साहित्याचा संबंध विशद करण्यात येणार आहे. तत्पूर्वी साहित्यिक समीक्षा ही आंतरविद्या पद्धतीने केली जाते आणि त्याचा अवलंब करून लोकशाहीच्या परिकक्षामध्ये मराठी साहित्याची समीक्षा आणि त्याची आतापर्यंतची वाटचाल विशद करण्याचा प्रयत्न या लेखातून होणार आहे.

लोकशाहीची व्याख्या सर्वश्रुत आहे. लोकांची लोकांसाठी लोकांनी चालवलेली राज्यव्यवस्था म्हणजे लोकशाही होय. लोकशाहीचा प्रधान हेतू जनकल्याण, सर्वोदय-अंत्योदय आणि तळागळातील शेवटच्या माणसाचा अश्रू पुसत समता, आर्थिक विकास आणि समज्ञान हा असतो.

## लोकशाही आणि साहित्याचा परस्पर संबंध

साहित्यामध्ये लोकांची, जनतेची प्रतिभा आहे, ही लेखकांची निर्मिती असते. साहित्य हे लोकांसाठी, त्यांच्या सुखदुःखाच्या गोष्टी सांगणारे असते, साहित्य एकप्रकारे लोकांचा आवाज असतो. लोकशाही आणि साहित्याच्या परस्पर संबंधाचे विश्लेषण हिंदीचे एक प्रसिद्ध समीक्षक मॅनेजर पाण्डेय यांनी केले आहे. त्यांचा 'लोकशाही आणि कादंबरी' या दीर्घ निबंधाचा मराठी अनुवाद रंगनाथ पठारे यांनी केला आहे. त्यामध्ये लोकशाही आणि कादंबरी यांचा परस्परपूरक संबंध चांगल्या पद्धतीने दाखवण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांच्या निरीक्षणात कादंबरी आणि लोकशाही यांच्या संबंधांचा विचार करताना लोकशाही ही एक राजकीय व्यवस्था आणि केवळ शासन पद्धतीच नाही तर ती सहिष्णुतेची संस्कृती आहे. इतरांचा आदरभाव दाखवणे, एकमेकांतील अंतराचा स्वीकार करणे आणि विचारांमध्ये अनेकता, मतभेदांचा आदर करणे, आविष्कार, स्वातंत्र्य, संवादाची तत्परता व त्याचा विकास करणारी मानसिकता म्हणजे लोकशाही होय. लोकशाहीची ही सारी वैशिष्ट्ये कादंबरी किंवा साहित्याचा स्वभाव व त्याची संरचना असतात. तीही अशाच मानसिकतेची निर्मिती असते. ती व्यक्तीच्या स्वातंत्र्यासोबत समाजहित लक्षात घेते, हा लोकशाहीचा अनिवार्य असा गुण आहे.

मॅनेजर पाण्डेय यांचे दुसरे निरीक्षण म्हणजे शेतकऱ्यांच्या जीवनाशी कादंबरी जोडली जाणे अर्थात भारतीय समाजाच्या समग्रतेशी जोडले जाणे होय. येथे शेतकरीऐवजी सामान्य भारतीय माणूस हा शब्द जोडण्याचा प्रयत्न केला म्हणजे कादंबरी किंवा साहित्य समाजाच्या समग्रतेशी जोडले जाणारे माध्यम किंवा साधन असते हे आपल्या लक्षात येईल.

## जीवनाची समग्रता

जीवनाची समग्रता म्हणजे काय? देश आणि प्रांतामध्ये राहणारी सर्व जाती, धर्म, पंथ, लिंग, स्त्री-पुरुष, थोर-लहान, शोषक आणि शोषित, कामगार आणि शेतकरी, परिघातील आणि परिघाबाहेरचे, गावातले गावकुसाबाहेरचे लोक या सर्वांना जोडणे, एकत्र करणे होय. म्हणजेच ती एका अर्थाने जीवनाची समग्रता असते. साहित्य हे मूलतः समग्र, सर्वसमावेशक असते. लोकशाहीदेखील नेहमीच समग्र (ऑल इन्क्लुसिव) असते. म्हणून साहित्य आणि लोकशाहीचा अनन्य संबंध आहे. साहित्य माणसाला म्हणजे वाचकाला, समाजघटक म्हणून समाजात वावरताना काही महत्त्वाची जीवनकौशल्य शिकवण्याचा प्रयत्न करतो. पुराणात कथा, कादंबरी, कविता ही आपणास सेवाअनुभूती, मानवी करुणा, मानवी दु:खांबद्दल सांगत असते. कविता ही भावनांचा उत्स्फूर्त आविष्कार असते. ती आपल्याला शांततेचा स्वर



शिकवत असते. सत्य प्रसंग यांवर आधारलेले (नॉन फिक्शन) साहित्य आपल्याला विचार करायला प्रवृत्त करतात. इतरांचे मत, विचार ऐकायला भाग पाडतात. मुख्य म्हणजे विचार करणे, मत बनवणे यासाठी मदत करतात. ही सारी मानवी कौशल्ये जितक्या अधिक प्रमाणात अधिक माणसांमध्ये किंबहुना समाजामध्ये रुजली जातात, तितकीच त्या समाजाची आणि देशाची लोकशाही बळकट होत जाते.

## मराठी साहित्याची वाटचाल

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले. आतापर्यंत मराठी साहित्याचे किती प्रमाणात व कशा पद्धतीने लोकशाहीकरण झाले, ते कितपत योग्य व इष्ट होते तसेच ते लोकशाही मूल्याचे बुरूज राखणारे होते की, नव्हते या परिप्रेक्ष्यामध्ये काही ठळक मुद्दे या लेखात मांडले आहेत. १९६० ते आतापर्यंत मराठी साहित्याची वाटचाल ही दोन भागात विभागण्यात येते. १९६० ते १९९० दरम्यान निर्माण झालेले साठोत्तरी साहित्य आणि १९९१ च्या जागतिकीकरणापासून सुरू झालेले नवदोत्तरी साहित्य. तत्पूर्वी, साठोत्तरी साहित्याचे विवेचन करताना १९४७ पासून १९६० पर्यंतचा भारत आणि महाराष्ट्र हा कसा होता आणि तो कसा बदलत गेला याचे विवेचन करणे आवश्यक आहे. हा कालखंड प्रामुख्याने भारतीय आणि मराठीजनांच्या भ्रमनिराशेचा, अपेक्षाभंगांचा आणि मूल्य आदर्शवादांच्या ऱ्हासाचादेखील होता. बेकारी, भूक, दुष्काळ आणि हतबलतेचा हा कालखंड होता. या काळामध्ये शिक्षणाचा प्रसार फारसा नव्हता. तरीदेखील जे शिकले होते त्यांना नोकऱ्या मिळत नव्हत्या. बेकारीची समस्या भेडसावत होती. असा हा अस्वस्थ कालखंड होता. त्या काळातील साहित्य म्हणजे साठोत्तरी साहित्य. हे कसे होते, या साहित्याची वैशिष्ट्ये काय होती, याची पार्श्वभूमी पाहणे गरजेचे आहे.

मराठी साहित्यामध्ये १९४०-४५ पासून नवसाहित्य हे प्रस्थापित झाले होते. खासकरून मराठी कथा, कादंबरीचे युग सुरू झाले आणि ते १९६० पर्यंत होते; पण हे मराठी साहित्य जिथे अवतरलेले होते ते अभिजन संस्कृतीचा भाग होता. लेखक हे बहुतांशी उच्चवर्गीय व उच्चवर्णीय समजले गेलेले आणि एकदेशीय होते. हे मराठी नवसाहित्य प्रौढशील होते; परंतु ते आशयाच्या अंगाला नव्हते तर रूपसिद्धी, आविष्कार, सौंदर्यवाद आणि कलावटेच्या अंगाने नवसाहित्य, नवप्रौढशील होते. मध्यमवर्गीय अभिजन मानसिकतेचे चित्रण करणारे साहित्य होते. अभिव्यक्तीच्या अंगाने या काळात साहित्य बदलत गेले. प्रयोगशील झाले; पण आशयाच्या अंगाने ते जुनेच राहिले. मराठी साहित्य हे १९६० पर्यंत प्रामुख्याने उच्चवर्णीय समजले गेलेल्या वर्गसमूहाच्या जीवनाचे चित्रण करणारे होते. त्यात बहुजनांचे जीवन नव्हते, त्यांची सुखदुःखे नव्हती; परंतु या काळामध्ये महाराष्ट्र बदलत चालला होता.

१९६० साल उजाडले, महाराष्ट्राची निर्मिती झाली आणि महाराष्ट्राने प्रगती सुरू केली. महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक परिवर्तनाने वेग पकडला होता. बहुजनांसह बऱ्याच वर्गापर्यंत शिक्षणाची गंगा पोहोचली होती. लोक शिकत होते, विचार करू लागले होते आणि ते ज्ञानासाठी साहित्य वाचत होते. या वर्गातील कलावंतांना मात्र ते वाचत असताना असे जाणवले की, या साहित्याचा आपल्या जीवनाशी काहीही संबंध नाही. म्हणून ते साहित्य त्यांना आपले वाटत नव्हते. त्यामुळे बहुजन समाजातील, तसेच आंबेडकरवादी वर्गसमूहांनी प्रचलित नवसाहित्य व त्यातील आशयापेक्षा अनुबंध आकृतीला महत्त्व देणाऱ्या साहित्याला नाकारात नव्याने दमदारपणे लेखन सुरू केले आणि साठोत्तरी साहित्याने नव्या लोकशाहीकरणाकडे वळण घेतले.

अविनाश सप्रे हे मराठीचे प्रसिद्ध साहित्यिक व समीक्षक होते. साठोत्तरी साहित्याचे वेगळेपण दाखवताना ते म्हणतात की, साठोत्तरी कालखंडात केंद्रस्थानी असणाऱ्या अभिजन नववाङ्मयीन संस्कृतीच्या परिघात वावरणाऱ्या बहुजन संस्कृतीचा रेटा वाढू लागला. परिघातून केंद्राकडे सरकण्याची प्रक्रिया गतिमान झाली आणि साहित्य संस्कृतीचे रूपरंग बदलू लागले होते. साहित्याचे विकेंद्रीकरण आणि जनवादी दृष्टीला प्रतिष्ठा मिळणे, बहुस्तरीय वास्तवाचे साहित्यातील प्रगतीकरण, समानतेपेक्षा वेगळेपणाचे अधिकपण, संस्कृतीचा नवा मूल्यविचार ही साठोत्तरी साहित्याची खास वेगळी वैशिष्ट्ये होती. ही त्यापूर्वी मराठी साहित्यामध्ये कधीही आलेली नव्हती. हेच ते मूलभूत सूत्र असणारे साहित्याचे लोकशाहीकरण आहे. त्यात विकेंद्रीकरण म्हणजे दलित, स्त्री, ग्रामीण बहुजन समाजाचा सहभाग आणि त्यांच्या सहभागाने होणारे समग्रीकरण होय. म्हणून साहित्य आणि मराठी लोकशाही याचा अनन्य संबंध आहे.

## दलित साहित्य चळवळ

साठोत्तरी साहित्यामध्ये तीन चळवळी खूप महत्त्वाच्या आहेत. पहिली चळवळ ही दलित साहित्य चळवळ होती. दलित साहित्याची निर्मिती हे मराठी साहित्याचे एक अत्यंत वैभवशाली पर्व होते. मराठी दलित साहित्यामध्ये भारतातील दलित साहित्य प्रस्थापित झाले. ही भारतीय साहित्याला मराठी साहित्याने दिलेली साहित्याची देणगी आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. आत्मभान, आत्मशोध, नकार आणि विद्रोह ही दलित साहित्याची आशयसूत्रे होती. या आशय सूत्रांमुळे व त्याच्या जोरकस अभिव्यक्तीमुळे दलित साहित्य मराठी साठोत्तरी साहित्यात नवे म्हणून तुतारी फुंकत आले किंवा उत्तीर्ण झाले, असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

या साहित्याची जी भूमिका होती, ती अशी की जीवनाचे सत्य हे सांगितलेच पाहिजे. तसेच जे जाती धर्मव्यवस्थेने अराजक आणि शोषण केले आहे, त्याला आपण सामोरे गेले पाहिजे. स्वतःचे स्वातंत्र्य आणि

### साहित्यातून संस्कृतीकडे

साहित्यातून संस्कृतीकडे ही मराठी साहित्याची होणारी वाटचाल हे साठोत्तरी साहित्याचे प्रधान वैशिष्ट्य होते. साठोत्तरी साहित्याचा आढावा घेताना अनियतकालिक अर्थात लघुपत्रिकांची चळवळ विचारात घेतली पाहिजे. अशोक शहाणे यांचा एक लेख 'मराठी साहित्यातील क्षकिरणे' आणि भालचंद्र नेमाडे यांचा लेखकाचा लेखकराव होतो, तो का? या दोन लेखकांच्या समीक्षालेखामुळे ही चळवळ वाचकांच्या मनापर्यंत पोहोचली आणि तिची चर्चा सुरू झाली. या चळवळीने किंवा तिच्या प्रभावाने साठोत्तरी साहित्याला एक नवे वळण व दृष्टी मिळाली. या चळवळीने आपल्याला एक नवीन प्रयोगशील जीवनवादी संवेदना दिली. यांत्रिकी व पुस्तकी भाषेचे अवाजवी महत्त्व कमी केले व बोलीभाषेला नवी प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. केवळ इंग्रजी साहित्यामुळे आपल्याला जागतिक भान येत नाही तर इतर परकीय भाषेचे साहित्य भाषांतर करून वाचले पाहिजे. तसेच भारतातील इतर भाषेमध्ये साहित्य निर्माण होते त्याचेदेखील वाचन केले पाहिजे. डोळसपणे अवलोकन केले पाहिजे. याद्वारे नवीदृष्टी येईल, त्यातून हे साहित्य लिहिले तर मराठी साहित्य हे अधिक व्यापक आणि सर्वसमावेशक होईल, ही भूमिका या नियतकालिकांनी मांडली आणि ती प्रस्थापित झाली.

## स्त्रीवादी साहित्य

१९७५ साल हे मराठी साहित्यासाठी आणि एकंदरीत स्त्रियांसाठी फार महत्त्वाचे होते. त्यावर्षी आंतरराष्ट्रीय महिला हक्क दिवस साजरा झाला होता आणि आंतरराष्ट्रीय महिला परिषददेखील झालेली होती. तेव्हापासून महाराष्ट्रामध्ये स्त्री मुक्ती चळवळीचा प्रारंभ झाला. भारतामध्ये महाराष्ट्रामध्ये स्त्री ही धर्म, संस्कृती, पुरुषसत्ताक समाजामुळे भरडली, सोसली जाते. तिच्यावर अन्याय होतो आणि तो अन्याय दूर झाला पाहिजे. स्त्री एक माणूस आहे, तिला माणूस म्हणून जगता आले पाहिजे. तिला सहज जीवनाचा अधिकार आहे, तिला स्वावलंबी जीवन जगण्याचा अधिकार आहे आणि त्याचा पुरस्कार करणारे साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्य आहे.

महाराष्ट्रामध्ये स्त्री प्रबोधनाची फार मोठी परंपरा आहे. अनेक महापुरुषांनी वेगवेगळे प्रयत्न केले, विचार मांडले. त्यातून महाराष्ट्रात समाजमन घडत गेले होते. त्यामुळे त्याला साहित्यामध्ये जोरदार चालना मिळाली. एका अर्थाने ही स्त्रीमुक्तीची चळवळ होती. अर्थातच स्त्रीमुक्ती म्हणजेच मानवमुक्ती चळवळ होती. त्यातूनच मराठी साहित्याला स्त्रीवादी वळण लागले. अनेक लेखिकांनी उदाहरणार्थ मेघना पेठे, गौरी देशपांडे यांनी अतिशय वेगळे वेधक असे लिखाण केले. त्यांच्या साहित्यामध्ये स्त्री-पुरुष संबंध, विवाहसंस्थेत स्त्रीची होणारी घुसमट, गळचेपी, आत्मशोध होता. शारीरिक लैंगिक जाणिवा हे स्त्रीवादी साहित्याचे विषय होते.

स्त्री या काळामध्ये बदलत गेली. स्वावलंबी आणि शिक्षित झाली; परंतु पुरुष मानसिकता न बदलल्यामुळे स्त्रीवर होणाऱ्या पुरुषी अन्यायाला वाचा फुटत गेली. त्यामुळे पुरुषांचे आत्मभानदेखील जागृत झाले, हे या साहित्याचे फार मोठे योगदान म्हटले पाहिजे. या काळामध्ये मुख्य साहित्यही बरेच होते आणि या साहित्याने जे नवीन वळण घेतले त्याचे काही घटक होते. त्यामध्ये पहिला घटक साहित्य संस्कृतीचे विकेंद्रीकरण, वास्तवतेचे प्राबल्य, जीवनातील प्रश्नास थेट भिडणे, बदलत चाललेल्या मध्यमवर्गीय जीवनाचे ताणतणाव त्यामध्ये होते.

राजकारण, दुष्काळ, बेकारी, सामाजिक हिंसा, क्रौर्य, औद्योगिक विश्व, समाजाचे ऱ्हासपर्व, मानवीसंवेदना हे विषय प्रभावी हाताळले गेले. थोडक्यात साठोत्तरी साहित्य हे एका अर्थाने बहुजन साहित्य होते आणि त्याला एक निर्णायक स्वरूपाचे बहुजनवादी वळण लागले. त्यांनी अभिजनवादी संस्कृतीवर मात केली. हे साहित्य अधिक खुले आणि बहुजनवादी, अधिक लोकशाहीवादी झाले. लोकशाहीमध्ये बहुसंख्य लोकांचा आवाज महत्त्वाचा असतो. म्हणून मराठी साहित्यामध्ये बहुजनांचे लेखन हे साठोत्तरी कालखंडात होत गेले. त्यामुळे ते अधिक लोकशाहीवादी होते.

मानवमुक्ती ही आपण शोधलीच पाहिजे. माणसाची प्रतिष्ठा आणि माणसाचा आत्मसन्मान हा संविधानाने प्रत्येक माणसाला दिलेला मौलिक अधिकार आहे. तो दलित साहित्यात प्रस्थापित करण्याचे काम दलित साहित्य चळवळीने केले. मला जे सांगायचे आहे ते मी माझ्याच पद्धतीने माझ्याच भाषेमध्ये कुठल्याही साहित्याचे अनुकरण न करता सांगेन, अशी त्यांची भूमिका होती. त्यामुळे दलित साहित्य समजून घेण्यासाठी मराठी साहित्य समीक्षा बदलली. मराठी सौंदर्यवादाला नवे वळण आले आणि त्याचेदेखील दलित साहित्यात मोठे योगदान आहे, असे म्हटले पाहिजे. दलित साहित्याने प्रामुख्याने आत्मकथा आणि कविता या दोन साहित्य प्रकारांमध्ये विपुल लेखन केलेले दिसून येते. त्यामानाने कथा आणि कादंबरी हे कमी प्रमाणात निर्माण झाले, याची नोंद घेतली पाहिजे. दलित साहित्याने नामदेव ढसाळ यांच्या रूपाने केवळ भारतालाच नव्हे, तर जगाला महाकवी दिला. त्यांचा 'गोलपिठा' हा काव्यसंग्रह पाहिला, तर दलित विद्रोह, वेदना आणि नकाराचे अत्यंत ज्वालाग्रही, प्रखर वर्णन मनाला भिडणारे होते. त्यांची भाषा अत्यंत वेगळी आणि मराठी साहित्यिक माणसाला धक्का देणारी होती; परंतु ती ज्या पद्धतीने, कलात्मकतेने मांडली गेली त्या महाकवीची भारताने दखल घेतली, आणि भाषांतराच्या माध्यमातून तो सर्वांपर्यंत पोहोचला गेला. त्या मराठी साहित्याची पताका सातासमुद्रापार लावण्याची कामगिरी सर्वप्रथम जुन्या काळामध्ये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी केली होती आणि त्यानंतर ती प्रामुख्याने नामदेव ढसाळांनी केली, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. दलित साहित्याने मराठी साहित्याला अनेक मोठे लेखक दिले, त्यांची संख्या खूप आहे; परंतु प्रामुख्याने दया पवार, बाबुराव बागुल, यशवंत मनोहर, दत्ता भगत आणि शरणकुमार लिंबाळे यांची नावे घेतली पाहिजेत.

या प्रमुख साहित्यिकांनी मराठी दलित साहित्याला प्रतिष्ठा दिली, प्रस्थापित केले आणि मराठी साहित्याचा तो एक मुख्य दमदार प्रभाव बनला. नारायण सुर्वे यांच्यामुळे दलित कवितेला एक नवे वळण याच काळामध्ये लागले. मी कामगार आहे, तळपती तलवार आहे, असे म्हणत ते मराठी काव्य साहित्यामध्ये अवतरले. त्यांनी मराठी दलित कवितेला कामगार दुःखाचे एक कलम जोडले. दलित कवितेतून प्रामुख्याने जात व्यवस्थेत भरडल्या गेलेल्या माणसाचे दुःख प्रकट झाले. त्यांच्या कवितेमधून भांडवलशाहीमार्फत होणाऱ्या कामगाराच्या शोषणाचे आणि त्यांच्या दुःख वेदनेचे प्रकटीकरण झाले व त्यांच्या व्यथावेदनांना वाट मिळाली. त्यामुळे दलित साहित्य हे शोषितांचे साहित्य आहे, त्यांचा आवाज आहे, यावर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले. अशी ही दलित चळवळ १९६० पासून १९८० पर्यंत खूप बहरत होती. त्यामध्ये अनेक लोकांनी उत्तम सकस साहित्य निर्माण केले. मराठी साहित्याचा हा दलित प्रवाह समृद्ध झाला; परंतु कोणत्याही चळवळीप्रमाणे दलित चळवळीला देखील १९८० सालानंतर ओहोटी लागत गेली. त्यामुळे दलित साहित्याचा जोर ओसरला; पण दलित साहित्याने दलित माणसाला साहित्याच्या केंद्रस्थानी आणले आणि त्यामुळे सामान्य माणसाची जाण समृद्ध झाली. दलितांबद्दलची संवेदना निर्माण झाली आणि लोकशाही व्यवस्थेत हेच अपेक्षित असते. एका अर्थाने दलित साहित्याने मराठी साहित्याचे लोकशाहीकरण अधिक वेगवान केले.

## ग्रामीण साहित्य चळवळ

दुसरी चळवळ होती ती दलित ग्रामीण चळवळ. दलित वर्गापलीकडे बहुजनांचा फार मोठा वर्गसमूह आहे. हा बहुजन समाज प्रामुख्याने ग्रामीण आहे. शेती, शेतीपूरक व्यवसाय त्यांचा जगण्याचा आधार आहे. हा सारा वर्ग ग्रामीण मानला जातो. म्हणून या माणसांचे जीवन, त्यांचे कष्ट मांडणारे साहित्य म्हणजे ग्रामीण साहित्य होय. या साहित्य चळवळीची सुरुवात आनंद यादव आणि रावसाहेब रं. बोराडे यांनी केली आणि तिला एक समीक्षा करून सिद्धान्ताचे रूप दिले. रावसाहेब रं. बोराडे यांच्या 'पाचोळा' कादंबरीपासून ग्रामीण साहित्याची चळवळ मराठी साहित्यात खूप मोठ्या प्रमाणात झालेली आहे. या साहित्यामध्ये ग्रामीण वास्तव होते. राजकारण, सत्ताकारण, शेतकऱ्यांचे दुःख, ग्रामीण जीवनाची अगतिकता होती. परंपरा, श्रद्धा, अंधश्रद्धेचे ओझे होते, मोडून पडलेला गावगाडा होता. नव्या संस्थांची निर्मिती म्हणजेच पंचायतराज, सहकारी संस्था त्यातून आलेल्या मूठभरांची समृद्धी व त्या भोवती फिरणारे राजकारण सत्ताकारण होते. हे सारे मराठी साहित्यात पूर्वी आले नव्हते; परंतु या साहित्याच्या काही मर्यादादेखील आहेत. या मर्यादा अविनाश सप्रे या समीक्षकांनी व्यक्त केलेल्या आहेत. ते म्हणतात, 'वस्तूतः महात्मा फुले यांच्या बंडखोर बहुजनवादी विचारांचा भक्कम आधार या चळवळीला घेता आला असता. शेतकरी, कष्टकरी, कामगार, बहिष्कृत आणि स्त्रियांच्या संदर्भात प्रस्थापित संस्कृतीच्या वर्मावर घाव घालून पर्यायी समताधिष्ठित व्यापक व मानवतावादी समाजाचा उद्घोष केला असता. या पद्धतीमध्ये हे साहित्य लिहिले गेले असते तर ते अधिक समृद्ध झाले असते, असे सप्रे यांचे म्हणणे आहे. ते एका मर्यादेत बरोबर आहे; परंतु ग्रामीण साहित्याने महात्मा फुले यांना मानत लिखाण केलेले आहे. एक नवे साहित्यशास्त्र, सौंदर्यशास्त्र निर्माण केले आहे, हे मान्य केले पाहिजे.

## नव्वदोत्तरीतील साहित्य

लेखातील दुसरा टप्पा म्हणजे १९९० ते आतापर्यंतचा कालखंड, त्याला नव्वदोत्तरीतील साहित्य असे म्हटले जाते. हे पर्व वेगळे आहे. स्वातंत्र्य मिळाल्यापासून १९४७ ते १९९० पर्यंत भारतीय लोकशाहीचे स्वरूप व तोंडवळा हा प्रामुख्याने समाजवादी, लोक जनव्यवस्थेचा होता. त्याचेच प्रतिबिंब कमी अधिक प्रमाणामध्ये साहित्यात प्रसरत गेले; परंतु १९९१ सालात भारताने आर्थिक वळण घेतले आणि भारत पूर्वीचा राहिला नाही. येथील विकास संस्कृती म्हणजेच खासगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण हे आर्थिक धोरण आपण स्वीकारले होते. अर्थव्यवस्था प्रबळ झाली होती. विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रामध्ये जे पारंगत होते, अशा मूठभर लोकांची एकाधिकारशाही प्रस्थापित होण्याच्या मार्गावर होती. तिचे स्वरूप आयटी होते. सहकारी तत्त्वाऐवजी स्पर्धा तीही जीवघेणी आणि मूल्यविहिन स्पर्धा हे या नव्या पर्वाचे लक्षण होते.

१९९० नंतरचा कालखंड म्हणजे विचारसरणीच्या अंताचा (एंड ऑफ आयडीओलॉजी), संस्कृती संघर्षाचा कालखंड होता. हा कालखंड उद्योगस्नेही, नवअभिजन समूह उच्चस्वाचा होता. शिक्षण, जनकल्याण, सामाजिक न्याय या क्षेत्रात सरकारने पाय काढून घेण्याचा हा कालखंड असल्यामुळे विज्ञानाने वैज्ञानिक दृष्टिकोन दिला; परंतु याकडे पाठ फिरवली असा हा कालखंड होता. अत्यंत वेगवान,जीवघेण्या स्पर्धेचा हा कालखंड होता. माणसापेक्षा पैशाला महत्त्व असणारे हे पर्व होते. एका अर्थाने भांडवलशाही प्रवृत्तीचा होणारा प्रभाव हे या कालखंडाचे सर्वात मोठे वैशिष्ट्ये होते.

नव्या अर्थाने बळी तो कानपिळी हा जंगल कायदा व्यवस्थापनाचा कालखंड होता. त्यामुळे मानवीमूल्यांची प्रतिष्ठा कमी होत गेली. या साऱ्यांचे कमीअधिक पडसाद पडत गेले. हा कालखंड एका अर्थाने व्यामिश्र कालखंड होता. ही व्यामिश्रता केवळ विसंगत नव्हती, तर ती एक प्रकारची व्यामिश्र बायनर स्वरूपाची होती. यापूर्वीची व्यामिश्रता ही भांडवलशाहीविरुद्ध समाजवाद, बुर्झ्वाविरुद्ध सर्वहारा, पुरोगामीविरुद्ध प्रतिगामी स्वरूपाची द्विध्रुवीय होती. आज मात्र ती भांडवलशाहीविरुद्ध धार्मिकविरुद्ध जीवन अशा चमत्कारिक स्तरावर गेली आहे. अशा असंगत चौकटीत अगणित आहेत. त्यामुळे समाज अनेक पातळीवर विखंडित झाला. त्या साऱ्या साहित्याचे या कालखंडात कसे पडसाद उमटत गेले. रंगनाथ पठारे यांनी मराठी संस्कृतीचे सखोल आकलन आपल्या साहित्यातून व्यक्त केलेले आहे. आणि मराठी साहित्य समृद्ध झाले आहे, असे म्हटले पाहिजे. राजन गवस हे कशीजन संस्कृतीचे दर्शन घडवतात. भांडवलशाहीच्या काळात दुर्बल माणसाला जगता येत नाही. प्राणी, पशुपक्ष्यांनाही दाणा मिळत नाही अशा कालखंडामध्ये त्यांना जगायचा अधिकार आहे की नाही असे प्रश्न उपस्थित करणारे लेखन त्यांनी केले होते. तिसरे तरुण लेखक प्रवीण दशरथ बांदेकर यांनी त्यांच्या साहित्यामधून भांडवलशाही ही समाजघातक आहे. ती समता कशी नाकारते व पर्यावरणाचा कसा विध्वंस करते, यावर त्यांनी अत्यंत प्रखर भाष्य केलेले आहे. अलीकडे ज्यांना सन्मान प्राप्त झाला ते शरणकुमार लिंबाळे यांचे कादंबरीलेखन म्हणजे समग्र दलित भान देणारे आहे. ज्ञानपीठकार भालचंद्र नेमाडे यांचा प्रभाव आजही कायम आहे. हे दोन्ही कालखंड त्यांच्या प्रभावाने, विचाराने व्यापले गेलेले आहेत, असे म्हणले तर वावगे होणार नाही.

१९९० नंतरचा बदलता समाज व जग कसे बहुपिढी व्यामिश्र आणि गुंतागुंतीचे झालेले आहे हे लक्षात येते; पण आज नवतंत्रज्ञान, माहिती, व्हर्चुअल आभासी जगामध्ये आलेले एकटेपण, समाजविमुक्तता, चंगळवाद आणि एकाचवेळी भारतात तीन सत्तांचा जसे कृषी, औद्योगिक आणि जागतिकीकरणानंतरचा वर्ग असणे व त्यांचे हितसंबंध परस्परविरोधी असणे हे सारे जीवनप्रवाह विलक्षण गुंतागुंतीचे झालेले आहेत; पण २१व्या शतकातील वेगवान बदलाचे आणि अनिष्ट असले तरी आमूलाग्र परिवर्तनाचे समग्र आकलन करणारे साहित्य अभावाने मराठी साहित्यामध्ये निर्माण झाले आहे. त्याला भालचंद्र नेमाडे, रंगनाथ पठारे आदींसारखे महत्त्वाचे लेखक अपवाद आहेत; परंतु आज नवीन लेखक ज्यांच्याकडून आशय निर्माण झालेले आहेत. ते हे नवे पर्व, नवे परिवर्तन समग्रतेने ओळखायचा प्रयत्न करत आहेत. एकूणच हा बदल अधिक समर्थपणे टिपला तर वाचक व समाज सजग होईल, असा सजग समाज लोकशाहीच्या व्यवस्थेला प्रश्न विचारेल आणि सर्वांना सामावून घेणारी, सर्वांची काळजी वाहणारी, गरिबांना सामाजिक न्याय देणारी लोकशाही बळकट होईल. साहित्याचे असे समर्थ, सर्वांना न्याय देणारे समाजमन घडवणारे लोकशाहीकरण व्हावे, हीच अपेक्षा.

**(लेखक हे निवृत्त सनदी अधिकारी असून,**
**अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष आहेत.)**

**इतिहासात राजाश्रयाने अनेक संप्रदाय मोठे झालेले आपल्याला पाहायला मिळातात, पण वारकरी संपद्राय हा लोकाश्रयानेच मोठा झाला आहे. आषाढी एकादशीच्या निमित्ताने दुथडी भरून वाहणाऱ्या नदीसारखा वारकऱ्यांचा जनसमूह, दरवर्षी ज्ञानबातुकारामच्या जयघोषात व टाळ-मृदंगाच्या गजरात पंढरपूरकडे जातो. ५०-६० वर्षांपूर्वी काही हजारात मोजता येईल, अशी संख्या असणारा वारकरी समुदाय आज लाखोंच्या संख्येने पंढरपूर मार्गावर पायी चालताना दिसतो.**

# ।। वारी एक आनंदयात्रा ।।

**संदेश भंडारे**

छायाचित्रामध्ये एखादा प्रसंग गोठवून ठेवण्याची क्षमता मला छायाचित्रण करायला प्रवृत्त करते. असाच एक प्रसंग गेली अनेक वर्षे माझ्या डोळ्यांसमोरून जात नाही. पुंडलिकाने जशी आपल्या आईवडिलांना बरोबर घेऊन वारी केली व त्यांना चंद्रभागेत स्नान घातले. वारकरी आज आपल्या आईवडिलांची तशीच सेवा करताना दिसतात. २००१ साली आषाढी एकादशीला गेलो असताना हे दृष्य दिसले. वारी परंपरेमध्ये असणारी सेवाभावी वृत्ती या छायाचित्रात पकडता आली याचा आनंद वाटला. त्यात ज्येष्ठ वारकरी पाणी अंगावर पडताना शांत चित्ताने डोळे मिटून समाधान अनुभवत होता. पायी वारी केल्यानंतरच्या या स्नानाने त्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसत होते. आठशे वर्षांच्या या वारी पंरपरेचा छायाचित्रात्मक शोध घेण्याची प्रेरणा त्या छायाचित्राने मिळाली.

'वारी एक आनंदयात्रा' हे पुस्तक प्रसिद्ध झाल्यावर छायाचित्रातील शंकर भैरू गाडे या गडहिंग्लज तालुक्यातील वारकऱ्याची भेट झाली. त्यांना स्नान घालणारी ती माणसे त्यांच्या कुटुंबातील नव्हती; एवढेच नाही तर ती त्यांच्या ओळखीचीदेखील नव्हती, ना ती एका दिंडीतील होती. हे त्यांच्याकडून समजले. वडीलधारी व्यक्ती एकटीच स्नान करताना पाहून त्यांनी ती व्यक्ती आपल्याच कुटुंबातील असे समजून स्नान घालणे, या मिळालेल्या माहितीमुळे टिपलेला प्रसंग एका वेगळ्याच पातळीवर पोहोचला.

पंढरपूरच्या वारीला वारकरी कोणत्या प्रेरणेने जातात? दोन-अडीचशे किलोमीटर, ऊनपावसाची पर्वा न करता कसे काय चालत जातात? चंद्रभागेतील स्नानाने काय मिळते? अशा प्रश्नांची उत्तरे या प्रसंगाने मिळाली. वारकऱ्यांना कोणत्या प्रकारचे आत्मिक समाधान मिळत असेल हे त्या प्रसंगातून दिसत होते.

वारीची प्रथा कधी सुरू झाली याबद्दल निश्चित माहिती उपलब्ध नाही, परंतु ज्ञानेश्वरांचे वडील विठ्ठलपंत हे आषाढी व कार्तिकी वारीत पंढरपूरला गेल्याचा उल्लेख संत नामदेवांनी केलेला आहे. म्हणजे किमान आठशे वर्षांपासून वारीची परंपरा महाराष्ट्रात होती असे म्हणता येईल. वारीची प्रथा तुकाराम महाराजांच्या घरातही होती. त्यांच्याबरोबर चौदाशे टाळकरी होते असे सांगतात, तुकाराम महाराज ज्येष्ठ वद्य अष्टमीला आळंदीला जायचे. ज्ञानेश्वर महाराजांच्या समाधीचे दर्शन घ्यायचे आणि नवमीला पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान करायचे.

गेली सात-आठशे वर्षे ऊनपावसाची पर्वा न करता ज्ञानोबा-तुकारामचा जयघोष करत लाखो वारकरी देहू-आळंदीपासून पंढरपूरपर्यंत आषाढी-कार्तिकी पायी वारी करतात. वारीला कोणी आयोजक नाही ना प्रायोजक. त्यासाठी कुणी जाहिरात करत नाही.

वारीमध्ये उच्चशिक्षितांपासून ते निरक्षरांपर्यंत, श्रीमंतांपासून ते गरिबांपर्यंत सर्वजण एकोप्याने प्रवास करतात. खेड्यातील शेतकरी, देवळातला पुजारी, गावचा जमीनदार आणि त्याच्याकडे असलेला गडी, वाड्याचा मालक आणि वाडा झाडणारा घरगडी, कीर्तन-प्रवचन करणारे महाराज ते स्वयंपाक करणारे आचारी हे सारे तितक्याच भक्तिभावाने आणि श्रद्धेने वारीच्या जनसमुदायात एकरूप झालेले असतात. विठोबाच्या भेटीच्या निमित्ताने झालेल्या प्रवासामुळे अनेक फायदे होतात. आपले गाव सोडून इतर भू-प्रदेशाचे निरीक्षण होते. पीक-पाण्याची स्थिती समजते. समाजजीवनातील बदल, स्थित्यंतरे समजतात. कमीत कमी गरजांमध्ये दिवस काढण्याचा अनुभव मिळतो.



सांसारिक दुःखांमध्ये गळ्यापर्यंत बुडलेल्या माणसाला वारीत सामील झाल्याने, तत्कालीन संसारमुक्ती प्राप्त होते. विठ्ठलाच्या समोर सारे

एक आहेत. फक्त विठ्ठलभक्त आहेत. अन्य कुणीही नाही. ही समता आणि माणुसकीची शिकवण या वारीच्या निमित्ताने रुजविली जाते. आज भौतिक सुखांची रेलचेल असलेल्या काळातसुद्धा, हजारो भक्तगण प्रखर उन्हातान्हात पायी वारीत मोठ्या प्रमाणावर सहभागी होताना दिसतात. हरिनामाचा नि संतांचा जयघोष करीत सुमारे २५० किलोमीटर चालत गेल्यावर पंढरपुरातील पांडुरंगाच्या दर्शनाने वारकरी धन्य होतो. वारी करून परतलेला वारकरी, जीवनात एक नवचैतन्य घेऊनच परततो. सर्वसामान्यपणे प्रापंचिक माणसाला हठयोग, कठीण व्रतवैकल्य, गहन तत्त्वज्ञान, ग्रंथाचे पारायण, तत्त्वचर्चा अशा गोष्टी अवघड वाटणे स्वाभाविक आहे. यासाठी सुलभ भक्तिमार्ग वारकरी संप्रदायाने निर्माण केला. भक्ती व उपासना करणे ही तपस्वी, योगी, तत्त्वचचर्चा करणारे पंडित यांनाच फक्त शक्य असलेली बाब नाही, तर आपणही संसार करता करता भक्ती करू शकतो, असा दिलासा संप्रदायाने समाजाला दिला. त्यामुळे प्रपंची भक्तिमार्गाकडे मोठ्या प्रमाणात वळले. संप्रदायातील संतांच्या अनेक अभंगांमध्ये देव हा माता, पिता, बंधू, सखा आहे, या संकल्पना आढळतात.



## भेदाभेद नाही

ईश्वराने सर्व प्राणिमात्रांना निर्माण केले. मग तो उच्चनीच असा भेदाभेद करणार नाही, हा विचार संप्रदायाने मांडला. श्रेष्ठत्व-कनिष्ठत्व किंवा जातिभेद यांना थारा दिला नाही. परमेश्वराची भक्ती करण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे, हा विचार वारकरी संप्रदायाने मांडला. वारकरी संप्रदायांच्या संतांची नावे पाहिली तरी त्यामध्ये सर्वसमावेशकता दिसते. वारकरी संप्रदायात ज्ञानदेव, नामदेव शिंपी, चोखोबा, बंका महाराज, नरहरी सोनार, सावता माळी, गोरा कुंभार, सेना न्हावी, तुकोबा वाणी, एकनाथ आदी संत झाले. त्याचप्रमाणे मुक्ताबाई, जनाबाई, निर्मळा, कान्होपात्रा, बहिणाबाई या संत- कवयित्रीही आहेत. या नावांना सांप्रदायिक महत्त्व आहे, तसेच सामाजिक महत्त्वही आहे. त्या काळी स्त्री-शूद्रांना भक्ती करण्याचा किंवा मोक्ष मिळविण्याचा अधिकार नाही, असे मानणाऱ्या प्रस्थापितांवर वारकरी संप्रदायाने कठोर प्रहार केलेला आपणास दिसतो. ज्या काळात स्त्रीस्वातंत्र्य, स्त्रियांचे हक्क अशा कल्पनाही सुचणे शक्य नव्हते अशा काळात संप्रदायाचे हे कार्य फारच मोठे ठरते. ज्ञानेश्वर भावंडापैकी मुक्ताबाई (१२७९-१२९७), नामदेवाची दासी जनाबाई (१२६० ते १३५३), तुकारामाची शिष्या बहिणाबाई (१६२८-१७०८) या समर्थ कवयित्री होऊन गेल्या. त्यांनी भक्तिपंथात आपले स्थान निश्चित केले, परमार्थकारणात स्त्रियाही उच्चपदाला पोहोचू शकतात, हे त्यांनी दाखवून दिले आणि म्हणून स्त्रियाही माळकरी बनून, पंढरपूरची वारी करू लागल्या.

## कर्तव्य सोडू नका

संत ज्ञानेश्वर, आपली कर्तव्ये सोडू नका असे सांगत, ज्ञानेश्वरीत कर्म, ज्ञान, भक्ती अशा तीन योगांबद्दल सांगितले आहे. संस्कृत भाषेत असलेली गीता ही त्यांनी मराठी भाषेत आणली. त्यामुळेच ज्ञानेश्वरांना वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञ व अध्यात्मिक गुरु मानतात. संत एकनाथांच्या भारुडामध्ये लोकांचे प्रबोधन करायचे आहे. भेदरहित वारीत जायचे आहे. अशी वर्णन मिळतात. त्यांच्या रचनांमध्ये कर्मकांड, अंधश्रद्धा यांच्या विरोधात भाष्ये आहेत. लोकांच्या रंजनाबरोबर भक्तिमार्गाची शिकवण द्यायची ही गोष्ट त्यांनी भारुडांमधून साधली होती. त्यांनी गोंधळी, भराडी, वासुदेव, डोंबारी, महार आदींमध्ये विठ्ठलभक्तीचे लोण पसरवले. विशेषतः भटक्या जमातीतील लोकांना त्यांनी भक्तिमार्गाची दिशा दाखविली.

तुकाराम महाराज हे ज्ञानदेवांच्या परंपरेतील एक संत होते. त्यांच्यामध्ये ज्ञान, भक्ती आणि वैराग्य यांचा सुरेख संगम झाला आहे. उच्च-नीच भावना समाजाने टाकून देण्याबाबत ते उपदेश करतात. धर्माच्या नावाखाली माजलेल्या अनाचाराबद्दल तुकाराम महाराजांनी आपल्या अंभगात कोरडे ओढले आहेत. भुतेखेते, क्षुद्र देवतांची उपासना, मंत्रतंत्र, जादूटोणा आणि दांभिकपणा यापासून त्यांना समाजाला दूर न्यायचे होते. तुकाराम महाराज खऱ्या अर्थाने लोककवी होते. पूर्ण हयात ते सामान्य लोकांत वावरले. त्यांचे अभंग म्हणीसारखे लोकांच्या तोंडात बसले. त्या काळातील जनजीवन त्यांच्या अभंगांमुळे आपल्याला आज कळते.

पालखी निघाली की, तिच्या पुढे-मागे दिंड्या क्रमाने उभ्या राहतात. हा क्रमांक पालखीपासून पुढे आणि मागे अशा पद्धतीने असतो. प्रत्येक दिंडीच्या अग्रभागी भगव्या पताका घेतलेले त्या दिंडीचे झेंडेकरी असतात. हा रंगही ठरलेला असतो. हा भगवा, चकचकीत भगवा नसून मातकट रंगाचा असतो. काहीसे मातकट रंगाचे मांजरपाटाचे कापड कावेत बुडवल्यावर जो रंग तयार होतो तो या पताकीचा रंग असतो. झेंडेकऱ्यांच्या मागे टाळकरी व वारकरी चौघांच्या रेषेत चालत असतात. मध्यभागी मृदंग असतो, तर दिंडीच्या शेवटी विणेकरी असतो. हे विणेकरी दिंडी नियंत्रित करतात. विणेकऱ्यांच्या पाठीमागे महिला वारकरी असतात. त्यापैकी काहींच्या डोक्यावर तुळशी वृंदावन तर काहींच्या डोक्यावर पाण्याने भरलेला हंडा असतो. भजन करीत वाटचाल करणाऱ्या वारकऱ्यांची तहान या हंड्यातील पाण्याने भागवली जाते. दिंड्या नसलेले अनेक वारकरी डोक्यावर बोचकी घेऊन, सोहळ्यात पुढे चालत असतात. कोणत्याही दिंडीत नसलेल्या वारकऱ्यांची संख्या मोठी असते. दिंडीकरी त्यांचा मोकळा समाज असा उल्लेख करतात. हा मोकळा समाज वाटेत येणाऱ्या गावकऱ्यांच्या सेवेवर सर्वस्वी अवलंबून असतो. त्यांचे राहणे, खाणे वारीमार्गातील गावकरी करतात.

## अभंग म्हणण्याचा क्रम

दिंड्यांमध्ये अभंग म्हणण्याचा निश्चित क्रम ठरलेला असतो. या क्रमानुसार अंभग असणारी पुस्तके उपलब्ध असतात. वारीमध्ये नवीन सामील होणारे वारकरी हे पुस्तक हातात धरून अभंग म्हणताना वारीमध्ये दिसतात. जय जय रामकृष्ण हरी या भजनाने सुरुवात करून अभंग म्हणत, दिवस संपला की, सायंकाळी नित्यनेमाने हरिपाठ व प्रवचनाचा कार्यक्रम होतो व या भजन कीर्तनाच्या कार्यक्रमामुळे दिवसभर चालणाऱ्यांचा शीण निघून जातो. अठरा ते एकवीस दिवसांची ही आनंदयात्रा पंढरपूर मुक्कामी आषाढी एकादशीला पोहोचली, की चंद्रभागेच्या डोहामध्ये स्नान करून पांडुरंगाचे दर्शन घेऊन वारकरी तृप्त होतो. पंढरपूरमध्ये येणाऱ्या प्रत्येक वारकऱ्याला पांडुरंगाचे दर्शन घेता येत नाही. विठोबाचे दर्शन घ्यायला दर्शनबारीमध्ये सुमारे अठ्ठेचाळीस ते पन्नास तास वारकरी रांगेत उभे असतात. सेकंदाला सुमारे आठ ते सत्तर याप्रमाणे चोवीस तासात सुमारे नव्वद हजार भाविकांना दर्शन घडू शकते. तीन दिवसात जास्तीत जास्त सुमारे तीन लाख भाविकांना दर्शन मिळते. बाकीच्या भाविकांना कळसदर्शन घ्यावे लागते. एकादशीच्या दिवशी प्रचंड चेंगराचेंगरी, उलटसुलट दिशेने जाणारे वारकरी यांनी एकच गर्दी उडालेली असते. पंढरपूरची लोकसंख्या सुमारे पंच्याहत्तर हजार आहे. तेवीस हजार उंबरे असलेल्या या गावात आठ ते दहा लाख लोकांच्या नित्य-कर्माची सोय होऊच शकत नाही. त्यामुळे सर्व नागरी सुविधांचा बोजवारा उडतो यात नवल नाही.

## जनसमूहांचे एकत्रीकरण

विविध जनसमूहांमध्ये विसंवाद होऊ नये, संघर्ष उद्भवू नये, यासाठी सर्वांना एकत्रित करणे आवश्यक होते. जे विविध जनसमूह एकत्र आहे, त्यात वेताळ, जोखाई, मरीआई अशा देवतांची उपासना, भुते-खेते, जंतरमंतर, जादूटोणा इत्यादी प्रकार तसेच त्यांच्या अंधश्रद्धा, पशूबळी, नरबळी इत्यादी आपापल्या क्रूर प्रथाही सर्व लोक घेऊन आलेले होते. या सर्वातून बाहेर काढून त्यांना आचरणात आणायला साधा-सोपा धर्म शिकविणे आवश्यक होते. हे काम संतांनी केले. अशा परिस्थितीत भागवत धर्माचा आधार घेऊन, संतांनी समाजाला नेतृत्व देण्याचे कार्य केले. नामभक्तीचा उपदेश देऊन पंढरपूरच्या विठ्ठलाचे चिंतन करा, अशी शिकवण दिली. भारतात अनेक देवतावाद आणि सर्वेश्वरवाद प्रचलित होते. त्याचा अव्हेर न करता विठ्ठलाभोवती सर्वांना एका पायरीवर आणण्याचे काम संतांनी केले.

## एकमेव देव

ज्याच्या पायाला स्पर्श करता येतो, असा विठ्ठल हा एकमेव देव आहे. वारकरी संतांनी भक्तिमार्गामधल्या दलालाचे अथवा पुरोहितशाहीचे



### ग्रामरचनेचे घटक

महाराष्ट्रात ज्या काळात संत निर्माण झाले आणि संप्रदाय वाढला, त्याला त्या काळातील सामाजिक, राजकीय परिस्थिती कारणीभूत होती. त्या काळी संतांचा गावगाड्याशी जवळचा संबंध होता. ते बलुतेदार अलुतेदार या वर्गातून आलेले होते. त्या काळाची ग्रामरचना ही स्थानिक गणराज्याच्या स्वरूपाची होती. ही गणराज्येच गावाचे नियोजन करीत होती. पाटील गावाचा प्रमुख होता. गावाच्या भौतिक आणि नैतिक प्रगतीची जबाबदारी त्यांच्यावर असे. कुलकर्णी हा गावाचा महसूल सांभाळणारा अधिकारी त्याचा दुय्यम अधिकारी असे. बलुतेदार अलुतेदार हा वर्ग प्रामुख्याने कारागीर वर्ग होता. हा वर्ग गावाचे दैनंदिन व्यवहार आणि शेतीच्या कामांना उपयोगी पडणारे व्यवसाय सांभाळणारा होता. कुणबी हा संख्येने जास्त, त्यामुळे महत्त्वाचा घटक होता. गावातील हे घटक जातिव्यवस्थेचा पाया होते तसेच ते सामाजिक, आर्थिक रचनेचाही पाया होते. जात आणि आर्थिक रचना ही परंपरेत गुंतलेली होती. बलुतेदार हा वर्ग समाजाच्या पाठीचा कणा होता. ही ग्रामव्यवस्था जसे गावाचे नियमन करीत असे, तसेच भटक्या जमातींना तिचा आधार होता. ही व्यवस्था जातिबद्ध होती. प्रत्येक जातीने आपापली कामे करावयाची अशी श्रमविभागणी होती.

महाराष्ट्र राज्यातील जातींची यादी पाहिली, की या संमिश्र जनसमूहाची कल्पना यायला हरकत नाही. हे जनसमूह येताना आपापल्या बोली, आपले देव, रांगड्या धर्मकल्पना, संस्कार, आचारविचार, श्रद्धा, रूढी आणि परंपरा घेऊन आलेले होते. त्यांच्या विविध जातीजमाती आपापली जात व संस्कार सांभाळून समाजातच, पण वेगळेपणाने राहत असत. हे सर्व समाज जसे एकत्र राहू लागले तसे त्यांच्या बोलीभाषांचे व्यवहारात मिश्रण होऊ लागले. पूर्वीच्या महाराष्ट्री आणि प्राकृत भाषांचे राहिलेले अवशेष आणि या विविध बोलीभाषांचे मिश्रण यांमधून या मूळ लोकांच्या बोलीच्या पायावर जी सामान्य भाषा तयार झाली, तीच मराठी भाषा. या सर्व बोलीभाषांमध्ये मराठी बोलीला महत्त्व प्राप्त झाले आणि बाकीच्या बोलीभाषा मागे पडल्या किंवा त्या त्या समूहापुरत्या मर्यादित राहिल्या. मराठी भाषेच्या घडणीमध्ये या विविध बोलीभाषांमधून असंख्य शब्दांचा भरणा होत गेला. त्यामुळे मराठी ही एक शब्दसंपन्न भाषा झाली व त्याचे अत्युच्च स्वरूप ज्ञानेश्वरीमध्ये दिसते. संतकवी, पुढच्या काळातील पंतकवी आणि तंतकवी (शाहीर) यांच्या भाषाप्रभुत्वामागे मराठी भाषेचे शब्दसामर्थ्य आहे हे विसरून चालणार नाही.

उच्चाटन करून, देव थेट भक्तापर्यंत आणला. आपल्या नावाचा स्पष्ट निर्देश करून विविध जातीतील आणि विविध थरातील माणसे अभंगरचना करू लागली. नामा म्हणे, म्हणे गोरा कुंभार, सावता म्हणे, जनी म्हणे, एका जनार्दनी. असा स्पष्ट नामोचार संत करू लागले. बा. रं. सुंठणकर यांच्या म्हणण्यानुसार आपल्या कृतीवर स्वतःचा नामनिर्देश करणे म्हणजे मानवातील व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार होणे होय. मानवातील अस्मिता जागी झाल्याचे ते लक्षण आहे. त्या काळी धार्मिक वाङ्मय संकृतात होते. सामान्य जनांना त्यात स्थान नव्हते. एवढेच नव्हे, तर ते श्रवण करण्याचा अधिकारदेखील नव्हता. धर्माचा, विद्येचा, संकृतीचा मक्ता ब्राह्मण वर्गाने स्वतःकरिता राखून ठेवला होता. इह-परलोकाची मक्तेदारी या वर्गाने आपल्याकडे राखून ठवेली होती. त्या काळी पैठण येथील पुरोहित वर्ग समाजाच्या सर्व धार्मिक बाबींवर घट्ट नियंत्रण ठेवून होता. या सर्व पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील संतांनी वैष्णवांपासून स्फूर्ती घेतली व येथील परिस्थितीला अनुसरून स्वतःचा संप्रदाय निर्माण केला. मराठी संतांनी तत्कालीन समाज, विशेषतः शूद्र अतिशूद्र वर्गाला धर्माची व ईश्वराची कल्पना दिली. जगामध्ये ईश्वर एकच आहे, हे सांगून जनतेला अगदी साधा व सुटसुटीत धर्माचा आणि मोक्षाचा मार्ग सांगितला. भागवत संप्रदायातील कोणाही संताने संन्यासाचा पुरस्कार केला नाही. घरदार आणि प्रपंचा सोडून रानावनात किंवा मठात जा आणि मोक्ष मिळवा असा उपदेश त्यांनी कधीही केला नाही. नामजपाने तुमची भक्ती ईश्वरापर्यंत पोहोचते अशी शिकवण दिली. मूर्ती, पूजाअर्चा नको, विधी नकोत, होम-हवने, मंत्र-तंत्र नको तर साधे आचरण, निर्मळ अंतःकरण आणि निष्ठायुक्त भक्ती हवी, असे थोडक्यात संताच्या शिकवणुकीचे सार होते, मूर्तिपूजा, कर्मठपणा आणि दांभिकता यावर संतांनी चौफेर हल्ले चढविलेले दिसतात.

### संतांचा भक्तिमार्ग

संतांच्या या भक्तिमार्गात पुरोहित वर्गाला मुळीच स्थान नव्हते. सनातन्यांच्या पैठण येथील धर्मपीठांविरुद्ध चंद्रभागेच्या वाळवंटात त्यांनी स्वत.चे केंद्र उभे केले. पैठणकडे डोळे लावून बसणाऱ्या समाजाला त्यांनी पंढरपूरकडे वळविले. पंढरपूर महाराष्ट्राचे नवे स्फूर्तिकेंद्र बनले. येथे महाराष्ट्र, कर्नाटकातील कानाकोपऱ्यांतल्या गावातील सामान्य जनता वारी करू लागली. एकेश्वरवादाची कास धरून, भक्तिमार्गाचा पूर्णपणे अवलंब करणारा वारकरी पंथ संतांनी निर्माण केला. पुढे कित्येक शतके हा पंथ फोफावत गेला. पंढरीच्या झेंड्याखाली बहुजन समाज गोळा होत होता. धार्मिक आघाडीवरील सामान्य जनांचे बंड संतांच्या नेतृत्वाखाली यशस्वी होत होते. पूर्वी वारकऱ्यांमधून नवनवे तेजस्वी संत निर्माण होत होते. संतांनी स्वतः चमत्कार केल्याचे उल्लेख कुठेच दिसत नाहीत. पुढील परंपरेतील कवी, जुन्या संतांची चरित्रे, चमत्काराने भरलेली गुणवर्णन लिहू लागले. त्यात संप्रदायात नसलेल्या व्रताचे माहात्म्य गोवले गेले. मूळ संप्रदायात व्रतांना स्थान नव्हते. त्यामुळे या संतभक्तांनी संतांच्या जीवनातील मनुष्यपण घालवून टाकले.



### आधुनिक शिक्षणाचा प्रभाव

इंग्रजी राजवटीमध्ये आधुनिक शिक्षणाच्या प्रभावातून शिकलेल्या विद्वानांनी वारकरी परंपरेकडे आस्थेने पाहिलेले आपल्याला दिसते. वारकरी संप्रदायाला योग्य नेतृत्व मिळाले तर सामाजिक परिवर्तनाची प्रभावी शक्ती बनू शकेल, असे लोकहितवादींना वाटत होते, तर तुकोबामधला शेतकरीपणा महात्मा फुल्यांना जाणवला. त्यांनी तुकोबाचे वर्णन 'शेतकऱ्यांचा संत' असे केले आहे. सत्यशोधक समाजाला सुरुवातीला जे अनुयायी मिळाले ते वारकऱ्यांच्या प्रभावक्षेत्रातले आणि पुष्कळदा वारकरी कुटुंबातून आलेले होते. सत्यशोधकांनी अभंग, दिंड्या आणि कीर्तन यांचा उपयोग केला होता. तुकोबा तर प्रार्थना समाजाचा प्राण होते, असे म्हटले तरी चालेल. प्रार्थनासमाजातील भांडारकर, चंदावरकर, रानडे तर तुकोबांच्या हाताला धरून चालले होत असे दिसते. विठ्ठल रामजी शिंदे यांच्या डिप्रेस्ड क्लास मिशनद्वारे जातिनिर्मूलन करताना, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना दलितांमध्ये चेतना निर्माण करताना आणि गांधीजींना हरिजनांना जवळ घेताना; तुकोबांसारख्या वारकरी परंपरेतल्या संतांचा आधार होता. पुढे हरिजनांना विठ्ठल मंदिर प्रवेशाकरिता साने गुरुजींनी बडव्यांना आवाहन केले. त्याच्याकडे बडव्यांनी दुर्लक्ष केले. शेवटी, १ मे १९४७ रोजी चंद्रभागेमध्ये स्नान करून त्यांनी आपल्या उपोषणाला सुरुवात केली. सनातन्यांनी विरोध केला; पण शेवटी बडव्यांना माघार घ्यावी लागली.

### साधेपणाचा फायदा

भोळ्याभाबड्या वारकऱ्यांच्या साधेपणाचा फायदा घेऊन त्यांची दिशाभूल करणारी माणसे आजही आहेत. मी वारीतून जात असताना अनुभवलेला एक प्रसंग. विश्रांतीच्या ठिकाणी परंपरेने रूपकावर आधारित भारुडे सादर केली जात होती. त्यामुळे विश्रांतीबरोबर थोडे-फार मनोरंजन होते. भवानीनगर या विश्रांतीच्या ठिकाणी एक वारकरी, स्त्री-रूप घेऊन भारूड सादर करत होता. कार्यक्रम चालू असताना

मध्येच एका शर्ट पँट घातलेल्या शहरी गृहस्थाने त्या भारूड सादर करणाऱ्याला अडवले व त्याला म्हणाला, की तुमच्या या स्त्री-रूपातील पंढरपूरच्या पायी वारीचे सगळे पुण्य निघून जात आहे. त्या शहरी गृहस्थाच्या बोलण्याने भारूड करणारा वारकरी थांबला, तो बुचकाळ्यात पडला. यापूर्वी त्याला असे कोणी अडवले नव्हते. तो काही उत्तर देऊ शकला नाही. तेव्हा मी मध्ये पडलो. त्याच्या या वेषभूषेवरून तो पूर्वी कधी वारीला आला असेल असे वाटत नव्हते. त्याला मी प्रथम विचारले, 'की यापूर्वी कधी आपण वारीला आला होता का?' त्याने सांगितले की, 'हे पहिलेच वर्ष आहे. मी विमा कंपनीमध्ये होतो. आता रिटायर झालो आहे.' मग मी त्याला म्हणालो की, 'सातशे-आठशे वर्षांची वारीची परंपरा आहे. तेव्हापासून भारूड करणारे वारकरी आहेत. भारुडाच्या माध्यमातून संत एकनाथांनी आपले विचार प्रभावीपणे मांडले आहेत. तुम्हाला आपल्या परंपरेची माहिती नाही आणि तुम्ही इथे भारूड करणाऱ्या वारकऱ्याला अडवत आहात. एकतर वारीमध्ये पहिल्यांदाचा आला आहात. तेव्हा प्रथम वारी समजावून घ्या व आपल्याला माहिती नसलेल्या गोष्टीबद्दल मतप्रदर्शन करू नका.' एवढ्या



समजावणीचा त्यांच्यावर परिणाम झालेला दिसला नाही. त्यांची टकळी चालूच राहिली. म्हणून मी त्यांना पुढे म्हणालो की आपल्याशी बोलला तो परंपरेने वारकरी आहे. त्यामुळे तो आपणाशी उलट बोलला नाही, पण मी परंपरेने वारकरी नाही. त्यामुळे मी तुम्हाला उलट बोलू शकतो. आपण गुमान येथून निघून जा. ही दटावणीची मात्रा लागू पडली व गृहस्थ निघून गेले. वारकरी विवाद करीत नाहीत. चटकन दुसऱ्याच्या सांगण्यावर विश्वास ठेवतात. याचा गैरफायदा घेणारे एक उदाहरण- तेथे रस्त्याच्या कडेला जीप लावून, काही माणसे दिंडीप्रमुखांना अडवत होते आणि संवाद साधत होते. ही काय गडबड आहे ते जवळ जाऊन पाहिले. शासन आपण करत असलेल्या अंधश्रद्धाविरोधी विधेयकामुळे वारीवर बंदी येईल, म्हणून त्याविरोधी पत्रकावर सही करा, असे ते आवाहन करीत होते. ते पत्रक वाचले असता, त्यात वारीचा उल्लेख नव्हता, पत्रक न वाचता त्यावर ते घाईघाईत सह्या घेत होते. अशा प्रकारे धार्मिक भावना भडकावून त्याचा फायदा घेण्याचा ते प्रयत्न करत होते. त्यांच्याशी बोलायचा प्रयत्न केल्यावर त्यांनी अरेरावीची भाषा केली व आपला उद्योग तसचा चालूच ठेवला.

## मौखिक परंपरेचा सन्मान

आषाढी वारीच्या कालावधीत या संतांची कवने व अभंग गात वारकरी संपूर्ण मार्गक्रमण करतात. आज लिखित परंपरेला मोठा सन्मान मिळत आहे. आपल्याकडे मौखिक परंपरा हजार वर्षांहून जुनी आहे. या मौखिक परंपरेने आपली भाषा टिकवण्याचे काम महाराष्ट्रातील अशिक्षित कष्टकरी जनतेने केले आहे. गेल्या शंभर- दीडशे वर्षांच्या लिखित परंपरेपेक्षा अधिक सकस लिखाण या नऊशे-हजार वर्षांच्या मौखिक परंपरेत झाले आहे असे म्हटले तर वावगे होणार नाही. सातशे आठशे वर्षांत सहा ते सात लाख एवढ्या मोठ्या लोकसंख्येकडून कवितांचा गजर केला जातो. जगाच्या इतिहासात असे उदाहरण एकमेव असेल. वारकरी काही प्रसंगी देवाशीसुद्धा चार हात करायला मागेपुढे पाहत नाहीत, त्यालाही ते आव्हान देतात. वारीच्या सोहळ्याचा मूलभूत संदेश भक्ती, शांतीची स्थापना, समानता हा असतो. हा संप्रदाय जात, धर्म, वर्ण आदी भेदभाव मानत नाही. वक्रीत सहभागी होणाऱ्या शेतकरी व कष्टकऱ्याचे आत्मभान जागृत करण्याचे काम या वारीत होते असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही.

## नतमस्तक होणारे वारकरी

विष्णुमय जग । वैष्णवांचा धर्म ।। भेदाभेद भ्रम। अमंगळ ।। ही वारकरी संप्रदायाची भावना आहे. आजही वारकरी एकमेकांना माउली म्हणून संबोधतात. जात, धर्म याचा विचार न करता समोरच्या व्यक्तीच्या पायावर नतमस्तक होतात. मात्र, चंद्रभागेच्या तीरावर जातीभेद विसरून उभा राहिलेला हा समूह, गावोगावच्या सीमा ओलांडून गावातील जातिपाती उद्ध्वस्त करण्याइतका अजून प्रभावी ठरलेला नाही. जातिव्यवस्थेचे विष आपल्याकडे खूप खोलवर पसरलेले आहे, हे सत्य मागे उरतेच.

नामदेव, चोखोबा, बंका महाराज, नरहरी सोनार, सावता माळी, गोरा कुंभार, सेना न्हावी, तुकोबा, एकनाथ आदी संत. त्याचप्रमाणे मुक्ताबाई, जनाबाई, निर्मळा, कान्होपात्रा, बहिणाबाई यांच्या अभंगात प्रचंड सामाजिक भान आहे. समाजात होणाऱ्या चुकीच्या गोष्टींवर त्यांनी कोरडे ओढले आहेत. अलीकडचे कीर्तनकार आपल्याला असे करताना दिसत नाहीत. सगळ्यांना सांभाळून घेतात. आपल्याला काय देणेघेणे असा त्यांचा व्यवहार असतो.

प्रभावशाली अशा पाश्चात्त्य संकृतीच्या संपर्कात आलेल्या शिक्षितांनादेखील आज वारीमध्ये कुतूहल निर्माण होत चालल्याचे आपल्याला पाहायला मिळते. वारीमध्ये शेतकरी व कष्टकऱ्यांबरोबर प्राध्यापक, डॉक्टर, उद्योजक, निवृत्त अधिकारी मोठ्या प्रमाणात सामील झालेले दिसतात. नुसती गर्दी वाढून उपयोग नाही, वैष्णवांच्या या आनंदयात्रेकडून सामाजिक समता, सर्वसमावेशकता आणि सहिष्णुता खोलवर रुजण्याचे काम घडले, तर विश्वबंधुत्वाचा संदेश देणाऱ्या वारीचे ते एक महत्त्वाचे पाऊल ठरेल.

**(सर्व छायाचित्रे: संदेश भंडारे)**

(लोकराज्य ऑगस्ट २०१८ मधून पुनर्मुद्रित)

**महाराष्ट्राने या देशाला अनेक रत्ने दिली आहेत. त्यापैकी एक अनमोल रत्न म्हणजे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर! आगामी वर्षात पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जन्माला ३०० वर्ष पूर्ण होत आहेत. या निमित्ताने संपूर्ण देशभर त्यांच्या विचारांचा जागर होणार आहे. त्यांच्या व्यापक कार्याचा सर्वस्पर्शी आढावा घेण्याचा हा अल्पसा प्रयत्न! अहिल्यादेवी यांच्या कर्मयोगाने भारतवर्षाचा उद्धार झाला. त्यामुळे अहिल्यादेवींचे नाव भारताच्या इतिहासात अजरामर झाले आहे.**

# लोकमातेची जीवनगाथा

**डॉ. पुष्कर रमेश शास्त्री**

अहिल्यादेवींचा जन्म ३१ मे १७२५ रोजी अहिल्यानगर (पूर्वीचे अहमदनगर) जिल्ह्यातील चौंडी या छोट्याशा खेड्यात झाला. आई सुशिलाबाई व वडील माणकोजी शिंदे यांनी त्यांच्यावर सुसंस्कार घडवले. लहानपणापासूनच त्या भगवान शंकराच्या निस्सीम भक्त होत्या. स्वभावाने शांत, संयमी असलेल्या अहिल्यादेवींचे तेज पाहून मराठी साम्राज्याचे पराक्रमी सरदार मल्हारराव होळकरांनी त्यांना आपली सून बनवण्यासाठी मागणी घातली. मल्हाररावांचा पुत्र खंडेरावांबरोबर त्यांचा इ.स. १७३३ मध्ये विवाह झाला. अहिल्या शिंदे अहिल्यादेवी होळकर बनल्या. मल्हाररावांनी उत्तम शिक्षक नेमून त्यांना लेखन, हिशेब, राज्यकारभार, घोडेस्वारी आदी सर्व प्रकारचे शिक्षण देण्याची व्यवस्था केली, या साऱ्या विद्या अहिल्यादेवींनी तन्मयतेने आत्मसात केल्या व पुढील काळात लोककल्याणार्थ त्याचा योग्य वापर केला.




## उत्तम प्रशासक

लोककल्याणकारी राज्यकारभार कसा करावा याबाबत अहिल्यादेवींचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. त्या आदर्श प्रशासक होत्या. वर्तमानकाळातही त्यांची लोककल्याणकारी राज्यपद्धती अनुकरणीय आहे. अहिल्यादेवींनी अल्पकाळात राज्यकारभाराचे ज्ञान मिळवून उत्तम राज्य चालवले. स्वत: मल्हारराव त्यांच्याबद्दल म्हणत 'आम्ही तलवार गाजवतो ती सूनबाईंच्या भरवशावर.' मार्तंडानेच हे रत्न आम्हास दिले. अशी त्यांची भावना होती.

अहिल्यादेवींच्या चरित्रकार विजया जहागीरदार लिहितात - रोज फडणीशीत जावे, हिशेब बघावे, वसूलजमा बघावी, त्यासाठी माणसे पाठवावी, फौजा तयार ठेवाव्या, खासगी उत्पन्न आणि सरकारी उत्पन्न रोखठोकपणे वेगळे ठेवावे, गोळाबारूद, बाणभाते, ढाली तलवारी सज्ज राखाव्या, सासऱ्याच्या बरहुकूम सर्व रवाना करावे हे अहिल्यादेवींचे नित्यकार्य होते. मल्हाररावांच्या अनुपस्थितीत त्या समर्थपणे सर्व कारभार सांभाळत होत्या. म्हणूनच सर जदूनाथ सरकार लिहितात, 'अस्सल कागदपत्रानिशी हे सिद्ध करता येते की, अहिल्यादेवी या अव्वल दर्जाच्या मुत्सद्दी होत्या. त्यांच्या सहकार्याशिवाय महादजी शिंदे यांना राजकारणात श्रेष्ठत्व मिळाले नसते, म्हणून माझा त्यांच्याविषयीचा आदर अमर्याद वाढला आहे.

अहिल्यादेवी स्वभावाने शांत असल्या तरी करारीपणा हा त्यांचा स्वभावगुण होता. हिशेबाच्या बाबतीत त्या फार दक्ष असत. सरकारी खजिन्यातील एक छदामही सरदाराने खासगीसाठी खर्च करू नये, असा त्यांचा दंडक होता. पती असो वा मुलगा या सर्वांनाच त्यांनी या तत्त्वाचे पालन करावयास लावले.

## लोककल्याणकारी राज्य

कौटील्य अर्थशास्त्रात राजाच्या कर्तव्यविषयी *'प्रजा सुखे सुखं राज्ञ: प्रजानां तू हिते हितम'* असे म्हटले आहे, याचा अर्थ प्रजेच्या सुखातच राजाचे सुख आहे व प्रजेच्या हितातच त्याला स्वहित दिसले पाहिजे. या तत्त्वाचे पालन अहिल्यादेवींच्या चरित्रात दिसून येते. इ.स.१७५४ मध्ये कुंभेरीच्या लढ्यात पती खंडेरावांना वीरमरण आले. मल्हाररावांनी अहिल्यादेवींना सती जाण्यापासून रोखले; पण त्या दिवसापासून अहिल्यादेवींनी आपले सारे अलंकार याचा त्याग करून केवळ शुभ्र वस्त्र परिधान करायला सुरुवात केली आणि लोककल्याणासाठी आयुष्य वेचण्याची शपथ घेतली आणि उर्वरित आयुष्यात त्यांनी त्याप्रमाणे लोककल्याणाचे कार्य केले.

भारतभर त्यांनी नद्यांना घाट बांधले. विहिरी खोदल्या. प्रवासी मार्गांवर अन्नछत्र, धर्मशाळा सुरू केल्या. असंख्य हिंदू मंदिराचे जीर्णोद्धार केले. देव, धर्म आणि ब्राह्मणांचे रक्षण केले. लोकांना रोजगार दिला. कलाकार, कारागीर यांना राजाश्रय दिला.

## धर्मपरायणता

*'धर्मो रक्षति रक्षित:'* या वचनाप्रमाणे आपण धर्माचे रक्षण केले तर धर्म आपले रक्षण करतो, याची जाणीव अहिल्यादेवींना होती. आपली संस्कृती भोगापेक्षा त्यागावर उभी आहे त्यामुळे धर्म आणि संस्कृतीच्या रक्षणाची जबाबदारी त्यांनी समर्थपणे पार पाडली. त्याग आणि सेवा म्हणजे ईश्वर भक्तीचेच प्रकार आहेत असे त्या मानत असत. अहिल्यादेवी बालपणापासून नि:स्सीम शिवभक्त होत्या. धर्मपरायण होत्या. कुठलाही भेदभाव न करता त्यांनी राजधर्माचे

पालन केले. त्यांनी अनेक मंदिरांना वर्षासने दिली. अनेक पंडित, ब्राह्मण यांना तीर्थयात्रेची सुविधा उपलब्ध करून दिली.

*वज्रादपि कठोराणि, मृदूनि कुसुमादपि//*

राज्यकर्त्यांना राज्याच्या रक्षणासाठी वज्राहून कठोर आणि प्रजेच्या पालनासाठी फुलाहून मऊ, संवेदनशीलतेने काही निर्णय घ्यावे लागतात. या दोन्ही दोन टोकाच्या भूमिका अहिल्यादेवींनी समर्थपणे पार पाडल्या आणि आपल्या कर्मयोगाने एका आदर्श राज्यकर्त्याचे उदाहरण घालून दिले.

मल्हाररावांच्या निधनानंतर त्यांनी होळकरांची राजधानी इंदौरहून महेश्वर येथे स्थापन केली. नर्मदेच्या काठी भव्य घाट, शिव मंदिर आणि स्मृतिमंदिरे उभारली. अनेक लोकोपयोगी वास्तूंचे निर्माण केले. यातून अनेक कारागीर, कलाकार यांना रोजगार मिळाला. अनेक उत्तम विणकरांना महेश्वरला आणून त्यांनी वस्त्रोद्योगाला चालना दिली. आजही माहेश्वरी साडी जगप्रसिद्ध आहे.

त्यांनी जनसामान्यांची काळजी तर घेतलीच; पण पशुपक्ष्यांसाठी जंगल आणि कुरणे सुरक्षित केली. अगदी मुंग्यांसाठी साखर, पाण्यातील माशांसाठी खाद्य उपलब्ध करून दिले. यातून त्यांची संवेदनशीलता दिसून येते. व्यक्तिगत जीवनात पतीचे निधन, मुलाचे निधन, जावयाच्या मृत्युनंतर मुलीचे सती जाणे असे दुःखाचे आघात सोसूनही त्याचा कुठलाही परिणाम त्यांनी राज्यकारभारावर होऊ दिला नाही. अशाही परिस्थितीत त्या खंबीरपणे उभ्या राहिल्या. त्यांच्या एका पत्रामुळे होळकरांचे राज्य घेण्याचा मनसुबा बाळगणाऱ्या राघोबादादालाही माघारी फिरावे लागले होते.

'न घेतले हे व्रत आम्ही अंधतेने' याची सदैव जाणीव ठेवून आपले संपूर्ण आयुष्य लोककल्याणासाठी समर्पित करणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे चरित्र संपूर्ण देशासाठी नेहमीच प्रेरणा देणारे ठरले आहे आणि भविष्यातही ते आपल्याला प्रेरणा देत राहील.

**(लेखक हे इतिहास अभ्यासक आणि संशोधक आहेत.)**

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी सुमारे २८ वर्ष दौलतीचा कारभार केला. भारतीय इतिहासातील त्यांची कारकीर्द म्हणजे सुशासनाचे तेजस्वी पर्व होते. शुद्ध आचरण, पवित्रता आणि उच्च विचारसरणी हे त्यांचे गुण त्यांच्या राजव्यवहारातही उतरले होते. अहिल्यादेवींचे जीवन हे धर्मपरायण होते. ईश्वराने माझ्यावर जे उत्तरदायित्व सोपवले आहे, ते पार पाडणे हे माझे कर्तव्य आहे. प्रजेला सुखी ठेवणे हे माझे काम आहे हे त्यांच्या राजनीतीचे सूत्र होते.**

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी आणि सुशासन

**प्रा. स्वाती तळेकर**

महेश्वर हे मध्यप्रदेशातील खरगोन जिल्ह्यात नर्मदा नदीच्या काठी वसलेले शहर! पुण्यसलीला नर्मदेच्या अविरत प्रवाहाप्रमाणे निर्मळ जीवन असलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ही राजधानी.

छत्रपती शिवाजी महाराज यांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. पुढे याच हिंदवी स्वराज्याचा भारतभर विस्तार झाला. मराठ्यांनी याच कालखंडात देव, देश आणि धर्माचा जीर्णोद्धार केला. शिवछत्रपतींचा राष्ट्ररक्षणाचा विचार घेऊन मराठे थेट पानिपतावर जाऊन भिडले आणि पानिपतावर पराभव होऊनही पुढील दहा वर्षात मराठ्यांनी पुन्हा दिल्ली काबीज केली. मराठ्यांनी केवळ सत्ताविस्तार केला असे नाही, तर येथील रयतेच्या कल्याणासाठी राजकीय सत्तेचा वापर केला आणि लोककल्याणकारी प्रशासनाचा आदर्श उभा केला.

## कर्तव्याला प्राधान्य

अहिल्यादेवी होळकर यांचा राज्यव्यवहार हा लोकाभिमुख होता. त्यांचे राज्य हे लोककल्याणकारी राज्य होते. त्यांच्या व्यक्तिगत जीवनात अनेक दुःखे आली पण त्यांनी नेहमीच आपल्या कर्तव्याला प्राधान्य दिले. त्यांच्या राज्यातील करपद्धती अतिशय चोख होती. राज्यातील गोंड, भिल्ल आदी जमातींना त्यांनी समाजाच्या मुख्य प्रवाहात आणले. त्यांच्या उदरनिर्वाहाची व्यवस्था केली. आपल्या राज्यात शांतता राखण्यासाठी त्यांनी जे प्रयत्न केले त्याची सर जॉन मालकम याने आपल्या (अ मेमोईर ऑफ सेंट्रल इंडिया इन्क्लुडिंग मालवा) या ग्रंथात प्रशंसा केली आहे.

## शेतकरी आणि शेतीचे हित

शेतकरी हा जगाचा अन्नदाता असतो. त्यामुळे अहिल्यादेवींनी आपल्या राज्यात शेतकरी आणि शेतीच्या हिताचा विचार केला. शेतकऱ्यांना विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या. गरीब शेतकऱ्यांना जमिनी दिल्या आणि फळझाडांची लागवड करण्यास प्राधान्य दिले. शेतीवरील कर हा उत्पन्नाप्रमाणे आकारण्यास सुरुवात केली. डॉ. देविदास पोटे यांनी त्यांच्या 'वेध अहिल्यादेवींचा' या ग्रंथात अहिल्यादेवींच्या शेतीविषयक धोरणांची सविस्तर माहिती दिली आहे.

त्यांच्या राज्यात शांतता आणि सुव्यवस्था असल्यामुळे शेती, उद्योग आणि व्यापाराचा उत्कर्ष झाला. देशाच्या वेगवेगळ्या भागातून कुशल वीणकर बोलावून त्यांनी वस्त्रोद्योगाला

प्रोत्साहन दिले. त्यामुळे त्यांच्या करकिर्दीत राज्याचे उत्पन्न वाढले. महेश्वर येथे आजही वस्त्रोद्योग चालतो, येथील महेश्वरी साडी आजही प्रसिद्ध आहे. अहिल्यादेवी अजून एकाबाबत प्रसिद्ध आहेत ते म्हणजे न्यायदान. याबाबत त्या कर्तव्यकठोर होत्या. कर्तव्यापुढे त्या नातेगोतेही पाहत नसत. आपल्या अधिकाऱ्यांनी प्रजेवर जुलूम करू नये अथवा गैरकारभार करू नये, याबाबत त्या अतिशय दक्ष होत्या.

## न्यायाधीश

सिरोजमध्ये खेमदास नावाचा एक व्यापारी राहत होता. त्याला मुलबाळ नव्हते, तो मृत्यू पावल्यानंतर त्याच्या कुटुंबात त्याच्या विधवा पत्नीवाचून कुणीच नव्हते. संपत्तीला वारसही नव्हता. हे पाहून तिथल्या अधिकाऱ्याने त्या विधवेस धमक्या देण्यास सुरुवात केली. तुमची सर्व संपत्ती बेवारस असल्यामुळे सरकारजमा करण्यात येईल. ती विधवा घाबरली. ती म्हणाली, 'मी दत्तक घेईन, पण असे करू नका.' त्या अधिकाऱ्याने त्या विधवेकडे तीन लाख रुपयांची लाच मागितली. 'तीन लाख दिल्यास संपत्ती तुमच्या नावे करून देईन,' ही गोष्ट कुणालाही कळता कामा नये अशी जरबही त्याने दिली. त्या विधवेच्या ओळखीचे एक सद्गृहस्थ होते. त्यांनी त्या विधवेस महेश्वरला जाऊन ही हकिकत अहिल्यादेवींच्या कानावर टाकण्याचा सल्ला दिला. ती स्त्री महेश्वरास गेली आणि अहिल्यादेवींना हा सगळा प्रकार कथन केला, हे ऐकताच अहिल्यादेवी संतापल्या, त्यांनी ताबडतोब त्या अधिकाऱ्यास पदावरून दूर केले आणि विधवेला दत्तक घेण्याची संमती दिली. जॉन मालकमने अहिल्यादेवीसारखा न्यायाधीश पुन्हा होणे नाही, असे उद्गार काढले आहेत, ते अतिशय सार्थ आहेत.



## कर्तव्यकठोर

अहिल्यादेवींनी केवळ राज्य चालवले असे नाही तर त्या राज्याला एक अधिष्ठान प्राप्त करून दिले, त्याबाबत विजया जहागीरदार लिहितात, 'प्रजेच्या नैतिक आणि आध्यात्मिक उन्नतीकडेही त्यांनी लक्ष दिले, कथा-कीर्तन, भजन हे सोहळे, दानधर्म यातला स्वच्छ आनंद आणि समाधान प्रजेला लाभले, त्यांनी स्वतःचे जीवन पवित्र, त्यागमय, साधे ठेवून जनतेपुढे आदर्श ठेवला होता. प्रजेसाठी नवे नियम त्यांनी केले, तसेच जाचक नियम त्यांनी रद्द करून टाकले. प्रजेला सुरक्षिततेचा अनुभव येत असे, त्यांना कोणापासूनही भीती वाटत नव्हती. कधी कशाची टंचाई भासली नाही, की दुष्काळ पडला नाही. कित्येक ठिकाणी सदावर्ते आणि अन्नछत्रे चालू होती. तेथे कुणालाही भेदभाव वा दुजाभाव दाखवला जात नसे, अहिल्यादेवींनी कुठलाही धाकदपटशा, शक्ती वा दहशत दाखवून राज्य केले नाही, तर अत्यंत मायाळूपणे, प्रेमाने त्यांनी राज्य केले. त्यांच्या काळात प्रजेत असंतोष निर्माण झाला नाही किंवा प्रजेने कधीच उपद्रवही दिला नाही. त्यांच्या दरबारात प्रजेला मुक्तद्वार होते. सर्वांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेणे हे त्यांचे कौशल्य होते. त्या जितक्या मृदू आणि मायाळू होत्या, तितक्याच कर्तव्यकठोर आणि कडक होत्या. त्यांच्या वागण्यात हे दोन्ही रंग प्रभावी आहेत. म्हणूनच त्यांचे चरित्र म्हणजे लोहशक्ती अशा श्रीचेही आहे आणि कुसुमकोमल अशा हृदयाचेही आहे. कर्तव्यकठोर निर्णय घेणाऱ्या राज्यकर्तीचे आहे तसेच नम्र अशा प्रजापालनकर्तीचेही आहे, रणचंडिकेचेही आहे आणि वात्सल्यमयीचेही आहे. अहिल्यादेवी म्हणजे सात्विकतेचे, कर्तव्याचे एक अजब रसायन होते.

सजीवांसाठी पाणी अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. पाण्याशिवाय जीवनाची कल्पनाच करता येत नाही. आज पृथ्वीवर दूषित पाण्याची पातळी वाढत आहे आणि पिण्यायोग्य पाण्याची पातळी कमी होत आहे. पिण्यायोग्य पाण्याचा सतत होणारा ऱ्हास ही अत्यंत चिंतेची बाब आहे, हे टाळण्यासाठी पाण्याच्या संवर्धनावर आज भर दिला जातो. पण त्याकाळी अहिल्यादेवींनी पाण्याचे महत्त्व ओळखले होते. पाण्याच्या सोयीसाठी त्यांनी बारवा, जलकुंडे, विहिरी आणि तलावांची निर्मिती केली. अहिल्यादेवींच्या २८ वर्षांच्या कारकिर्दीत कुठेही दुष्काळ पडल्याचा उल्लेख नाही. त्यांच्या जलसंवर्धन व पर्यावरण नीतीचे अनुसरण करण्याची गरज आहे.

(लेखिका या भोकरदन (जि. जालना) येथील
एस.डी. देशमुख महाविद्यालयात प्राध्यापिका आहेत.)

**आपल्या देशाला समाजसुधारणेची मोठी परंपरा लाभली आहे. समाजसुधारणेच्या चळवळीत महाराष्ट्र राज्य हे नेहमीच अग्रेसर राहिले आहे. महात्मा जोतिराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, गोपाळ गणेश आगरकर, महर्षी कर्वे अशी समाजसुधारकांची मोठी परंपरा आपल्याकडे आहे. परंतु देशात राजेशाही पद्धती असताना काळाच्या पुढे जाऊन विचार करणे आणि त्याप्रमाणे कृती करणे हे निश्चितच धाडसाचे आणि पुरोगामी पाऊल आहे असे म्हटले पाहिजे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनीदेखील अशाच प्रकारे काळाच्या पुढे जाऊन हिंदू समाजात सुधारणा करण्याचा प्रयत्न केला, ते आजही अनुकरणीय आहे.**

# सामाजिक परिवर्तन

**प्रा. डॉ. विजय देसले**

राजा राममोहन रॉय यांनी क्रांतिकारक पाऊल उचलले. सतीची पद्धत कायद्याने बंद करावी, यासाठी अभ्यासपूर्ण दोन पुस्तिका लिहिल्या आणि अथक प्रयत्न केले. तसेच कायद्याचे स्वरूप ठरवण्यासाठी तत्कालीन गव्हर्नर-जनरल विल्यम बेंटिंक याच्याबरोबर चर्चा केली. परिणामतः लॉर्ड विल्यम बेंटिंकने ४ डिसेंबर १८२९ रोजी सती-बंदीचा कायदा केला आणि सती जाणे हा फौजदारी गुन्हा म्हणून घोषित करण्यात आला.

## युगानुकूल परिवर्तन

पती मृत्यू पावल्यानंतर त्यांच्या कलेवरासह आत्मदहन करणे याला सती जाणे असे म्हणतात. भारताप्रमाणे सतीची पद्धत युरोपात आणि अति पूर्वेकडील देशातही प्रचलित होती. भारतात राजस्थान, बंगाल, पंजाब या राज्यात ही पद्धती होती. महाराष्ट्रातील अनेक मराठा सरदार घराण्यात ही पद्धती होती आणि होळकर घराणेही त्याला अपवाद नव्हते.

अहिल्यादेवी होळकर यांनी त्यांच्या कार्यकाळात या सतीच्या पद्धतीला वारंवार विरोध केला. ही गोष्ट खूप महत्त्वाची आहे. त्या काळच्या रूढीवादी वातावरणात त्यांच्या मुलीच्या म्हणजे मुक्ताच्या लग्नाचा पण लावणे ही किती धाडसाची गोष्ट होती. जो लुटारूंचा बंदोबस्त करेल त्याच्याशी कन्या मुक्ता हिचे लग्न होईल. या मागे प्रजेच्या सुरक्षेचा विचार होता. त्याकाळी यात्रेकरू, प्रवासी यांची लूट होत असे. प्रवासात दगाफटका होई. चोऱ्या होत. हे सारे लुटारू करत असत. अहिल्यादेवींनी प्रजेसाठी आपल्या मुलीच्या सुखाचाही विचार केला नाही आणि ज्या काळात आठव्या वर्षी मुलीचे लग्न केले जाई, त्या काळात मुक्ता १८ वर्षांची झाली तरीही लोकांची टीका सहन करीत अहिल्यादेवी वाट पाहत होत्या. अखेर यशवंतराव फणसे या वीराने हा पण पूर्ण केला आणि १८व्या वर्षी मुक्ताचा विवाह झाला.

अहिल्यादेवी म्हणत, ज्या रूढी अंधाराकडून उजेडाकडे नेतात त्या रूढी आम्हाला मान्य आहेत. उजेडाकडून अंधाराकडे नेणाऱ्या रूढींना आम्ही अंधश्रद्धा म्हणतो. तशा रूढी पाळताना प्रत्येकाने विचार करावा. मुक्ताचं लग्न रूढी मोडून ठरलं आणि रूढी मोडूनच झालं.

आजच्या काळातही हुंडापद्धतीमुळे मुलींचा होणारा छळ आपण बघत किंवा वाचत असतो. पण त्याकाळी अहिल्यादेवी होळकर यांनी त्यांच्या राज्यात हुंडाबंदी केली होती. हुंडा देणारा, घेणारा आणि मध्यस्त या सर्वांना दंड ठोठावण्याची तरतूद त्यांनी केली होती, हिंदू समाजात युगानुकूल परिवर्तन घडवण्याचा प्रयत्न त्यांनी केला, त्यामुळे हिंदू समाजात मोठे प्रबोधन होण्यास मदत झाली.

आज काही लोक मध्ययुगीन आणि वाळवंटी मानसिकतेत स्त्रियांना कोंबू पाहतात, विशिष्ट वेशभूषा ही शिक्षणापेक्षाही महत्त्वाची ठरते आणि त्यासाठी आंदोलने होतात, त्या पार्श्वभूमीवर विचार केल्यास अहिल्यादेवींनी त्या काळात केलेल्या सामाजिक परिवर्तनाचे महत्त्व लक्षात येते.

## एक सुवर्ण अध्याय

विधवा स्त्रियांना त्यांच्या इच्छेप्रमाणे दत्तक घेण्याचा हक्क देणे हे देखील त्यांच्या काळाच्या पुढे असणाऱ्या दृष्टीचे उदाहरण आहे. एका सावकाराच्या विधवा पत्नीला महिन्याचा कालावधी लोटला तरी दत्तक घेण्याची परवानगी मिळत नव्हती. कारण कमाविसदार या कामासाठी लाच मागत असल्याचे अहिल्यादेवींच्या लक्षात आले. त्यांनी कमावीसदारास दंड ठोठावला आणि विधवेस दत्तकाची परवानगी दिली. २५० वर्षांपूर्वी भारतीय समाजात स्त्रियांचे स्थान बघता अहिल्यादेवींचे कर्तृत्व लक्षात येते. त्यांनी केलेल्या सामाजिक सुधारणा आजही आपल्याल्या थक्क करतात.

अहिल्यादेवींची कारकिर्द ही भारताच्या इतिहासातील एक सुवर्ण अध्याय आहे. अहिल्यादेवी हे जसे धार्मिकता, लोककल्याण आणि न्यायाचे प्रतीक आहे, त्याप्रमाणे त्या सामाजिक परिवर्तनाचेही प्रतीक आहेत.

(लेखक हे विमलताई उत्तमराव पाटील महाविद्यालय, साक्री येथे प्राध्यापक आहेत.)

**मातृभूमीसाठी जीवन समर्पित करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांमध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव अग्रक्रमाने येते. अखंड हिंदुस्थानात आपल्या दातृत्वाने त्या अजरामर झाल्या आहेत. लोकमाता, राजमाता, वीरांगना, पुण्यश्लोक, देवी, गंगाजल निर्मळ, मातोश्री अशा शब्दांतून त्यांच्याविषयींचा आदर आजही जनमानसात दिसतो. अहिल्यादेवी या धर्मशील होत्या. या धर्मशीलतेमागे त्यांची मोठी तपस्या होती. त्यांनी भारतात हिंदू धर्म आणि संस्कृतीचा जीर्णोद्धार केला.**

# सांस्कृतिक पुनरुज्जीवन

**डॉ. अशोक बांगर**

प्राचीनकाळी भारत हा एक समृद्ध देश होता. कला, साहित्य व तत्त्वज्ञान यासह 'सर्वे भवंतू सुखिन:' असा मानवतेचा विचार इथे विकसित झाला होता. नालंदा, तक्षशिलासह अनेक विद्यापीठात शिक्षण घेण्यासाठी जगभरातून विद्यार्थी येत असत.

## विश्वगुरू संस्कृती

भरतभूमीचे सुखी, समृद्ध जीवन पाहून या अलौकिक भूमीकडे संपूर्ण जग आकर्षित झाले. जगातील अनेक कर्तृत्ववान माणसांची पावले या भूमीकडे वळली. कोणी ज्ञान मिळवण्यासाठी, कोणी मुक्तीसाठी तर कोणी उन्नतीसाठी! कालांतराने येथील संपत्ती लुटण्यासाठी परकीयांनी भारतावर आक्रमणे केली. यामध्ये सुलतानी आक्रमण सर्वात भयानक होते. त्यांनी आपला धर्म येथील जनतेवर लादण्याचा प्रयत्न केला. असहिष्णू वृत्तीच्या परकीयांनी हिंदूधर्म आणि संस्कृतीची राख रांगोळी करण्यास सुरुवात केली. लूट तर केलीच; पण अनेक मंदिरांचा विनाश करण्यात आला. मुहम्मद बीन कासीम ते औरंगजेब या सर्व परकीय राजवटींचा हाच इतिहास आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांच्या 'थॉटस् ऑन पाकिस्तान' या ग्रंथात सुमारे १००० वर्षांच्या परकीय आक्रमणाचा आढावा घेतलेला आहे. महाराष्ट्र शासनाने हा ग्रंथ डॉ. बाबासाहेब आंबेडकर - राईटिंग ॲण्ड स्पिचेसच्या ८ व्या खंडात छापला आहे. यातील पान क्र. ५९, ६० वर मुघल बादशाहा शाहजहानने बनारस जिल्ह्यात ७६ मंदिरे पाडल्याचा उल्लेख केला आहे. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुढे औरंगजेबाचेही उदाहरण देतात. हिंदूंच्या पाठशाळा आणि मंदिरे पाडण्याचा आदेश औरंगजेबाने सर्व प्रांतांच्या सुभेदारांना दिला. तसेच काशी विश्वनाथ मंदिर पाडल्याचाही उल्लेख बाबासाहेबांनी केला आहे.

उज्जैन येथील महाकालेश्वराचे मंदिरही सुलतान इल्तूत्मिश याने पाडले. महाकालेश्वराची पिंड दिल्लीला नेऊन तिची विटंबना केली. फिरोजशाहा तुघलकाने जगन्नाथ पुरीचे मंदिर उद्‌ध्वस्त करून मूर्ती तोडली. औरंगजेबाने तर एकाच वर्षामध्ये राज्यस्थानच्या उदयपूर परिसरातील ३०० हून अधिक मंदिरे पाडून टाकली. येथील जनतेला जझिया कर द्यावा लागत होता. स्त्रीयांची अब्रू सुरक्षित राहिली नव्हती.

संपूर्ण भारतात अत्याचार वाढले असताना सह्याद्रीच्या शिखरावरून छत्रपती शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्याचा उदय झाला. अवघ्या काही वर्षांतच मावळ्यांनी 'हर हर महादेव' ची गर्जना करत नर्मदा ओलांडली. स्वदेश आणि स्वधर्माचा भगवा अटकपासून कटकपर्यंत



फडकला. याच कालखंडात माळव्याच्या भूमीवर महाराष्ट्राच्या कन्येने आपल्या कर्तृत्वाची गगनभेदी कमान उभी केली. त्या महाराष्ट्र कन्या म्हणजे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर!

छत्रपती शिवरायांचा विचार मस्तकी धरून, पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करून अहिल्यादेवींनी केलेला राज्यकारभार त्यांना इतिहासात अमर करून गेला. दुर्दैवाने माणसाला जिवंतपणी समाजाकडून श्रेष्ठत्व मिळत नाही मात्र अहिल्यादेवींना त्यांच्या हयातीतच 'देवी' ही पदवी मिळाली.

## ईश्वराला समर्पित राज्यकारभार

अहिल्यादेवींनी भारतीयांच्या मनातील भावना ओळखून राज्यकारभार केला. भारतभर ठिकठिकाणी त्यांनी हिंदू मंदिरांचा जीर्णोद्धार केला. घाट, धर्मशाळा बांधून अहिल्यादेवी खऱ्या अर्थाने पुण्यश्लोक झाल्या. अन्नछत्रे, विहिरी, तळे, रस्ते उभारून पुण्यशील झाल्या. राजमाता अहिल्यादेवींच्या जीवनातील त्याग आणि सेवा ईश्वर समर्पित होती. अहिल्यादेवींच्या पत्राची सुरुवात श्री शंकर आज्ञेवरून या मायन्याने होत असे. श्री महादेवाच्या आज्ञेवरून हे पत्र पाठवत असल्याचा भाव त्यांच्या हृदयात जागृत होता. पत्राच्या शेवटी अहिल्यादेवी स्वतःचे नाव अथवा सही करत नव्हत्या. फक्त श्रीशंकर एवढेच लिहीत होत्या. महादेवाच्या नंदीला होळकरांच्या राजचिन्हाच्या उजव्या बाजूला स्थान होते.

## संस्कृतीचे पुनरुज्जीवन

हिंदवी स्वराज्य स्थापनेनंतर छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वभाषा, स्वधर्म, स्वसंस्कृती यांना चालना दिली. महाराष्ट्राची भाषा, तीर्थस्थाने आणि संस्कृतीला संजीवनी दिली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्याचा वारसा चालवत अहिल्यादेवींनी संपूर्ण भारतात परकीय आक्रमणामुळे उद्ध्वस्त झालेल्या शेकडो मंदिरांचा जीर्णोद्धार केला. काही मंदिरांना त्यांनी वर्षासने लावून दिली, तर काही ठिकाणी दिवाबत्तीची सोय केली. उद्ध्वस्त झालेली मंदिरे ही पराभवाच्या खुणा आहेत त्या पुसून टाकण्यासाठी अहिल्यादेवींनी अनेक मंदिरांचा जीर्णोद्धार व निर्मिती केली. इसवी सन १६६९ साली औरंगजेबाच्या हुकुमाने काशी विश्वेश्वराचे मंदिर पाडून तेथे मशिद उभारण्यात आली होती. अहिल्यादेवींनी पूर्वीच्या मंदिराच्या शेजारी काशी विश्वेश्वराचे नवीन मंदिर बांधले, तसेच मोहम्मद गजनीने जमीनदोस्त केलेल्या सोमनाथ मंदिराचा जीर्णोद्धारही त्यांनी केला. श्रीमल्लिकार्जुन, ओंकारेश्वर, वैजनाथ, घृष्णेश्वर इत्यादी मंदिरांचा जीर्णोद्धार अहिल्यादेवींनी आपल्या खासगी खर्चातून केला. बारापैकी सहा ज्योतिर्लिंगांचा जीर्णोद्धार तर इतर सहा ठिकाणी घाट, पूजेची नेमणूक, अन्नछत्रे व धर्मशाला उभ्या केल्या. हिंदू धर्मात पवित्र असणाऱ्या चारधामांच्या ठिकाणी मंदिर, धर्मशाळा घाटांची व अन्नछत्राची निर्मिती अहिल्यादेवींनी केली.

भारताच्या चारही दिशांना अहिल्यादेवींनी मंदिरांची निर्मिती व जीर्णोद्धार केला. एकट्या महेश्वर येथे ६०पेक्षा अधिक देवालये त्यांनी बांधली होती. महाराष्ट्रातील अनेक मंदिरांना अहिल्यादेवींच्या सत्कार्याचा प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष स्पर्श झालेला आहे.

## साहित्य आणि संस्कृतीचा विकास

छापखाने उपलब्ध नसतानाही शेकडो ग्रंथ राजमातांच्या संग्रही होते. विशेष म्हणजे यातील जवळपास सर्वच ग्रंथ हे धर्मग्रंथ होते. संग्रही असणाऱ्या ग्रंथांचे पारायण आणि श्रवण सदैव अखंडितपणे चालू होते. राजमाता अहिल्यादेवींनी काही धर्मग्रंथांचे हस्तलिखित बनवून घेतले होते तर काही धर्मग्रंथ महाराष्ट्रातील चांदवडहून मागवल्याच्या नोंदी उपलब्ध आहेत. शेकडो हस्तलिखित धर्मग्रंथांचा संग्रह हा अहिल्यादेवींची धर्माच्या बाबतीत असणाऱ्या ज्ञानतृष्णा दर्शवतो.

अहिल्यादेवींनी आपली राजधानी महेश्वर येथे साहित्यिक, संगीतकार, चित्रकार यांना प्रोत्साहन दिले. अनेक विद्वान आणि पंडितांना आश्रय दिला. अशा प्रकारे त्यांनी कला, साहित्य आणि संस्कृतीचे संवर्धन केले.



## विठ्ठलभक्त अहिल्यादेवी

पंढरपूरच्या विठ्ठलावर अहिल्यादेवींची अपार श्रद्धा होती. विठोबाच्या नियमित नैवेद्याची सोय होळकर घराण्याने केली. रखुमाईच्या पायातला दागिना अहिल्यादेवींनी स्वतः पाठवला होता व तो दागिना रोज रखुमाईच्या पायात घालावा असा आदेश त्यांनी दिला होता. विठ्ठल भक्तांच्या निवासाची सोय व्हावी, यासाठी होळकरांनी पंढरपूरमध्ये होळकरवाडा नावाची भव्य अशी वास्तू बांधली. पंढरपूरबरोबरच अनेक धार्मिक ठिकाणी त्यांनी केलेल्या निर्मितीच्या खुणा आजही आपल्याला त्यांच्या धर्मपरायणतेची साक्ष देत उभ्या आहेत. अहिल्यादेवी एक कुशल प्रशासक आणि धोरणी राज्यकर्त्या तर होत्याच, पण त्यांनी भारतीय संस्कृतीचा जीवनप्रवाह अविरत ठेवण्याचे जे कार्य केले ते केवळ अजोड आहे.

(निमंत्रित सदस्य, छत्रपती शिवाजी महाराज चरित्र साधने समिती)

**चौंडीसारख्या लहानशा गावात वाढलेली एक चुणचुणीत पोर. मल्हारबा होळकरांना तिची माहिती कळते, अन थोरल्या बाजीरावांच्या आशीर्वादाने होळकर घराण्याची सून म्हणून महेश्वरला येते ! हा भाग्य योग केवळ तिचा नाही, अवघ्या भारताचा. अहिल्यादेवी होळकरांचे अवघे चरित्र विस्मयकारक आहे. काही काही व्यक्तींना जणू शैशवातच त्यांचे जीवनध्येय सापडलेले असते. त्यामुळेच ते प्रत्यक्ष त्यांच्या कार्यक्षेत्रात काम करण्याच्या आधीपासूनच त्यांची वाटचाल त्या दिशेने सुरू झालेली असते. ती जवळच्या काही द्रष्ट्या माणसांना जाणवते. मग तेही त्या वाटचालीला बळ पुरवतात.**

# राजयोगिनी

**विनीता तेलंग**

*राजयोगिनी सती अहिल्या होळकरांची राणी*
*अजून नर्मदाजळी लहरती तिच्या यशाची गाणी...*

विवाह करून आलेल्या अहिल्या यांच्या अंगी काही वेगळे गुण आहेत, हे मल्हारबांनी जोखले. तेव्हाही कमी संख्येने पण काही मुरब्बी स्त्रिया चांगले राजकारण करत होत्या; पण अहिल्यादेवी इतका अमीट ठसा कुणाचा उमटला नाही. याला अनेक कारणे आहेत. सर्वात प्रथम श्रेय दिले पाहिजे ते मल्हारबांना. त्यांनी सून करून आणली ती काही केवळ लाडक्या चिरंजीवाची खातिरदारी करायला, वा वंशाला दिवा देईल म्हणून, वा सरदारीण म्हणून मिरवायला नाही. कुळधर्म कुळाचार तर होतेच. पण समाजकारण, प्रजारक्षण हेही होळकर घराण्याचे कुळाचार होते. तिने राजकारणात लक्ष द्यावे हे त्यांच्या तेव्हाही मनात असणार, कारण स्वत:च्या पत्नीलाही त्यांनी तो अधिकार दिला होता. त्यांच्या पत्नी गौतमाबाई मल्हाररावांसोबत रणभूमीवर जात. सोबत जाऊन केवळ तीर्थाटने करत नसत. मसलतीत भाग घेत. मल्हाररावांना सल्ला देत. आग्रह धरत. त्या घरातील बारीकसारीक व्यवस्था चोख ठेवत तसेच त्यांचे बारीक लक्ष राजकारणावरही असे.



धनगर समाजात असलेली एक लहानशी सुजाण प्रथा म्हणजे दिवसभरात रुपया कमावला तर त्यातले चार आणे बायकोच्या मालकीचे. त्याचेच मल्हारबांनी रीतसर, अधिकृत प्रथेत रूपांतर केले. घरच्या स्त्रीसाठी, स्वतंत्र खासगी मालमत्तेसाठी, निराळी उत्पन्ने लावून दिली. पण केवळ संपत्ती हाती दिली नाही, त्यासोबत जबाबदारीही दिली. तरुण वयात असलेला उत्साह, शिकण्याची तयारी याचा उत्तम वापर करून तरुण सुनेची सारी ऊर्जा चांगल्या मार्गाने प्रवाहित केली. मुलगा खंडेराव गेल्यानंतर अहिल्यादेवींना सती जाण्यापासून परावृत्त केलं आणि मग संपूर्ण भार त्यांच्या खांद्यावर विश्वासाने दिला.

आपल्या घरातच पद राहावे म्हणून सुनेला प्यादे म्हणून पुढे केले जाणे निराळे आणि मनापासून तिला घडवणे निराळे. लढाया, मसलती, शस्त्रनिर्मिती, कारखाने व्यवस्थापन, युद्धशास्त्र सारे सारे बारकावे त्यांनी सुनेला शिकवले. एवढेच नव्हे तर पुढे राजकारणात बाई म्हणून अहिल्यादेवींना मागे ठेवावे अशा सूचना करणाऱ्यांना मल्हाररावांनी ‘ही होळकरांची परंपरा आहे’ म्हणत त्यांना ‘मागे व्हा असे सांगू शकत नाही’, असे ठणकावले.

गौतमाबाई तशाच. त्यांनी अहिल्येचे अंतरंग घडवले. खूप निगुतीने, काळजीपूर्वक. धर्माचा आधार घेतला. दोघीही अत्यंत धार्मिक, पूजापाठ, कीर्तने, प्रवचने यात मनापासून रमणाऱ्या पण त्यातीलही चोख तत्त्वज्ञान, संस्कार तेवढा वेचत आलेल्या. लहानगी अहिल्या त्यांच्या हाताखाली सारं शिकली. त्यांचा जणू उपदेश होता :

अहिल्ये, बाईपण, आईपण नि राणीपण नीट समजून घे.
नीट सांभाळ, मर्यादेत राहा, पण अमर्याद स्वप्नं पाहा.
अहिल्ये, पदर घे.
चारित्र्य जिवापाड सांभाळ.
अहिल्ये, पदरात घे.
रयतेची आई हो.
अहिल्ये, पदर खोच.
उभी राहा, खचू नको.
अहिल्ये पदरमोड कर.
कामे कर, पण खर्च मात्र सरकारी नाही, खासगीतून कर.
अहिल्ये, पदर पसरू नको.

देवाशिवाय कुणाहीपुढं.

प्राणपणाने पाळले तिने हे संस्कार. ती काही दिल्लीच्या तख्ताची राणी नव्हती, पण सारा हिंदुस्थान तिने पदराखाली घेतलेला. सारा खर्च खासगीतून करूनही सुमारे सोळा करोड रुपयांची कामे, देवालये-घाट-धर्मशाळा पाणपोया-अन्नछत्रे अशा माध्यमातून उभी केली.

दोन-सव्वा दोनशे वर्षे टिकलेत अहिल्याबाईंनी बांधलेले घाट, किल्ले, तट, बुरुज आणि इमारती. अहिल्याबाईंच्या बांधकामांसारखेच त्याचे व्यक्तित्व, चारित्र्यही होते. अभेद्य. चिरेबंदी. वैयक्तिक स्वार्थ, लोभ, अहंकार अशा कुठल्याही उपद्रवी मुळ्या त्यांनी स्वत:मध्ये कधीच रुजू दिल्या नाहीत. गवताच्या पेंडीपासून चोख हिशेब. सरकारी दौलतीचा खासगीसाठी वापर नाही. पै-पैचा हिशेब चोख असलाच पाहिजे. पती खंडेरावांनाही यातून सूट नाही. 'नियत शाबूत हा राज्यकर्त्यांचा प्राण' असे परखडपणे सांगून लूट जमा करायला लावत. अशी फट, ज्यातून भ्रष्ट आचाराचे विषवृक्ष फोफावतील, प्रथम घरातच पडू दिली नाही. रस्त्याला नावे दिली. तिथंही नातलगांची नावे नाहीत. न्यायनिवाडा असा की मल्हारबा चकित होत. कधीही रयतेला कष्ट पडू दिले नाहीत.

बड्या लोकांना पैसा देताना घाई करत नसत. पण शेतकरी, कामकरी, कारागीर यांना मोबदला देताना जराही दिरंगाई नसे. कर्त्या बाईसारख्या, घरातील नातलग महिलांची वास्तपुस्त, मानपान, व्यवस्था पाहतच. पण बड्या घरंदाज स्त्रिया असोत वा सामान्य संसारी बाई, कुणीही त्यांच्यापर्यंत गऱ्हाणे घेऊन जाऊ शकत. त्या घरगुती प्रकरणे मिटवण्यापासून हुंडाबंदीचा आदेश जारी करेपर्यंत गरज असेल ते सारे करत. नियमांमध्येही शक्यतो फटी राहूच दिल्या नाहीत. घरच्या आघाडीवर तेच. पती खंडेराव कर्तेपण निभावत नव्हते; पण ते अंगी यावे यासाठी धडपड केली. नवऱ्याला जबाबदारी देण्यासाठी सासऱ्याला समजावले. प्रसंगी पारंपरिक सुनेसारखे माघार घेत सासरा नवरा यांना मोठेपण दिले. नात्यातही फट पडू दिली नाही. अष्टपैलू, अष्टावधानी म्हणजे काय ते अहिल्यादेवींवरून समजून घ्यावे. 'सुपर वूमन' 'अष्टभुजा' या साऱ्या संकल्पना जिवंत साकार झालेल्या त्यांच्या चरित्रात पाहाव्यात.

राजकारण, मुत्सद्दीपणा, दूरदृष्टी, गुणग्राहकता, उद्योजकता, वात्सल्यभाव, सौंदर्यदृष्टी काय नव्हते त्यांच्यात! राज्यकर्त्याची आर्य चाणक्यांनी सांगितलेली वैशिष्ट्ये त्यांच्यात पुरेपूर दिसतात. करांची चोख, बिनबोभाट वसुली, तरीही जनक्षोभ नाही. भरपूर कामे, पण गंगाजळी वाढती, हे कसे? एक स्त्रीच हे करू जाणे. तुटपुंजी कमाई असो, वा धोधो येणारी लक्ष्मी. शहाणी, योजक स्त्री असेल तर सगळीकडे पुरे पडूनही शिल्लक टाकण्याचे कौशल्य तिच्यात असते. पैसा ही उपभोगाची, प्रदर्शनाची नाही, तर 'दानं संविभाग:' म्हणून गरजेपुरते ठेवून दान करण्याची, अभाव पुसण्याची वस्तू आहे हे ती जाणते. तिच्या घरातून मग लक्ष्मी कधीच जात नाही. अहिल्याबाई अशा होत्या. त्यांचा स्वत:चा मोठा ग्रंथसंग्रह होता. धर्मग्रंथांचे नित्य वाचन असे. त्यात रयतेला सहभागी करून घेत. निरूपणे करून ऐकायला बोलवत. धर्माचा त्यांनी स्वत:चे व रयतेचे चारित्र्य घडवण्यासाठी किती सुरेख वापर केला. त्यांची सात्विकता, धार्मिकता हीच ठळकपणे पुढे येते; पण तेवढेच नव्हते त्यांच्यात. त्या प्रत्यक्ष फारशा लढल्या नाहीत; पण दोनेकशे महिलांची फौज त्यांनी तयार ठेवली होती. अत्यंत वाक्चतुर, व्यवहारचतुर होत्या. समजुतीने धोरणीपणाने राजकारण करत असत. पण प्रसंग पडता मी बाई काय करू शकेन असे मनी आणू नका, आम्ही काही बांगड्या भरल्या नाहीत असे सुनावण्याची धमक त्यांच्यात होती.

राज्यकारभार हाती घेताच त्यांनी सर्व रचना नव्याने बसवल्या. कामे वाटली. जबाबदाऱ्या निश्चित केल्या. करवसुली करण्याची रचना असो वा बखेडाबंड मिटवणे असो, चौफेर पकड होती. लक्ष होते. माणसे पारखत असत. कुठल्या कामासाठी कोण योग्य हे त्यांची नजर बरोबर हेरत असे.

व्यवस्थापन शास्त्राचे धडे काय निराळं सांगतात? योग्य कामास योग्य माणूस. योग्य माणसास योग्य काम. बारीक सारीक सूचना, रचना बसवणे. चोख अंमलबजावणी करून घेणे. कुठेही अफरातफर चालढकल खपवून न घेणे आणि जोडलेल्या माणसाच्या अडीनडी निभावून त्याला कुटुंबआघाडीवर बिनघोर ठेवणे. बंदुका तोफगोळे यांचे कारखाने चालवणे, मोहिमांचे काटेकोर नियोजन करणे, दूरदूरच्या प्रदेशात कसमे उभी करणे, काहीच सोपे नाही.

अहिल्यादेवी होळकर नावाच्या पारंपरिक, धार्मिक स्त्रीने हे २०० वर्षांपूर्वी करून दाखवलेय. जिथे जिथे कामे उभी केली तिथे तिथे त्याची पुढची कायमची व्यवस्था लावली. घाट, मंदिरे बांधताना सौंदर्यदृष्टी होतीच. उत्तम व प्रामाणिक कलाकार, कारागीर निवडत. ठिकाणे निवडतानाही केवळ रम्य ठिकाण, धार्मिक महत्त्व, असा निकष होता असे नाही. पेशव्यांच्या सन्मानार्थ घाट बांधून जपलेले नाते, असणारा आदर चिरस्थायी केला. अजून एक विलक्षण इतिहासाची स्मृती त्यांनी आवर्जून जपली आहे. शंकराचार्य महेश्वरला आले असताना मंडनमिश्रांसोबत २१ दिवस चाललेली चर्चा विख्यात आहे. आचार्य प्रथम नदीवर स्नानासाठी आले असतील. याच नदीवर आलेल्या स्त्रियांना त्यांनी मंडनमिश्र कुठे राहतात असे विचारले होते. या घटनेची नोंद राहावी म्हणून 'मंडाल खो घाट' किंवा 'कालेश्वर घाट 'बांधला आहे.

सोमनाथाची पुनर्स्थापना करून त्यांनी हिंदू अस्मिता जपलीच; पण कलकत्ता ते काशी चांगला रस्ता व्हावा नि रामेश्वराला काशीच्या गंगेचे पाणी पोहोचवता यावे, अशा उत्तुंग कल्पना त्यांच्या मनात होत्या. 'देश' चालवणारा, चालवू शकणारा शासकच अशी स्वप्ने पाहतो.

हिंदुस्थानचा एकछत्री अंमल एकहाती चालवण्याची धमक त्यांच्यात नक्कीच होती. विश्वस्त वृत्तीने राज्य चालवणे; पण काम करायचे तर राज्य, सत्ता राखावी लागते याचेही भान जपणे, यातले विलक्षण संतुलन त्यांनी साधले होते. वैयक्तिक अहंकार शून्य पण राज्यकर्ता म्हणून अस्मिता जपणे, हा अवघड तोल त्यांनी सांभाळला. होळकरांच्या गादीचा सन्मान, उत्कर्ष त्यांनी आपल्या शुभ्रवस्त्रांकित खांद्यावर समर्थपणे पेलला. आपल्या घराण्याचा वंश खुंटलेला त्यांना पाहावा लागला. पण त्यांनी अक्षरशः आसेतू हिमाचल उभी केलेली कामे, हा वारसा त्या मागे ठेवून गेल्या.

अहिल्यादेवींच्या चरित्रात व्यवस्थापनाचे, अर्थनियोजनाचे, राजकारणाचे अशा अनेक विषयांचे धडे सापडतात. हे सारे धडे सर्वांना प्रेरणा देणारे आहेत.


**(लेखिका या सामाजिक कार्यकर्त्या आहेत.)**

एक अतिशय दानशूर, कर्तृत्ववान, धर्मपरायण व कार्यक्षम राज्यकर्ती म्हणून अहिल्यादेवी होळकर हे नाव मराठ्यांच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिले गेले आहे. त्यांचा जन्म चौंडी या छोट्याशा गावात माणकोजी व सुशिलाबाई शिंदे या दाम्पत्यापोटी झाला. धनगर समाजात जन्मलेल्या अहिल्याबाईंचे लग्न वयाच्या आठव्या वर्षी सुभेदार मल्हारराव होळकर यांच्या मुलाशी, खंडेरावांशी झाले. खंडेरावांच्या आईचे नाव गौतमीबाई होते; पण अहिल्यादेवींनी याबाबतीत तक्रार न करता सासऱ्यांनी नेमून दिलेल्या कामात लक्ष घातले.

# कार्यक्षम राज्यकर्ती अहिल्यादेवी होळकर

(३१ मे १७२५ – १३ ऑगस्ट १७९५)

कुशाग्र बुद्धीची देणगी लाभलेल्या या सूनबाईंवर सासऱ्यांचा मोठा विश्वास होता आणि खूप महत्त्वाचा पत्रव्यवहार ते अहिल्यादेवींवरच सोपवीत असत. खंडेरावांपासून त्यांना दोन अपत्ये झाली. मालेराव हा मुलगा आणि मुक्ताबाई ही कन्या. अहिल्यादेवींना वयाच्या २८व्या वर्षी वैधव्याला सामोरे जावे लागले. पती खंडेराव कुंभेरी येथे लढाईत मरण पावले. त्यावेळच्या प्रथेप्रमाणे त्या सती जायला निघाल्या; पण सासरे म्हणाले, 'प्रजाहितासाठी तरी तुम्ही सती जाऊ नये. हे राज्य सांभाळायचे आहे.'



## प्रजाहिताकडे लक्ष

आपल्या सासऱ्यांच्या इच्छेचा अहिल्यादेवी होळकरांनी मान राखला आणि सती न जाता राज्यकारभारावर आपले लक्ष केंद्रित केले. मल्हारराव ज्यावेळी मोहिमेवर असत, तेव्हा स्वतः अहिल्यादेवी राज्याचा बंदोबस्त चोख राखीत असत. मल्हाररावांच्या सल्ल्यानुसार वागत असत.

मल्हारराव होळकरांना पेशव्यांनी इंदूर संस्थानची जहागीर दिली होती. दौलतीचा कारभार मोठा होता; पण १७६६ मध्ये त्यांचे निधन झाले आणि अहिल्यादेवींवर फार मोठी जबाबदारी येऊन पडली. त्यांचा पुत्र मालेराव यांना जरी सुभेदारीची वस्त्रे मिळाली, तरी ती सांभाळण्याची त्यांच्यात कुवत नव्हती. लवकरच त्यांचे देहावसान झाले. अहिल्यादेवी आता खऱ्या अर्थाने राज्यकर्ती झाल्या. पुढील २८ वर्षे त्यांनी राज्यकारभाराचा गाडा सैन्याच्या सहकार्याने अतिशय कुशलपणे चालवला. तिजोरीत भर घालीत त्यांनी प्रजाहिताकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले.

## धर्मपरायण आणि उदार वृत्ती

अहिल्यादेवी होळकर हे नाव मराठ्यांच्या इतिहासात अमर झाले. त्याला त्यांची धर्मपरायण

आणि उदार वृत्ती कारणीभूत ठरली. बाई काय राज्य कारभार करणार ही दरबारी मंडळींची अटकळ त्यांनी खोटी ठरवली. अशी शंका घेणाऱ्यात त्यांचा जुना दिवाण गंगाधर यशवंत चंद्रचूड उर्फ गंगोबा तात्या हा प्रमुख होता. राघोबादादांशी त्यांनी अहिल्यादेवींविरुद्ध संधान बांधले आणि इंदूर बळकावण्यासाठी त्यांना प्रोत्साहित केले. अहिल्यादेवींना हे कळले, तेव्हा त्या युद्धास तयार असल्याचे त्यांनी राघोबादादास कळवले. राघोबांना ते अडचणीचे झाले. हरलो तर बाईकडून हरलो आणि जिंकलो तरी बाईशी युद्ध करण्यात कोणती मोठी मर्दुमकी! शेवटी राघोबांना माघार घ्यावी लागली. त्यांचा उत्तम पाहुणचार अहिल्यादेवींनी इंदुरात केला. अशा रितीने त्यांच्या लौकिकात आणखीच भर पडली.

अहिल्यादेवींच्या आयुष्यातील एक अविस्मरणीय घटना त्यांचा लौकिक वाढवणारी आहे. आपली कन्या मुक्ताबाई हिचे स्वयंवर घोषित करताना त्यांनी जाहीर केले की, जो कोणी चोर, लुटारू, दरोडेखोर यांचा राज्यात बंदोबस्त करील, त्या शूर व्यक्तीशी मुक्ताबाईंचा विवाह लावला जाईल. त्यावेळी जातपात बघितली जाणार नाही. हा अलौलिक विचार जाहीर करून त्या थांबल्या नाहीत, तर त्यांनी कृतीही तशीच केली. यशवंतराव फणसे या गुणी, शूर तरुणाशी त्यांनी मुलीचा विवाह करून दिला.

## सुधारणावादी राज्यकर्ती

अहिल्यादेवी एक चाणाक्ष आणि सुधारणावादी राज्यकर्ती होत्या. पूर्वीच्या कायद्यांमध्ये त्यांनी परिस्थितीनुसार काही सुधारणा केल्या. करपद्धती सौम्य केली, मात्र शेतकऱ्यांकडून सारा घेणे चालू ठेवले. पाटील-कुळकर्ण्यांच्या वतन हक्कांचे संरक्षण करून गावोगावी न्याय देणारे पंच अधिकारी नेमले. त्यावेळी डोंगर मुलखातून भिल्ल व गोंड आदिवासी प्रवाशांना उपद्रव देत आणि त्यांच्याकडून भीलकवडी नावाचा कर वसूल करत. तेव्हा बाईंनी त्यांच्याशी संवाद साधून त्यांचा कर घेण्याचा हक्क मान्य केला. त्यांच्याकडून पडिक जमिनींची लागवड करून घेतली. शिवाय त्यांना विशिष्ट हद्द नेमून दिली. जमीन करारपट्ट्याने देण्याची पद्धत सुरू केली. राजधानी इंदूरहून नर्मदातीरी महेश्वरला हलवली (१७७२). तिथे अनेक वास्तू बांधल्या. राजवाड्यात प्रशस्त देवघर होते. नदीला घाट बांधले. मंदिरांचा जीर्णोद्धार केला व पूर्वजांच्या स्मरणार्थ छत्र्या बांधल्या. महेश्वर हे विणकरांचे मध्यवर्ती केंद्र होते. आहिल्यादेवींनी वस्त्रोद्योगास उत्तेजन दिले, कोष्ट्यांची वसाहत स्थापन केली आणि उत्तम हातमागाची सणंगे तयार होतील, अशी पेठ कायम केली. त्यांचा मूळ स्वभाव सौम्य असला तरी राज्यकारभारात त्यांनी मनरूपसिंगसारख्या कुविख्यात डाकूला फाशी दिली. होळकरांच्या टांकसाळीतील नाण्यांवर बिल्वपत्र व शिवलिंग यांचे छाप असत.

त्यांच्या धर्मपरायणतेला प्रांतमर्यादा नव्हती. त्यामुळे त्यांचे नाव आसेतुहिमाचल घेतले जाते. त्यांनी अन्नछत्रे उघडली, राज्यातून विहिरी खोदून त्या चिरेबंद बांधून दिल्या. उन्हाळ्यात राज्यातून प्रवास करणाऱ्यांसाठी पाणपोया, धर्मशाळा, पांथशाळा, आश्रयशाळा बांधल्या. जनावरांसाठी डोण्या बांधून घेतल्या. पशुपक्ष्यांसाठी रुग्णोपचारांची व्यवस्था केली. सर्पदंशावर लगोलग उपचार व्हावेत म्हणून हकीम-वैद्य नेमले. स्त्रियांना सुरक्षित स्नानासाठी, कपडे बदलण्यासाठी बंदिस्थ ओवऱ्या ठेवल्या. मुंग्यांना साखर आणि जलचरांना कणकेच्या गोळ्या खाऊ घालण्यापर्यंत त्यांचा दानधर्म सढळ होता. गोरगरिबांना सणासुदीला त्या अन्नदान करत, कपडे वाटत, थंडीच्या दिवसात घोंगड्या वाटल्या जात.

## मंदिरांचा जीर्णोद्धार

अहिल्यादेवींनी प्रमुख तीर्थक्षेत्री विशेषतः अयोध्या, नाशिक, द्वारका, पुष्कर, हृषीकेश, जेजुरी, पंढरपूर, गया, उदेपूर, चौंढी येथे मंदिरे बांधली. याशिवाय सोरटी सोमनाथ, ओंकारेश्वर, मल्लिकार्जुन, औंढानागनाथ, काशीविश्वेश्वर, विष्णुपाद, महाकाळेश्वर आदी मंदिरांचा जीर्णोद्धार केला. वाराणसी, प्रयाग, पुणतांबे, चौंढी, नाशिक, जांब (इंदूर), त्र्यंबकेश्वर येथे नदीला विस्तीर्ण घाट बांधले आणि गोकर्ण महाबळेश्वर, उज्जैयिनी, रामेश्वर, भीमाशंकर आदी ठिकाणी अन्नछत्रे उघडली. सप्तपुरे-चार धामे या ठिकाणी घाट, बाग, मंदिरे, कुंडे, धर्मशाळा बांधून यात्रिकांची सोय केली. शिवाय त्यांनी जेजुरी येथे श्री मल्हारी गौतमेश्वराची छत्री, इंदूरला मालेराव व गौतमीबाई यांच्या छत्र्या आणि महेश्वरला मुक्ताबाईंच्या स्मरणार्थ नाजूक कारागिरी केलेले मंदिर बांधले व कुंभेरीजवळ खंडेरावांच्या स्मरणार्थ छत्री बांधली.

## ग्रंथसंग्रह

अहिल्यादेवींचा ग्रंथसंग्रह मोठा व दुर्मीळ होता. त्यात निर्णयसिंधू, द्रोणपर्व, ज्ञानेश्वरी, मथुरा माहात्म्य, मुहूर्त चिंतामणी, वाल्मिकी रामायण, पद्मपुराण, श्रावणमास माहात्म्य इत्यादी ग्रंथांच्या हस्तलिखित प्रती होत्या. विद्वानांना त्यांच्या योग्यतेप्रमाणे मानसन्मान दिला जाई. मोरापंत व शाहीर अनंत फंदी यांचा अहिल्याबाईंनी आदर-सत्कार करून अनंत फंदीस सल्लाही दिला आणि तमासगिरीपासून परावृत्त केले.



अखेरच्या दिवसांत त्यांना दुःख आणि संघर्षाला तोंड द्यावे लागले. त्यांचे दोन भाऊ वारले. मुलीचा मुलगा नाथ्याबा ऐन तारुण्यात गेला (१७९०), तुकोजी होळकरांची सून आनंदीबाईचे देहावसान झाले. त्यानंतर जावई यशवंतराव फणसे अचानक गेले आणि मुक्ताबाई सती गेली. अशा बिकट परिस्थितीत शिंदे यांचा सरदार गोपाळराव याने १७९२ मध्ये होळकरांच्या फौजेवर हल्ला केला. तेव्हा तरुणासही लाजवील अशा तडफदारीने त्यांनी शिंदे यांचा पराभव केला. त्यांच्या राज्यात सुबत्ता, संपन्नता व शांती होती. त्या अजातशत्रू होत्या.


मध्यम उंचीची, सावळ्या वर्णाची, डोईवर पदर घेतलेली ही स्त्री कर्तृत्व आणि विचार या दोन्ही दृष्टींनी केवढ्या उंचीची होती, हे त्यांचे आयुष्यच सांगते. त्यांचे महेश्वर येथे वृद्धापकाळाने निधन झाले.

**संदर्भ : मराठी विश्वकोश**

**धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि साहित्यिक इतिहासात संत महात्मा बसवेश्वर यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे मानले गेले आहे. बुद्धांच्या महान क्रांतीनंतर लिंगायत धर्म स्थापनेतून सगळ्यात मोठी सामाजिक क्रांती करणारे महान पुरुष म्हणजे महात्मा बसवेश्वर आहेत. बसवेश्वरांनी अनेक लोकोपयोगी कामे केली.**

# संत महात्मा बसवेश्वर

बसवेश्वर (११३१-६७) वीरशैव धर्माचे पुनरुज्जीवन करणारी एक महान विभूती. कर्नाटक ही त्यांची कर्मभूमी. धर्म, समाज, तत्त्वज्ञान, वाङ्मय, राजकारण इ. क्षेत्रांत त्यांनी केलेले कार्य क्रांतिकारक स्वरूपाचे आहे. त्यांचा जन्म बागेवाडी (जि. विजापूर) येथे एका शैव ब्राह्मण कुळात झाला. काहींच्या मते तो इंगळेश्वर (जि. विजापूर) या गावी झाला असावा. त्यांच्या जन्मकाळाविषयी मतभेद असले, तरी सामान्यतः त्यांचा जन्म वैशाखातील अक्षय्य तृतीयेला झाल्याचे मानले जाते. त्यांच्या आईचे नाव मादलांबिके व वडिलांचे मादिराज. लिंगायत लोक बसवेश्वरांना शिववाहन नंदीचा (काही वेळा स्वतः शिवाचाही) अवतार मानतात. बसव (सं. वृषभ = बैल) या नावावरूनही हे सूचित होते. वयाच्या आठव्या वर्षी मुंजीची तयारी झाल्यावर 'मला आधीच लिंगदीक्षा मिळाली आहे' असे म्हणून त्यांनी मुंज करून घ्यावयाचे नाकारले आणि घर सोडून ते कूडलसंगम (जि. विजापूर) येथे निघून गेले. कूडलसंगम (कन्नड - कूडल = संगम) हे स्थान कृष्णा व मलप्रभा यांच्या संगमावर आहे. त्यांना लिंगदीक्षा कोणी दिली, याविषयी विद्वानांत मतभेद असून संगमेश्वर, जातवेदिमुनी इत्यादींची नावे या संदर्भात सांगितली जातात. जातवेदिमुनींनाच ईशान्य गुरू असेही म्हटलेले असून तेच कूडलसंगम या विद्याक्षेत्राचे स्थानपती होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली बसवेश्वरांनी अभ्यास केला. कूडलसंगम येथे त्यांनी वेगवेगळ्या भाषा, धर्म, तत्त्वज्ञाने इत्यादींचा अभ्यास केला. तसेच येथे त्यांना संतसहवास मिळाल्यामुळे व त्यांनी कूडलसंगमेश्वराची उत्कट भक्ती केल्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व प्रगल्भ झाले. कूडलसंगम येथून ते मंगळवाड (सध्याचे मंगळवेढे, जि. सोलापूर) येथे बिज्जल नावाच्या महामंडलेश्वराकडे गेले, असे, काही अभ्यासक मानतात. सांप्रदायिक पुराणांतून मात्र मंगळवाड या गावाचा निर्देश वगळलेला असून ते कल्याणसा (सध्या बसवकल्याण, जि. बीदर) गेल्याचे म्हटले आहे. बिज्जल हा पुढे राजा बनला. बसवेश्वरांनी त्याच्याकडे कर्णिकाच्या (कारकुनाच्या) नोकरीपासून प्रारंभ केला व पुढे ते कोषागार-मंत्री बनले. त्यांचा मामा बलदेव हा बिज्जलाचा मंत्री होता. कल्याण येथे त्यांनी धर्मसुधारणेचे कार्य केले. त्यांना यज्ञयागांतील पशुहत्या, वर्णभेद, वर्गभेद व जातीभेद मान्य नव्हते. त्यामुळे सनातनी लोकांनी त्यांच्याविषयी बिज्जलाचे मन कलुषित केले. शेवटी बिज्जलाचे सैन्य व बसवेश्वरांचे अनुयायी यांच्यात मतभेद सुरू झाले. या हिंसाचाराला कंटाळून ते कूडलसंगम येथे गेले व त्यांनी तेथे समाधी घेतली. कूडलसंगम येथे त्यांची समाधी आहे.



## प्रकाशाच्या शोधार्थ

बसवेश्वरांचा उदय होण्यापूर्वी कर्नाटकात हिंदू, जैन, बौद्ध इ. धर्म व कापालिक, कालामुख, शाक्त इ. पंथ प्रचलित होते. परंतु ही संयुक्त धर्मपरंपरा भ्रष्ट व अवनत अवस्थेतच होती. या पार्श्वभूमीवर बसवेश्वरांनी शिव हा एकमेव ईश्वर असल्याची घोषणा करून शिवोपासनेचा पुरस्कार केला. त्यांच्या उत्कट शिवभक्तीमुळे त्यांना भक्तिभांडारी असे नाव प्राप्त झाले. ते कूडलसंगम येथील संगमेश्वराचे निष्ठावंत भक्त होते. त्यांनी ज्ञान, भक्ती व कर्म यांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न केला. 'ओम नमः शिवाय' हा षडक्षरी मंत्र त्यांना अत्यंत प्रिय होता. त्यांनी दया, अहिंसा, सत्य, सदाचार, नीती, शील इत्यादींचा प्रचार केला. एकाच देवाची भक्ती करा, भूतदया बाळगा, प्रेमाने वागा, परोपकार करा अशी त्यांची शिकवण होती.

बसवेश्वर हे एक समर्थ योगी असल्यामुळे त्यांना ईश्वरी साक्षात्कार झाल्याचे व त्यांनी काही चमत्कार केल्याचेही उल्लेख आढळतात. उदा. पूर आलेला असताना त्यांना कृष्णेने वाट करून दिली, त्यांनी बिज्जलाला गुप्त खजिना दाखवला. धान्यकणांचे रत्नांमध्ये रूपांतर केले इ. कथा सांगितल्या जातात. त्यांच्याकडे चोरी करण्यासाठी व दरोडे घालण्यासाठी आलेले लोकही त्यांचे शिष्य बनले, यावरून त्यांचा प्रभाव ध्यानात येतो.

बसवेश्वरांनी कल्याण येथे निर्माण केलेली शिवानुभवमंटप म्हणजेच अनुभवमंटप ही संस्था जागतिक धर्मेतिहासातील अनन्यसाधारण संस्था होय. वेगवेगळ्या जातींतील व व्यवसायांतील भक्त म्हणजेच शिवशरण येथे एकत्र जमत आणि विविध विषयांवर चर्चा करत असत. बसवेश्वरांनी धर्मप्रसारासाठी संन्यास घेतला नाही, भाष्ये लिहिली नाहीत वा प्रवासही केला नाही; परंतु मंटपातील चर्चेच्या माध्यमातून त्यांनी लोकांमध्ये जागृती केली. येथे परिसंवादाच्या स्वरूपाची जी चर्चा होत असे, तीच

कन्नड साहित्यामध्ये वचनसाहित्याच्या रूपाने प्रसिद्ध झाली. या मंटपातील शून्यपीठाचे अध्यक्षपद अल्लमप्रभू (बारावे शतक) यांना देण्यात आले होते. येथे होणाऱ्या चर्चेच्या माध्यमातून बसवेश्वरांनी वेगवेगळ्या जातिजमातींच्या लोकांमध्ये बंधुभाव आणि विचार-स्वातंत्र्याची प्रेरणा निर्माण केली.

## कायकाचा संदेश

शारीरिक श्रम वा व्यवसाय हाच स्वर्ग (कैलास) आहे, अशी घोषणा करणारा 'कायकवे कैलास' हा बसवेश्वरांनी मांडलेला एक महान सिद्धान्त आहे. कोणत्याही प्रकारचे शारीरिक श्रम हे हीन दर्जाचे नाहीत, असे सांगून त्यांनी श्रमप्रतिष्ठा वाढवली. प्रत्येक व्यक्तीने आपल्या श्रमावरच आपली उपजीविका चालवावी, या बाबतीत जंगमांचाही अपवाद करू नये, असे त्यांनी आग्रहपूर्वक सांगितल्यामुळे त्यांच्या तत्त्वज्ञानात भिक्षावृत्तीला वाव राहिला नाही, परंतु त्यांनी कायक हे केवळ पैशासाठी सांगितलेले नाही. तसेच ते कर्मसिद्धान्तावर आधारलेले नसून त्यात व्यक्तीला व्यवसायस्वातंत्र्य देण्यात आलेले आहे. मोक्षासाठी अरण्यात पलायन करण्याची गरज नाही, असे हा सिद्धान्त मानतो. श्रमप्रतिष्ठेबरोबरच गरजेनुसार संपत्तीची विभागणी करावी, ही विचारसरणी मांडल्यामुळे बसवेश्वरांची वृत्ती समाजवादी होती, असे काही अभ्यासक मानतात. बसवेश्वरांच्या उपदेशामुळे वेगवेगळ्या व्यवसायांना, विशेषतः ग्रामोद्योगांना, प्रोत्साहन मिळाले आणि सर्व व्यावसायिकांमध्ये समभाव निर्माण झाला. आपले विचार सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचावेत म्हणून त्यांनी संस्कृतऐवजी कन्नड भाषेतून आपला उपदेश केला. त्यासाठी त्यांनी आधीच प्रचलित असलेल्या वचननामक साहित्यप्रकाराचा अवलंब केला. शैलीदार, प्रभावी व अंतःकरणाला भिडणारा असा हा साहित्यप्रकार असल्यामुळे त्याला वचनभेद, वचनशास्त्र इ. नावे प्राप्त झाली आहेत. कन्नड साहित्याच्या क्षेत्रात बसवेश्वरांचे योगदान म्हणूनच अत्यंत महत्त्वाचे ठरले. बसवेश्वरांच्या पट्स्थलवचन, कालज्ञान, मंत्रगौप्य, शिखारत्नवचन या ग्रंथांना श्रेष्ठ धर्मग्रंथांचे अमरत्व कन्नडमध्ये प्राप्त झालेले आहे.



कांचीचे शंकराराध्य (अठरावे शतक) यांनी संस्कृतमध्ये 'बसवपुराण' नावाचा ग्रंथ लिहिला आहे. महाभारतकार व्यासांच्या नावावर असलेला; परंतु चौदाव्या शतकानंतर दुसऱ्याच कोणी तरी लिहिलेला बसवपुराण नावाचा आणखी एक संस्कृत ग्रंथ आढळतो. हा ग्रंथ करिबसवशास्त्री यांनी लिहिला असे म्हणतात. तमिळमध्ये बसवपुराण (सु. सतरावे शतक), प्रमुलिंग लीले (मराठी अनु. कविब्रह्मदासकृत लीलाविश्वंयभर) आणि बसवपुराणपट्क्रम अशा तीन ग्रंथांतून बसवेश्वरांचे चरित्र आढळते. हरिहर (सु. ११८०-१२२०) नावाच्या कवीने कन्नडमध्ये बसवराजदेवररगळे या नावाने त्यांचे चरित्र लिहिले आहे.

## सामाजिक धार्मिक परिणती

पारंपरिक भारतीय समाजातील वर्णजातिमूलक उच्चनीचता व विषमता यांची प्रखर जाणीव बसवेश्वरांना झाली होती. म्हणूनच त्यांनी चातुर्वर्ण्याला आव्हान देऊन सर्व मानवांना समान मानले. परिणामतः त्यांच्याभोवती सर्व वर्णांतील व जातींतील अनुयायी जमा झाले. आंतरजातीय रोटीव्यवहार व बेटीव्यवहार करण्यास त्यांनी प्रोत्साहन दिले. उदा. त्यांच्या अनुयायांमध्ये मधुवय्या नावाचा ब्राह्मण व हरळय्या नावाचा चांभार यांचा अंतर्भाव होता. त्यांनी मधुवय्याच्या मुलीचे हरळय्याच्या मुलाशी लग्न लावून दिले. त्यांनी शिवनागमय्या व ढोर कक्कय्य या अस्पृश्यांच्या घरी जाऊन भोजन केले होते. बाराव्या शतकात बसवेश्वरांनी सुरू केलेले हे कार्य निश्चित क्रांतिकारक होते.

त्यांनी बालविवाहाला विरोध केला. तसेच विधवांच्या पुनर्विवाहाला मान्यता दिली. सर्व मानव समान आहेत, याचा अर्थ स्त्री व पुरुष हेही समान आहेत, असे त्यांचे मत होते. त्यांच्या अनुभवमंटपातील चर्चेत पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियाही भाग घेत. वीरशैव धर्मात स्त्री व पुरुष या दोघांनाही लिंगदीक्षा दिली जात होती. पुरुषभक्तांप्रमाणेच स्त्रीभक्तांनीही वचनसाहित्य निर्माण केले असून त्यात तीस-चाळीस कवयित्रींची वचने आढळतात. बसवेश्वरांनी स्वतःचा उपनयन-संस्कार करून घ्यावयाचे नाकारले, यावरून बालपणापासूनच त्यांचा भावहीन कर्मकांडाला विरोध असल्याचे दिसून येते. भव्य मंदिरे बांधण्यावर खर्च करू नये, तीर्थयात्रेला जाण्याची आवश्यकता नाही यांसारख्या मतांवरूनही त्यांनी कृत्रिम कर्मकांडाला विरोध केल्याचे स्पष्ट होते. आपल्या विचारांचा प्रसार करण्यासाठी त्यांनी अनेक ठिकाणी मठ स्थापन केले आणि तेथे योग्य व्यक्तींची नियुक्ती केली. काश्मीरपासून केरळपर्यंतच्या, राजापासून रंकापर्यंतच्या आणि ब्राह्मणापासून अस्पृश्यापर्यंतच्या अनुयायांचे एक मोहोळच त्यांच्याभोवती जमले होते, यावरून त्यांच्या समर्थ संघटनशक्तीची कल्पना येऊ शकते.

पाल्कुरिकी सोमनाथ (बसवेश्वरांना समकालीन) यांनी तेलुगूमध्ये बसवपुराण लिहिले असून भीमकवी यांनी त्याचे कन्नडमध्ये भाषांतर केले आहे. मराठी, हिंदी, इंग्रजी इ. भाषातूनही बसवेश्वरांची चरित्रे लिहिण्यात आली आहेत. बसवेश्वरांच्या नावांनी चालणारी ग्रंथालये, शिक्षणसंस्था, बँका, प्रकाशने इत्यादींच्या रूपाने त्यांची अनेक स्मारके करण्यात आली आहेत. बसवेश्वरांचे कार्य अधिक क्रांतिकारक स्वरूपाचे होते व त्यामागे एक अलौकिक द्रष्टेपणा होता, हे सर्वमान्य होण्यासारखे आहे.

महात्मा बसवेश्वरांचे कार्य अतिशय महान व मानवी कल्याणकारी आहे. बसवेश्वरांनी विश्वशांती आणि विश्वबंधुत्वाचा संदेश देऊन आत्मोद्धाराचे आणि लोकोद्धाराचे मानवतावादी कार्य केले. यांचे कार्य सर्वसामान्यांपर्यंत पोहोचणे ही काळाची गरज आहे

**संदर्भ : मराठी विश्वकोश**

**छत्रपती संभाजी राजे असामान्य व्यक्तिमत्त्व होते. अचाट धैर्य, अजोड पराक्रम, असामान्य शौर्य, प्रयत्नांची पराकाष्ठा, अनेक भाषांवर प्रभुत्व, संस्कृत पंडित, धर्माभिमानी, व्यासंगी, आदर्श महावीर, समाजकारण, राजकारण, अर्थकारण, धर्मकारण अशा अनेक क्षेत्रांत आपले निर्विवाद वर्चस्व गाजवले आहे. अतिशय हुशार, कर्तबगार, दूरदर्शी, अनेक विद्या व कलांचे अधीपती व सर्वगुणसंपन्न असे संभाजी महाराजांचे व्यक्तिमत्त्व होते.**

# छत्रपती संभाजी महाराज

(१४ मे १६५७-११ मार्च १६८९). छत्रपती शिवाजी महाराजांनंतर मराठ्यांच्या गादीवर आलेले हे दुसरे छत्रपती. हौतात्म्यामुळे अजरामर झालेले एक पराक्रमी पुरुष. त्यांचा जन्म छत्रपती शिवाजी महाराज व सईबाई यांच्या पोटी पुरंदर किल्ल्यावर झाला. सईबाईंच्या अकाली मृत्यूनंतर (१६५९) त्यांचा सांभाळ आणि शिक्षण आजी जिजाबाईंनी केले.

## ग्रंथलेखन

केशवभट आणि उमाजी पंडित यांनी छत्रपती संभाजी महाराज यांना उत्तम शिक्षण दिले. केशवभटांनी त्यांना दंडनीती व प्रयोगरूप रामायण ऐकवले. राजपुत्रास आवश्यक असे घोड्यावर बसणे, शस्त्रविद्या, तालीम, तिरंदाजी वगैरेचे शिक्षण दिले. छत्रपती संभाजी महाराजांनी लिहून घेतलेल्या तीन भागांतील 'बुधभूषण' या ग्रंथात काव्यालंकार, शास्त्रे, संगीत, पुराणे, धनुर्विद्या यांचा अभ्यास केल्याचा उल्लेख आहे. यात राजा आणि त्याचे गुण, राजाचे मदतनीस, राजाचे सल्लागार, राजाची कर्तव्ये, राजसभा, मुख्य प्रधान राजपुत्र, त्यांचे शिक्षण, त्यांची कर्तव्ये, कोश, दुर्ग, सैन्य, हेर, नोकर, वगैरेची माहिती दिली आहे. याशिवाय गागाभट्टांकडून 'नीतिपर समयनय' हा ग्रंथ (पोथी) त्यांनी लिहून घेतला आणि 'धर्म कल्पलता' हा धर्मशास्त्रावरील ग्रंथ केशव पंडिताने संभाजीराजेंसाठी लिहिला.

## नऊ वर्षांची कारकिर्द

युद्धकलेतील नैपुण्याबद्दल बे कॅरे या परकीय लेखकाने छत्रपती संभाजी राजेंची प्रशंसा केली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्यूच्या वेळी संभाजी राजे पन्हाळ्यावर होते. महाराजांच्या मृत्यूनंतर अक्षयतृतीयेच्या मुहूर्तावर सोयराबाई आणि कारभारी मंडळातील काहींनी पुढाकार घेऊन राजारामांचे मंचकारोहण केले आणि छत्रपती संभाजी महाराजांस पकडण्यासाठी हंबीरराव मोहिते व प्रल्हाद निराजी यांस पाठवले; पण तेच संभाजीराजांना पन्हाळ्यावर जाऊन मिळाले. छत्रपती संभाजी महाराजांनी आपल्या विरोधातील हिरोजी फर्जंद, जनार्दनपंत हणमंते, मोरोपंत पिंगळे इत्यादींना कैदेत टाकले; तसेच अण्णाजी दत्तो व बाळाजी आवजी यांना अटक केली. १६ जानेवारी १६८१ रोजी रायगड येथे छत्रपती संभाजी महाराज यांनी विधिवत राज्याभिषेक करून घेतला. रायगडावर स्थिरस्थावर झाल्यानंतर संभाजीराजांचा बहुतेक काळ शत्रूच्या आक्रमणाला तोंड देण्यातच गेलेला दिसतो. त्यांची एकूण कारकिर्द नऊ वर्षांची. त्या सबंध काळात सिद्दी, इंग्रज, पोर्तुगीज, वाडीकर सावंत, दळवी यांच्याशी त्यांना मुकाबला करावा लागला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या अखेरच्या दिवसांत सिद्दी आणि इंग्रज यांच्याशी मराठ्यांनी तटस्थतेचे संबंध ठेवले होते. संभाजीराजांनी १६८० मध्ये सिद्दीचा बंदोबस्त करण्यासाठी आवजी पंडित या धूर्त वकिलास इंग्रजांशी बोलणी करण्याकरिता मुंबईला पाठवले. त्याने पूर्वीचा तह पाळावा, नाही तर राजे इंग्रजांविरुद्ध युद्ध पुकारतील असे सांगितले. सिद्दीने मराठ्यांना न जुमानता इंग्रजांच्या साहाय्याने मराठ्यांच्या मुलखाची नासधूस करण्यास सुरुवात केली, तेव्हा संभाजीराजांनी सिद्दीच्याच उंदेरीवर हल्ले चढवले. तसेच इंग्रजांच्या संमतीने हे सारे चालले आहे, असे समजून त्यांची जहाजे ताब्यात घेतली. पुढे १६८१ ची जंजिऱ्याची मोहीम निर्माण झाली. या वेढ्यात राजांनी स्वतः पुढाकार घेतला होता. खाडी भरून काढण्यासाठी अचाट कल्पना लढवून सैन्याला मार्ग सुकर व्हावा म्हणून त्यांनी ६६९ चौ. मी. रूंद आणि सु. २७ मी. लांब जंजिऱ्याची खाडी दगड, लाकूड, कापसाच्या गाठी यांनी भरून काढण्याचा प्रयत्न केला; परंतु खवळलेल्या समुद्रामुळे तो निष्फळ ठरला, तरीसुद्धा हा अयशस्वी वेढा पुढे आठ महिने चालला.



## पोर्तुगीज आणि छत्रपती संभाजी महाराज

अकबराचे पोर्तुगीजांशी असलेल्या मैत्रीच्या संबंधांमुळे तहाच्या वाटाघाटीत त्यास मध्यस्थ म्हणून घेतले; परंतु छत्रपती संभाजी महाराज यांनी १६८२ मध्ये अंजदीव बेटावर स्वारी केली. त्यामुळे पोर्तुगीज आणि संभाजीराजे यांमध्ये वितुष्ट निर्माण झाले. त्यातच १६८२ पासून पोर्तुगीजांनी मोगलांना सर्वतोपरी मदत देण्यास सुरुवात केली होती आणि दोघांच्या संगनमताने संभाजीराजांस पराभूत करण्याचे कारस्थान शिजू लागले. १६८३ च्या डिसेंबरमध्ये मराठ्यांनी पोर्तुगीजांची अनेक गावे घेऊन फोंडा लढवला. फोंड्याच्या लढाईत येसाजी कंक आणि त्यांचा मुलगा कृष्णाजी यांनी

मोठा पराक्रम गाजवला. शेवटी दक्षिणेत मोठी मोगली फौज घेऊन शाहआलम येत आहे, ही बातमी येताच १६८४ च्या सुरुवातीस फोंडा येथे पोर्तुगीजांशी तह केला. या तहाच्या वाटा-घाटीत कवी कलशाची भूमिका मुख्य होती आणि अकबर यास मध्यस्थ नेमले होते. दरम्यान शाहआलमच्या समाचारासाठी ते गोव्यातून गव्हर्नरने माघारी आले. तत्पूर्वी औरंगजेबाचा वकील शेख महंमद हा गोव्यात पोहोचला होता. त्याने पोर्तुगीजांनी संभाजीविरुद्ध युद्ध पुकारावे, अशी बादशहाची इच्छा असल्याचे सांगितले. तेथील गोव्याच्या गव्हर्नरने (विजरई) इतर सर्व अटी मान्य केल्या; परंतु संभाजीराजांशी सलोखा असल्यामुळे मराठ्यांशी युद्ध करण्याचे नाकारले.

## छत्रपती संभाजी महाराज – मोगल संघर्ष

प्रामुख्याने मराठी राज्य बुडवावे तसेच आदिलशाही व कुतूबशाही पादाक्रांत करावी अशा निश्चयाने आणि बंडखोरी करून छत्रपती संभाजी महाराज यांच्या आश्रयास आलेल्या आपल्या अकबर या मुलाचा सूड घ्यावा, या उद्देशाने औरंगजेब दक्षिण हिंदुस्थानात औरंगाबादेस आला. मोगलांनी मराठ्यांचा पाडाव करण्यासाठी आदिलशाहाला सैन्याच्या खर्चासाठी नऊ लाख रुपये दिले; परंतु मराठ्यांचे राज्य जिंकण्यास विजापूरकरांचा फारसा उपयोग होत नाही, हे लक्षात येताच त्याने शिकंदर आदिलशाहकडे फर्माने पाठवली. त्यात प्रमुख अट, 'संभाजीची मित्रता व सख्य बाह्यातकारी व अंतर्यामी करून सोडून देणे व सर्वांनी एकदिल होऊन संभाजींचा निर्मूळ फडशा पाडण्याकरिता विचार करणे' ही होती; पण मराठ्यांविरुद्धच्या मोहिमेत मोगलांना सर्व आघाड्यांवर अपयश येत होते. संभाजी, शिकंदर आदिलशाह आणि अबुल हसन कुतूबशाह यामध्ये एकजूट होईल, असा संशय औरंगजेबास आला म्हणून त्याने आदिलशाहीवर १६८४ मध्ये स्वारी केली. संभाजीराजे, आदिलशाह आणि कुतूबशाह यांचा गट तयार होऊन या त्रिकूटाने मोगलांशी सामना देण्याची तयारी केली. डिसेंबर महिन्यात हंबीरराव मोहिते सैन्यासह विजापुरात दाखल झाले. संभाजीराजे व गोवळकोंड्याचा सुलतान हे संकट सर्व दक्षिणीयांवर आहे, असे समजून वागत होते. दोघेही आदिलशाही सुलतानास मदत करत होते. औरंगजेबाने कुतूबशाहास आक्रमणाची धमकी दिली आणि काही अटी मान्य करावयास लावल्या. त्यांची पूर्तता झाली नाही, हे पाहून आक्रमण केले. मादण्णा व आकण्णा या दोन विश्वासू, पराक्रमी व कार्यक्षम मंत्र्यांचा विश्वासघाताने खून झाला. परिणामतः १६८६ रोजी आदिलशाही संपुष्टात आणली आणि त्यानंतर १६८७ रोजी गोवळकोंडा हस्तगत करून कुतूबशाही राज्याचा शेवट केला आणि आपली सर्व शक्ती संभाजीराजांवर केंद्रित केली. संभाजीराजांची उभी कारकिर्द औरंगजेबाविरुद्ध लढा देण्यात गेली. प्रारंभी संभाजीराजांच्या फौजांनी बृहाणपूर लुटले. त्याच सुमारास दक्षिण कोकणात शाहआलम आणि तळकोकणात हसन अलीखान उतरले. शाहआलमचा पराभव मराठ्यांनी केला. हसन अलीखान तळकोकणातून कल्याण-भिवंडीकडे गेला. १६८३ मध्ये मोगलांनी साल्हेर-मुल्हेर घेतले आणि रामसेज व त्रिंबकगडास वेढे दिले. १६८२ मध्ये खानजहानबहादुराने सातारा प्रांताची मोहीम काढली. मोगली फौजांनी कोल्हापूर, मिरज, पन्हाळा या भागांत आक्रमण करण्यास सुरुवात केली. वाईजवळ हंबीरराव मोहिते आणि सर्जाखान यांच्यात लढाई होऊन त्यात हंबीरराव मरण पावले. रामसेज, साल्हेर, माहुली इ. अभेद्य किल्ले औरंगजेबाने लाच देऊन हस्तगत केले. तसेच दळवी-देसायांप्रमाणेच संभाजीराजांकडे असलेल्या नोकरांना, अधिकाऱ्यांना जहागिरी, मन्सब यांचे आमिष दाखवून त्यांना आपल्याकडे वळवून घेतले. या फितुरांमुळेच संभाजी राजांचा शेवट झाला. मोगलांनी सर्व बाजूंनी संभाजीराजांस वेढले असले तरी सातारा विभागातील सातारा, परळी, निंब, चंदनवंदन, कऱ्हाड, माजगाव, मसूर हे, तर दक्षिण कोकणातील संगमेश्वर, राजापूर, पन्हाळा, मलकापूर, खेळणा, शिरोळे, फोंडे, कोपल हे आणि कुलाबा, खंदेरी, राजकोट, सागरगड, पद्मदुर्ग, चौल हे उत्तर कोकणातील प्रदेश १६८९ च्या सुरुवातीपर्यंत मराठ्यांकडेच होते. शेख मुकर्रबखानाने संभाजीराजांस बेसावध स्थितीत किरकोळ चकमकीनंतर संगमेश्वरी कैद केले आणि तुळापूरजवळील वढू येथे औरंगजेबाने त्यांचा निर्घृणपणे वध केला.

### छंदोगामात्य कवी कलश

छत्रपती शिवाजी महाराजांप्रमाणेच संभाजीराजांनी अष्टप्रधानांद्वारे राज्यव्यवस्था चालू ठेवल्याचे दिसते. मात्र कवी कलशाची त्यांनी छंदोगामात्य या नवीन पदावर नियुक्ती केली. वतनाचे निवाडे, किल्ल्यांची निगराणी; तसेच जमिनीचे महसूल पूर्वापार पद्धतीने चालत होते. तेच त्यांनी पुढे चालू ठेवले. आयात-निर्यात कर; तसेच खंडणी व चौथाईची वसुली व्यवस्थितपणे झालेली दिसते. १६८६-८७ मध्ये महाराष्ट्रात दुष्काळ पडला, तेव्हा त्यांनी पुनर्वसनासाठी कौलनामे दिले. व्यापाऱ्यांना सवलती देऊन महसुलात वाढ करण्याचा प्रयत्न केला. सैनिकी व्यवस्थेत घोडदल, पायदळ, तोफखाना तसेच समुद्रावरील शत्रूशी लढण्यासाठी कार्यक्षम नौदल निर्माण केले.

## धार्मिक लोकनीती

छत्रपती संभाजी महाराज यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे धार्मिक धोरण पुढे चालू ठेवून अनेक देवस्थाने, मठ, सत्पुरुष यांना वार्षिक नेमणुका (मोईन) पूर्ववत करून दिल्या. राजांनी पुण्याच्या विनायक उमाजी या देशाधिकाऱ्याला लिहून संत तुकारामांचा मुलगा महादोबा यास वर्षासन दिले. छत्रपती संभाजी महाराज यांनी कुडाळ प्रांतात देशाधिकारी गणीराम याला गोसाव्यासाठी त्याचा शिष्य तुरूतगिरी यास १२५ होन देण्यास आज्ञा दिली. कऱ्हाडचे वेदशास्त्री नरसीभट शेषभट मुंज्येमणी, कांदळगावचे अनंत भट, महादेव भट यांना प्रतिवर्षी जोंधळे व तांदूळ देण्याची आज्ञा केली. कऱ्हाडचे शिवभट नीलकंठभट अग्निहोत्री, पावसचे हरिभट पटवर्धन, रामचंद्र केशवभट पंडित, निंब येथील सदानंद मठाचे अनंतगिरी गोसावी यांना वर्षासनाच्या सनदा दिल्या. याप्रमाणे छत्रपती संभाजी महाराज यांनी चिंचवड, मोरगाव, सज्जनगड, चाफळ, शिंगणवाडी, महाबळेश्वर इ. देवस्थानांची व्यवस्था नीट चालावी म्हणून पूर्वीची वृत्ती, इनामे व सनदा पूर्ववत चालू ठेवल्या. एकूण धार्मिक कारभाराकडे ते जातीने लक्ष घालत असत, हे तत्कालीन पत्रव्यवहारांतून दिसते. आपल्या देशाची अखंड प्रेरणास्फूर्ती, म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज आहेत, त्यांची लेखणी व तलवार चालवणारा प्रतिभासंपन्न राजा म्हणजे छत्रपती संभाजी महाराज आहेत. त्यांच्या त्यागाला, शौर्याला, विद्वत्तेला, कर्तृत्वाला आणि बलिदानाला जगाच्या इतिहासात तोड नाही.

संदर्भ – मराठी विश्वकोश

**वैज्ञानिक प्रयोगातून जे प्रत्यक्ष अनुभवास येईल आणि जे सर्वाधिक लोकांच्या हिताचे, कल्याणाचे, उपयोगाचे तेच ग्राह्य ठरेल, अशी भूमिका स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची होती. त्यांनी वेदप्रामाण्य-ग्रंथप्रामाण्य नाकारले आणि विज्ञानप्रामाण्य स्वीकारले. याच वैज्ञानिक, बुद्धिनिष्ठ दृष्टिकोनातून स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर हे सर्वच धर्मग्रंथ मनुष्यनिर्मित मानत होते, ईश्वरनिर्मित नाही. पोथीनिष्ठ धर्मश्रद्धेपेक्षा विज्ञाननिष्ठ, विकसनशील विचार स्वीकारून अद्ययावत, अत्याधुनिक भूमिकेचा प्रखर पुरस्कार ते करत होते. त्यांच्या या विज्ञाननिष्ठ व्यक्तिमत्त्वाविषयी जाणून घेणे तितकेच आवश्यक आहे.**

# विज्ञाननिष्ठ स्वातंत्र्यवीर सावरकर

स्वातंत्र्यपूर्व भारतात स्वराज्यासाठी जनजागृतीच्या पर्वाला आरंभ झालेला होता. नेमके याच वर्षी महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यातील भगूर या गावी सावरकर घराण्यात २८ मे १८८३ रोजी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचा जन्म झाला. त्यांचे वडील दामोदर सावरकर आणि आई राधा सावरकर, दोन भाऊ आणि एक बहीण अशी ही चार भावंडे.

मनमिळाऊ, मोकळा स्वभाव आदी अंगाच्या गुणांनी वि.दा. सावरकर हे सर्वांचे लाडके. त्यांचे बालपण भगूर या जन्मगावीच गेले. त्यांचे प्राथमिक शिक्षण याच गावात पार पडले. वीर सावरकरांनी पहिली व दुसरीचा अभ्यासक्रम घरीच पूर्ण केला. त्यांना वाचनाचीही आवड होती. पहिली, दुसरीचा अभ्यासक्रम घरीच पूर्ण झाल्यानंतर शिक्षणासाठी ते नाशिकला गेले. तेथील शिवाजी माध्यमिक शाळेत त्यांनी तिसरीत प्रवेश मिळवला. उच्च माध्यमिक पाचवी पुढचा अभ्यास पूर्ण करण्यासाठी शासकीय शाळेत प्रवेश केला. त्याकाळी पुण्याप्रमाणे नाशिकमध्येही प्लेगसारख्या रोगाची साथ होती. तेव्हा वि. दा. सावरकर भगूरलाच होते. या दरम्यान त्यांच्या वडिलांचा मृत्यू झाला. आईच्या मायेचे छत्र केव्हाच नाहीसे झालेले होते. आता वडीलही पाठीशी उरले नाहीत. अशा स्थितीत शिक्षणात खंड न पडू देता १९०१ साली शासकीय शाळेतून सावरकरांनी मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण केली. सुखवस्तू, सधन घराण्याची आर्थिक स्थिती ढासळलेली. त्यानंतर विनायक सावरकरांचा जव्हार संस्थानचे भाऊराव चिपळूणकरांच्या मुलीशी विवाह झाला. सावरकरांना पुढच्या उच्च शिक्षणाचाच ध्यास



लागलेला होता. पुढील महाविद्यालयीन उच्च शिक्षणासाठी पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयात प्रवेश मिळवला. महाविद्यालयात प्रवेश मिळताच ते फर्ग्युसनच्या वसतिगृहातच राहत होते.

### मित्रमेळा संघटनेची स्थापना

वि. दा. सावरकरांनी त्यांच्या तारुण्यात मित्रांच्या साहाय्याने राष्ट्रभक्ती समूह - मित्रमेळा या संघटना स्थापन केल्या होत्याच. त्याशिवाय महाविद्यालयीन आयुष्यातील त्यांच्या मित्रमंडळाचा सावरकर कॅम्प म्हणून उल्लेख केला जात असे. कालांतराने हा राष्ट्रभक्ती समूह विस्तारला होता. त्याकाळी १९०४ साली सावरकरांनी राष्ट्रभक्ती समूहाचे अभिनव भारत असे अतिशय सूचक आणि समर्पक नामकरण केले.

### विदेशी वस्तूंची होळी

दरम्यान बंगाल फाळणीच्या निर्णयामुळे तेथे स्वदेशीचा स्वीकार नि विदेशीचा धिक्कार या चळवळीचे लोण महाराष्ट्रातही पोहोचले. याच संदर्भात पुण्यात साहित्य सम्राट न. चि. केळकरांच्या अध्यक्षतेखाली एक सभा आयोजित करण्यात आली होती. सावरकर कॅम्पच्या काही निवडकांसह वि. दा. सावरकर सभेला गेले. या सभेत सोपस्करप्रमाणे चर्चा, भाषणे पार पडतील याची जाणीव झाल्यानंतर भरसभेत सावरकर उठून उभे राहिले. निषेध नोंदवायचा; पण तो तरी परिणामकारक ठरावा नि त्यासाठीच विदेशी वस्तूंची प्रकटपणे होळी करण्यात यावी, अशी सूचना त्यांनी सभेत मांडली आणि दुसऱ्याच दिवशी डेक्कन जिमखान्याच्या परिसरात विदेशी वस्तूंची प्रकटपणे होळी पेटवण्यात आली.

### पदवी परीक्षा उत्तीर्ण

विद्यार्थ्यांनी राजकीय चळवळीत भाग घेता कामा नये असा दंडकच त्यावेळी प्रस्थापित झालेला होता. त्यामुळे या होळीप्रकरणी सावरकरांना दहा रुपये दंड आणि वसतिगृह सोडण्याचे आदेश देण्यात आले. त्याची लोकमान्य टिळकांनी नोंद घेऊन केलेली खरमरीत टीका यामुळे सावरकर हे नाव महाराष्ट्राची सीमा ओलांडून पंजाबात पंजाब

केसरी लाला लजपतराय यांच्यापर्यंत पोहोचले. महाविद्यालयातील सावरकरांचे हे शेवटचे वर्ष होते. त्यांनी आता आपले सारे लक्ष अभ्यासावरच केंद्रित केले आणि अपेक्षेप्रमाणे सावरकर १९०५ साली बी.ए. पदवी परीक्षा उत्तीर्ण झाले.

पदवी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या वि.दा. सावरकरांनी विधिविषयक अभ्यासासाठी मुंबईच्या विधि महाविद्यालयात प्रवेश घेतला. या दरम्यान 'विहारी' नावाच्या साप्ताहिकाच्या संपादक मंडळात काम करण्याचे त्यांना निमंत्रण मिळाले. या साप्ताहिकात काम करत असतानाच त्यांनी 'वंदेमातरम्' हा लेख लिहिला. १९०६ साली उच्च शिक्षण घेत असताना वीर सावरकर हे राजकीय तत्त्वज्ञान आणि व्यवहार याचा अभ्यास करण्यासाठी लंडनमध्ये शिवाजी शिष्यवृत्ती मिळवणारे मानकरी ठरले.

देशस्वातंत्र्यासाठी सशस्त्र संघर्षाच्या आपल्या प्रतिज्ञेप्रमाणे या व्रताच्या परिपूर्तीसाठीच वीर सावरकरांनी लंडनचा मार्ग धरला होता. ते जलप्रवासाने लंडनमध्ये पोहोचले. काही काळात त्यांनी तेथे फ्री इंडिया सोसायटी नावाची संस्था स्थापन केली. सर्वांच्या सहभागासाठी म्हणूनच त्यांनी ही संस्था काढली. लंडनमधील भारतीय तरुणांचा परस्परांशी परिचय व्हावा, त्यांची एक संघटित शक्ती उभी करावी, हा उघड संस्था काढण्यामागचा हेतू होता.

वि.दा. सावरकर लंडनला पोचण्यापूर्वीच त्यांच्याविषयीची गुप्त माहिती देणारे पत्र पुणे विभागातून लंडनला रवाना झालेले होते. ब्रिटिश गुप्तहेर खाते सावरकरांच्या आरंभापासूनच त्यांच्यावर लक्ष ठेवून होते. लंडनमधील सर्व कृत्याचे केंद्र भारत भवन होते. त्या मागची प्रेरक शक्ती वीर सावरकरच असल्याची त्यांची पक्की खात्री झालेली होती. त्यानंतर भारत भवन बंद करण्यात आले.

लंडन व्हिक्टोरिया स्थानकावरून ब्रिटिश अधिकाऱ्यांनी त्यांना ३ मार्च १९१० रोजी अटक केली. त्यांची रवानगी ब्रिक्स्टन तुरुंगात करण्यात आली. त्यानंतर त्यांची 'मोरया' नावाच्या आगनौकेने हिंदुस्थानला रवानगी करण्यात आली. या नावेवरील ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या तावडीतून सुटका करण्याचा वीर सावरकरांचा धाडसी प्रयत्न अपयशी ठरला आणि त्यांना पुढील प्रवासासाठी साष्टी आगनौकेने मार्सेहून २२ जुलै १९१० रोजी मुंबईला पोहोचवण्यात आले. यानंतर वीर सावरकरांना नाशिकच्या तुरुंगात ठेवण्यात आले. तेथून त्यांची काही दिवस येरवड्याच्या तुरुंगात रवानगी करण्यात आली.

ब्रिटिश साम्राज्याविरुद्ध युद्धाचा प्रयत्न, त्यासाठी संघटन आणि शस्त्रास्त्रांची गुप्तपणे जमवाजमव हा एक आणि जॅक्सन हत्या प्रकरणी साहाय्य करणे असा दुसरा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला. या दोन आरोपांसाठी त्यांना दोन जन्मठेपांची शिक्षा ठोठावण्यात आली. शिक्षा भोगण्यासाठी त्यांना ११ जुलै १९१२ रोजी अंदमानच्या कराल कारावासात पाठवण्यात आले.

### स्थानबद्धता

वि.दा. सावरकरांच्या पूर्वीच त्यांचे वडीलबंधू बाबाराव सावरकर यांना अटक करून अंदमानला रवाना करण्यात आलेले होते. दुसरीकडे हिंदुस्थानात धाकटा भाऊ डॉ. नारायण सावरकर उभय बंधूंच्या सुटकेसाठी अथक धडपड करत होते. अनेक आवेदन, पत्रे आणि जनतेच्या मागणीची दखल घेवून रंगास्वामी अय्यंगार यांनी त्यांच्या सुटकेचा ठराव आणला. या सर्वांच्या परिणामी सावरकर बंधूंची अंदमानातून मुक्तता करण्यात आली. त्यांना हिंदुस्थानात आणले. अंदमान सुटले खरे, पण तुरुंगवास संपला नाही. वि.दा. सावरकरांना रत्नागिरी तुरुंगात पाठवण्यात आले. दोनेक वर्षांनी त्यांना येरवड्याच्या बंदिवासात ठेवण्यात आले. येथेच मुंबईच्या राज्यपालांनी त्यांची भेट घेतली. उभयतात प्रदीर्घ चर्चा होऊन पाच वर्षांपर्यंत कसल्याही राजकीय चळवळीत भाग न घेण्याचा, राजकीय विषयावर मत प्रदर्शन न करण्याच्या अटीवर तुरुंगमुक्त करण्यात आले. त्यानंतर त्यांना रत्नागिरीला स्थानबद्ध करण्यात आले.

प्रत्यक्ष बंदिवासापेक्षा स्थानबद्धता तशी कितीतरी बरी आणि सुसह्य होती. अटी होत्या; पण तरीही बरेच स्वातंत्र्य होते, मोकळीक होती. १४ वर्षांचा प्रदीर्घ विजनवास संपला. कौटुंबिक जीवनाची संधी लाभली. वीर सावरकर रत्नागिरीला स्थानबद्ध असताना जवळपास १७ वर्षांच्या दीर्घ कालावधीनंतर १९२७ साली पुन्हा सावरकर-गांधी भेट घडली.

### बुद्धिवाद आणि विज्ञाननिष्ठ

स्वातंत्र्यवीर सावरकरांनी आपली प्रज्ञा-प्रतिभा, भक्ती-बळ मग ती केवळ समाजसुधारणाच नव्हे, तर एक प्रकारची आमूलाग्र सामाजिक क्रांती घडवून आणण्यासाठी एक वैचारिक आणि कृतिशील आंदोलनच रत्नागिरीच्या स्थानबद्धेत उभे केले. तेव्हापासून प्रखर बुद्धिवाद आणि विज्ञाननिष्ठेचा प्रभावी पुरस्कार करण्यास आरंभ केला.

आजचा समाज आधुनिक विज्ञानाच्या वास्तव विचारावर उभा असावा, ही त्यांची विचारसरणी होती. विज्ञानच आजचा धर्म, तोच आजचा वेद अशी विशुद्ध वैज्ञानिक भूमिका स्वीकारून वीर सावरकरांनी आपली वाणी राबवली, लेखणी परजली. 'यज्ञाची कुळकथा', 'खरा सनातन धर्म कोणता', 'पोथीनिष्ठ धर्म की प्रयोगनिष्ठ विज्ञान', 'गोपूजन नव्हे गोपालन', 'दोन शब्दात दोन संस्कृति', 'आजच्या सामाजिक क्रांतिचे सूत्र', 'पुरातन की अद्यतन', 'मनुस्मृतीतील महिला', 'धर्मभोळेपणाची नांगी ठेचू शकेल असे एकच बळ, विज्ञाबळ' असे अनेक लेख लिहून वीर सावरकरांनी वैज्ञानिक दृष्टीच्या प्रसार-प्रचाराची एक आघाडीच उघडली होती.

कृषी व्यवसायाकडे वीर सावरकर वैज्ञानिक दृष्टीने पाहत होते आणि आधुनिकीकरणाचा आग्रह धरत होते. शेतकरी आणि कामकरी वर्ग म्हणजे राष्ट्राचे आरोग्य, संपत्ती आणि शक्ती मानत होते. इंग्लंडसारख्या प्रगत देशात राहिलेल्या, तेथील प्रगत समाजजीवन प्रत्यक्ष अनुभवलेल्या नि देशोदेशीचा इतिहास वाचलेल्या स्वातंत्र्यवीर सावरकरांना आजच्या संघर्षाच्या नि स्पर्धेच्या युगात आपला देश टिकला पाहिजे, ही त्यांची भूमिका होती. वैज्ञानिकदृष्टीचा, विज्ञाननिष्ठेचा स्वीकार केल्याविना तसे होणे नाही, हे वास्तव ते ओळखून होते.

**संदर्भ :** स्वातंत्र्यवीर सावरकर लेखक सुधाकर देशपांडे,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

**भारताचे आर्थिक सामर्थ्य आणि तंत्रज्ञानात्मक कल्पकता यांचा संगम असलेला महाराष्ट्र डिजिटल प्रगतीमध्ये सातत्याने आघाडीवर आहे. मुंबई हे आर्थिक केंद्र, तर पुणे हे आयटी हब असलेल्या या राज्यात एक टेक्नॉलॉजी इकोसिस्टिम विकसित केली आहे. राज्यामध्ये भक्कम पायाभूत सुविधा, पुरोगामी धोरणे असल्यामुळे भारताच्या तंत्रज्ञानाधारित विस्तारात राज्याने अग्रस्थान पटकावले आहे.**

# डिजिटल क्रांतीची बदलती क्षितिजे

**डॉ. संजय देशमुख**

तंत्रज्ञानामध्ये महाराष्ट्राचे योगदान अनेक क्षेत्रांमध्ये दिसून येते आणि भारताच्या तंत्रज्ञानाच्या सद्यस्थितीवर त्याने लक्षणीय प्रभाव टाकला आहे. अग्रगण्य आयटी सेवांपासून ते जैवतंत्रज्ञान आणि उत्पादन क्षेत्राच्या प्रगतीपर्यंत सर्वच क्षेत्रात नावीन्यपूर्ण आघाडी घेतली आहे.

## प्रादेशिक विकासाचे आधारस्तंभ

डिजिटल प्रगती आणि तंत्रज्ञानात्मक नव प्रवर्तन हे निव्वळ परिवर्तन घडवून आणणारे घटक नाहीत, तर ते प्रादेशिक विकासाचे आधारस्तंभ आहेत. याद्वारे आर्थिक विकासाला चालना मिळते, जीवनमान उंचावते आणि शाश्वत प्रगतीला पोषक वातावरण तयार होते. महाराष्ट्राच्या तांत्रिक प्रगतीमुळे राज्याची अर्थव्यवस्था तर मजबूत झाली आहेच; पण त्याचबरोबर विविध हायटेक क्षेत्रांमध्ये राज्याने भरारी घेत जागतिक स्पर्धेमध्ये भारताचे स्थान उंचवण्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

## तंत्रज्ञानाची उत्क्रांती

औद्योगिक प्रकल्पांची सुरुवात १९ ते २० व्या शतकाच्या प्राथमिक टप्प्यात झालेली आहे. भारताच्या सुती वस्त्रोद्योगाचा केंद्रबिंदू असलेल्या मुंबईने औद्योगिक विस्ताराची पायाभरणी केली. १९४५ मध्ये 'टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च'ची स्थापना हा या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा होय, जो वैज्ञानिक संशोधन आणि तंत्रज्ञानासाठी मार्गदर्शक ठरत आहे.

## तंत्रज्ञानात प्रगती– व्यक्ती संस्थांचे योगदान

जे.आर.डी. टाटा यांच्यासारख्या महत्त्वाच्या व्यक्ती आणि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी मुंबई (आयआयटी मुंबई) यांसारख्या संस्थांनी अभियांत्रिकी, विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रगतीसाठी आपल्या योगदानाने राज्याच्या सध्याच्या तांत्रिक सामर्थ्याचा पाया रचला आहे.

## माहिती तंत्रज्ञान (आयटी) आणि सॉफ्टवेअर सेवा

महाराष्ट्रातील आयटी क्षेत्र, विशेषत: पुण्यात झपाट्याने वाढते आहे. आयटी शिक्षणावर राज्य सरकारने आपले लक्ष केंद्रित केल्याने आणि पूरक सरकारी धोरणांमुळे सॉफ्टवेअर सर्व्हिसेस ॲण्ड सोल्युशन क्षेत्रात नवप्रवर्तनासाठी पोषक असे वातावरण तयार झाले आहे.

## जैवतंत्रज्ञान आणि आरोग्य सेवा

महाराष्ट्र हे जैवतंत्रज्ञान आणि आरोग्यविषयक नवकल्पनांचे केंद्र आहे. पुणे आणि मुंबईत नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ व्हायरॉलॉजी या सारख्या संशोधन संस्था आणि बायोटेक्नॉलॉजी कंपन्यांमुळे वैद्यकीय संशोधन, औषध कंपन्या आणि आरोग्य सेवा तंत्रज्ञानातील प्रगतीला चालना मिळाली आहे.

## ऑटोमोटिव्ह आणि मॅन्युफॅक्चरिंग टेक्नॉलॉजी

पुणे आणि नाशिक येथे प्रमुख उत्पादन केंद्रे असलेले महाराष्ट्रातील ऑटोमोटिव्ह क्षेत्र हे राज्याच्या औद्योगिक सामर्थ्याचे द्योतक आहे. टाटा मोटर्स आणि महिंद्रा ॲण्ड महिंद्रा सारख्या कंपन्यांनी ऑटोमोटिव्ह क्षेत्रामध्ये आघाडी घेतली आहे.

## डिजिटल पायाभूत सुविधा आणि कनेक्टिव्हिटी

### आयटी पार्क आणि डिजिटल हबचा विकास

महाराष्ट्रात पुण्यातील हिंजवडी आयटी पार्क आणि मुंबईतील वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स यांसारखी अनेक आयटी पार्क आणि डिजिटल हब विकसित झाले आहेत. राज्याने अत्याधुनिक पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे जगातील आयटी कंपन्या आकर्षित होत आहेत.

### इंटरनेटचा प्रसार आणि ब्रॉडबँड कनेक्टिव्हिटी

महाराष्ट्र राज्य फायबर नेटवर्क प्रकल्पासारख्या कार्यक्रमांच्या उद्दिष्टांमध्ये शहरी आणि ग्रामीण भागातील डिजिटल अंतर कमी करणे, हायस्पीड इंटरनेट सुविधा प्रदान करणे आणि सर्वांगीण विकासाचे धोरण आखणे यांचा समावेश आहे.

### सरकारी धोरणे आणि डिजिटल पायाभूत सुविधा

महाराष्ट्रातील डिजिटल पायाभूत सुविधांच्या प्रगतीसाठी राज्य सरकारची पूरक सरकारी धोरणे व भरीव गुंतवणूक महत्त्वपूर्ण ठरली.

## शैक्षणिक आणि संशोधनात्मक योगदान

### अग्रगण्य विद्यापीठे आणि संशोधन संस्था

आयआयटी मुंबई, मुंबई विद्यापीठ आणि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन ॲण्ड रिसर्च (आयसर) पुणे यांसारख्या भारतातील काही प्रमुख संस्थांमध्ये गणल्या जाणाऱ्या शैक्षणिक आणि संशोधन संस्था महाराष्ट्रात आहेत.

### सहयोगी संशोधन

शैक्षणिक संस्था, उद्योग आणि सरकारी संस्था यांच्यातील सहयोगी संशोधन आणि विकास कार्यक्रम कल्पकतेला चालना देत आले आहेत. अशा सहकार्यांमुळे ज्ञान आणि तंत्रज्ञानाचे हस्तांतरण सुलभ होते, ज्यामुळे गुंतागुंतीच्या सामाजिक आणि औद्योगिक आव्हानांवर उपाय शोधणे शक्य होते.

### स्टार्ट-अप आणि उद्योजकता इनक्युबेशन सेंटर्स

इंडियन एंजल नेटवर्क आणि पुणे स्टार्टअप हबसारखी इन्क्युबेशन सेंटर्स आणि एक्सिलरेटर्स नवउद्योजकांना नव्याने स्टार्टअपसाठी साहाय्य देत आहेत.

### महाराष्ट्रातील नामवंत स्टार्ट-अप्स

झोहो, फ्रेशवर्क्स आणि नॅसकॉम यांसारख्या नामांकित स्टार्टअप्सचा उगम महाराष्ट्रात झाला आहे. नावीन्यपूर्ण आणि असंघटित व्यवसायांसाठी पोषक राज्य म्हणून राज्याची प्रतिष्ठा वाढवण्यात या कंपन्यांनी लक्षणीय योगदान दिले आहे.

### व्हेंचर कॅपिटल आणि फंडिंग

तंत्रज्ञानात्मक नवप्रवर्तनामध्ये व्हेंचर कॅपिटल आणि फंडिंग महत्त्वाची भूमिका बजावत आहे. राज्यात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करण्यासाठी देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय भांडवलदारांना महाराष्ट्र राज्य आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरत आहे.

### सरकारी क्षेत्र आणि खासगी क्षेत्र

यशस्वी सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) हा महाराष्ट्राच्या तांत्रिक प्रगतीचा पाया आहे. माहिती तंत्रज्ञान, आरोग्य सेवा आणि पायाभूत सुविधा यांसारख्या क्षेत्रांमधील सहकार्यामुळे नावीन्यपूर्ण उपाययोजना विकसित झाल्या आहेत.

### प्रमुख प्रकल्प आणि उपक्रम

मुंबई मेट्रो आणि पुणे स्मार्ट सिटी या प्रकल्पांच्या केस स्टडीमध्ये यशस्वी सार्वजनिक-खासगी भागीदारीची परिणामकारकता अधोरेखित होते. राज्य सरकारमुळे तंत्रज्ञानात्मक नावीन्याला चालना मिळाल्याने पायाभूत सेवा-सुविधांमध्ये सुधारणा होत आहे.

## तंत्रज्ञानाने घडणारी सामाजिक परिवर्तने

### डिजिटल सहभाग आणि सक्षमीकरण उपक्रम

महाराष्ट्रातील डिजिटल सहभाग उपक्रमांचे उद्दिष्ट डिजिटल दरी कमी करणे आणि उपेक्षित समुदायांचे सक्षमीकरण करणे हे आहे. डिजिटल साक्षरता प्रशिक्षणामुळे तांत्रिक प्रगतीमध्ये सहभागी होऊन लाभ घेणे शक्य होत आहे.

### शहरी आणि ग्रामीण विकासासाठी तंत्रज्ञानात्मक उपाय

शहरी आणि ग्रामीण विकासामधील आव्हानांवर मात करण्यासाठी तंत्रज्ञानात्मक उपाय फार उपयुक्त ठरत आहे. स्मार्ट सिटी उपक्रम, कृषी तंत्रज्ञानातील नवकल्पना आणि ई-गव्हर्नन्स हे प्रकल्प म्हणजे राज्यभरात पायाभूत सुविधा, उत्पादकता आणि जीवनमान कसे सुधारू शकते याचे उत्तम उदाहरण आहे.

### प्रशासनावरील तंत्रज्ञानाचा प्रभाव

तंत्रज्ञानाचा महाराष्ट्रातील शिक्षण, आरोग्य सेवा आणि प्रशासनावर सकारात्मक परिणाम झाला आहे. डिजिटल क्लासरूम, टेलिमेडिसिन आणि ई-गव्हर्नन्स प्लॅटफॉर्म याद्वारे सुलभता, कार्यक्षमता आणि सेवा वितरण यात सुधारणा होत आहे, ज्यामुळे सर्वांगीण सामाजिक विकासास हातभार लागला आहे.

## तंत्रज्ञानाच्या भवितव्याचे व्हिजन

महाराष्ट्रातील तंत्रज्ञानाचे भवितव्य आश्वासक आहे. आपली ताकद वाढवून, सध्याच्या आव्हानांवर मात करून आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा अवलंब करून, राज्य तंत्रज्ञानात्मक नवप्रवर्तन आणि डिजिटल प्रगतीमध्ये आघाडीवर राहू शकते तसेच प्रादेशिक आणि राष्ट्रीय विकासाला चालना देऊ शकते.

## प्रादेशिक आणि राष्ट्रीय विकास

राज्याच्या तांत्रिक प्रगतीचे प्रादेशिक आणि राष्ट्रीय विकासावर दूरगामी परिणाम होत आहेत. राज्याच्या तांत्रिक प्रगतीमुळे आर्थिक विकास वाढतो, रोजगार निर्मिती होते. यामुळे महाराष्ट्र भारताच्या तांत्रिक आणि आर्थिक प्रगतीमधील एक प्रमुख शक्ती म्हणून आपले स्थान निश्चित करण्यात यशस्वी झाला आहे.

## भविष्यातील ध्येय धोरण

राज्यातील सर्व नागरिकांना समानतेच्या धोरणानुसार तंत्रज्ञान उपलब्ध करून देण्यासाठी राज्य सरकार प्रयत्नशील आहे. राज्याच्या कानाकोपऱ्यात पोहोचणारी अखंड डिजिटल पायाभूत सुविधा निर्माण करण्यास प्राधान्यक्रम दिलेला आहे. महाराष्ट्राला स्पर्धेत आघाडीवर टिकवून ठेवण्यासाठी आर्टिफिशियल इंटेलिजन्स, ब्लॉकचेन आणि क्वांटम कॉम्प्युटिंगसारख्या उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा मुख्य प्रवाहात समावेश करणे महत्त्वपूर्ण ठरणार आहे. हरित तंत्रज्ञान आणि स्मार्ट सिटी नियोजनाच्या माध्यमातून कायमस्वरूपी विकासावर भर दिल्यास राज्याचा विकास जागतिक पर्यावरणविषयक उद्दिष्टांशी सुसंगत होणार आहे. सार्वजनिक-खासगी भागीदारी बळकट केल्याने नावीन्यपूर्णतेला चालना मिळेल.

सामाजिक-आर्थिक विकासाबरोबर तांत्रिक कौशल्याची सांगड घालणारा सर्वंकष दृष्टिकोन स्वीकारून महाराष्ट्र भारताच्या तंत्रज्ञान क्रांतीचे नेतृत्व करू शकतो आणि नावीन्यपूर्ण विकासासाठी जागतिक मानक (आदर्श) ठरू शकतो. सहकार्य आणि सर्वसमावेशकता या ध्येयधोरणे चोख राबवल्यास भावी पिढ्यांसाठी महाराष्ट्र तांत्रिक प्रगती आणि डिजिटल परिवर्तनातील एक दीपस्तंभ ठरेल, असा विश्वास आहे.

(लेखक हे जैवविज्ञान विभागात प्राध्यापक व प्रमुख म्हणून कार्यरत आहेत;
तसेच मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू आहेत.)

मशरूम ही बुरशी गटातील वनस्पती आहे. मशरूमला मराठीत ‘अळिंबी’ असे म्हणतात. पावसाळ्यात निसर्गात ही वनस्पती आपल्याला आढळते. ग्रामीण भागात कुत्र्याची छत्री, भूछत्र, धिंगरी या नावाने ओळखली जाते, मशरूमचे उत्पादन घेण्यासाठी कमी जागा व कमी पाणी लागते आणि मशरूमची मागणी ही भारतासह पूर्ण जगामध्ये मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे जगभरामध्ये मशरूमचे व्यापारी तत्त्वावर मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतले जाते.

# शेतीपूरक व्यवसाय : धिंगरी अळिंबी

**प्रा. देवानंद जाधव**

मशरूमची लागवड प्रामुख्याने पूर्व आशिया, तैवान, चीन, इंडोनेशिया, कोरिया या देशांमध्ये केली जाते. जर्मनीमध्ये मशरूमचे सर्वात अधिक सेवन केले जाते. मशरूम खाण्यासाठी स्वादिष्ट तर आहेच, त्यासोबतच पौष्टिकदेखील आहे. मशरूममध्ये मोठ्या प्रमाणात जीवनसत्त्वे, प्रथिने व खनिजे आहेत. त्यामुळे दररोजच्या आहारात मशरूमचा वापर केल्यास फायदा होतो. मशरूम शेती हा मुळात बुरशी पिकवण्याचा व्यवसाय आहे. आज मशरूमची लागवड हा भारतातील सर्वात उत्पादक आणि फायदेशीर व्यवसाय आहे. हा व्यवसाय भारतात हळूहळू लोकप्रिय होत आहे. कारण अल्पावधीतच शेतकऱ्यांच्या मेहनतीचे फायद्यात रूपांतर होत आहे. मशरूमची लागवड ही भारतातील पैशाचा पर्यायी स्रोत म्हणून शेतकरी करतात. मशरूम खायला चविष्ट असतात. आपण याचे सूप, भाज्या, स्ट्युजमध्ये रूपांतर करू शकतो. तसेच आपल्या आवडत्या पिझ्झावर ते टॉप करू शकतो.

## अळिंबीचे लागवडीयोग्य विविध प्रकार

### धिंगरी अळिंबी

ही अळिंबी अगॅरिकस प्रवर्गातील असून आहारात अन्न म्हणून उपयोगी असलेली बुरशीच्या प्रजातीची वनस्पती होय. बुरशीची पूर्ण वाढ झाल्यानंतर यास फळे येतात व या फळांस ‘अळिंबी’ किंवा ‘भूछत्र’ असे म्हणतात. अनेक शेतकरी शेतीला जोडधंदा म्हणून कमी भांडवलात व आहारात उपयुक्त अशी धिंगरी अळिंबी उत्पादन करतात. या अळिंबीला ‘शिंपला’ किंवा ‘पावसाळी छत्री’ अशा नावांनी सुद्धा ओळखले जाते.



**अ) फ्ल्युरोट्स ओस्ट्रिट्स मशरूम** (Pleurotus Ostreatus)

ही अळिंबी अगॅरिकस प्रवर्गातील असून या जातीची अळिंबी अंकूर अवस्थेत निळ्या रंगाची व नंतर फिकट दुधी रंगाची होतात. ही अळिंबी गुच्छ पद्धतीने उगवते, तसेच खाण्यास चविष्ट असते. या जातीसाठी तापमान २० अंश सेल्सिअस ते ३० अंश सेल्सिअस आणि आर्द्रता ८० टक्के ते ९० टक्के आवश्यक असते.

**ब) फ्ल्युरोट्स साजोरकाजू** (Pleurotus Sajorkaju)

या जातीचा रंग करडा असतो. ही अळिंबी उत्पादन करण्यासाठी लागणारे आवश्यक तापमान २० अंश सेल्सिअस ते ३० अंश सेल्सिअस असते. तसेच आर्द्रता ८० टक्के ते ९० टक्के असावी. याचा आकार शिंपल्यासारखा असून, दिसण्यास आकर्षक आणि खाण्यास चविष्ट असते.

**क) फ्ल्युरोट्स डाजमोर** (Pleurotus Djamor)

या जातीच्या अळिंबीचा रंग गुलाबी असतो. ही अळिंबी उत्पादन करण्यासाठी लागणारे आवश्यक तापमान २१ अंश सेल्सिअस ते ३५ अंश सेल्सिअस, तसेच आर्द्रता ६५ टक्के ते ९० टक्के असावी. या मशरूमची उगवण गुच्छ पद्धतीने होते. खाताना किंचित रबरी पोत असल्याने वेगळीच चव मिळते.

**ड) फ्ल्युरोट्स फ्लोरिडा** (Pleurotus Florida)

या जातीची अळिंबी पांढऱ्या रंगाची असतात. फळे काढणीस वेळ झाला तर फळे मऊ पडून काळे पडतात. या जातीची फळे आकाराने मोठे असतात तसेच यासाठी लागणारे आवश्यक तापमान २५ अंश सेल्सिअस ते ३० अंश सेल्सिअस आणि आर्द्रता ८० ते ९० टक्के इतकी लागते.

### बटण अळिंबी

ग्रीकस जातीच्या अळिंबीस गोलाकार आकारामुळे ‘बटण अळिंबी’ असेही म्हणतात. ही अळिंबी दिसायला पांढरीशुभ्र आणि आकर्षक दिसते. अळिंबीच्या उत्पादनासाठी वातानुकूलित जागेची आवश्यकता असते. या अळिंबीच्या उत्पादनासाठी वातावरण नियंत्रित करावे लागते.

### मिल्की अळिंबी (दुधी)

'केलोसायबा इंडिका' या जातीची अळिंबी दुधाप्रमाणे पांढरीशुभ्र दिसत असल्याने 'दुधी अळिंबी' असे म्हणतात. या अळिंबीची लागवड धिंगरी अळिंबीप्रमाणे केली जाते. या अळिंबीचे देठ लांब आणि घुमट छत्रीप्रमाणे असते.

## अळिंबी उत्पादन करण्यासाठी आवश्यक बाबी

### • जागेची निवड

मशरूम उत्पादन घेण्यासाठी ऊन, वारा, पाऊस यापासून संरक्षण होईल, अशा निवाऱ्याची गरज असते. त्यासाठी कच्च्या किंवा पक्क्या बांधकामाची खोली, झोपडी बांबू हाऊस, मातीचे घर यामध्ये मशरूम उत्पन्न अत्यंत उत्तम घेता येते. अशा खोलीमध्ये तीव्र सूर्यप्रकाश येऊ नये. तसेच हवा उत्तम प्रकारे खेळती राहील, असे पाहावे.

### • पाणी

मशरूम उत्पादनासाठी पाणी ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. मशरूम उत्पादनाकरिता जास्त पाण्याची आवश्यकता नाही; परंतु त्यासाठी लागणारे पाणी स्वच्छ व शुद्ध हवे.

### • कच्चा माल

धिंगरी मशरूमच्या वाढीसाठी सेंद्रिय आणि पिष्टमय पदार्थ अधिक असलेल्या घटकांची आवश्यकता असते. त्यात शेतातील पिकांचे अवशेष यामध्ये सोयाबीनचा भुसा, गव्हाचा भुसा, कपाशीच्या काड्या, भाताचा पेंढा, काढलेले गवत, गवताचा पेंढा, कडबा कुटार इ. घटकांचा वापर करता येतो. आळिंबी उत्पादन प्रामुख्याने कच्च्या मालावर अवलंबून असते. कच्च्या मालातील सेल्युलोज हा घटक आळिंबीचे महत्त्वाचे अन्न आहे, त्यामुळे सेल्युलोज ज्या घटकात अधिक, त्यावर अळिंबीचे उत्पन्न अधिक येते.

घटक पदार्थ निवडताना सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे घटक (कच्चा माल) कोरडा हवा. तसेच तो नवीन काढणीचा हवा व तो पावसात भिजलेला नसावा. कच्चा माल साठवताना बंदिस्त जागेचा वापर करावा.

**तक्ता ०१. धिंगरी आळिंबीचे पिकांच्या भुसा/पालापाचोळ्यापासून मिळणारे उत्पादन**

| अ.नं. | घटक (१ कि.ग्रॅ. वाळलेले) | उत्पादन ताजे (ग्रॅम) |
|---|---|---|
| १ | सोयाबीनचा भुसा | ५४० |
| २ | कपाशीची पाने किंवा काड्या | ८२० |
| ३ | गव्हाचे काड | ५२० |
| ४ | ज्वारीचा कडबा | ४५० |
| ५ | गवत | ४४० |
| ६ | भाताचे काड | ५६० |

### • वातावरण

मशरूमकरिता वातावरण हे अंधारमय हवे. लागवडीसाठी नैसर्गिक तापमान २० ते ३० अंश सेल्सिअस आणि हवेतील आर्द्रता ६५ टक्के ते ८० टक्के असणे गरजेचे असते (प्रकारानुसार असलेल्या थोडाफार फरक लक्षात घ्यावा). यासाठी जमिनीवर आणि शेडच्या चारही बाजूंनी गोणपाट लावून, ते सतत ओले राहण्यासाठी स्प्रे पंप किंवा पाणी फवारणीची व्यवस्था करावी. त्यामुळे तापमान व आर्द्रता नियंत्रित करण्यास मदत होते. उत्तम उत्पादनाकरिता खेळती हवा असणे ही एक महत्त्वाची बाब आहे.



### • प्लास्टिक

अळिंबी उत्पादानाकरिता प्लास्टिक पॉलीप्रॅपिलीनचे वापरावे व जाडी (गेज) ८०-१०० वापरावा. प्लास्टिकचा आकार २२ बाय २७ इंच किवा १८ बाय २२ इंच असावा.

### • बियाणे (स्पॉन)

आळिंबीच्या बियाणांस स्पॉन असे म्हणतात. गव्हाच्या दाण्यावर मशरूमच्या बिजाणूंची वाढ केली जाते. प्लास्टिकच्या पिशवीत ५०० ग्रॅम, १ कि.ग्रॅ. या मापात हे बियाणे उपलब्ध असते.

### • यंत्रसामग्री

१) **ड्रम -** कच्चा माल भिजवण्यासाठी २) **हिटर -** पाणी गरम

**तक्ता ०२. एका वेळी लागणारा (नॉन आवर्ती) खर्च**

| अ.नं. | खर्चाच्या बाबी | खर्च (रुपये) |
|---|---|---|
| **अ)** | **एका वेळी लागणारा (नॉन आवर्ती) खर्च** | |
| १ | घराचा खर्च (दारे, खिडक्या असलेले छप्पर असलेली रूम. (आकारमान : २०' x २०' x १०') | ५५,००० |
| ३ | फवारणी पंप १ नग | २,४०० |
| ४ | ड्रम किंवा टब २ नग | २,००० |
| ५ | थर्मामीटर १ नग | ४०० |
| ६ | रॅक बनवण्यासाठी नायलॉन दोरी (एकूण ५४ ओळी आणि प्रत्येक ओळीसाठी १०० ग्रॅम दोरीची आवश्यकता आहे) १००/किलो | ५४० |
| ७ | ट्रे (कापणीसाठी) २ नग | २०० |
| ८ | चॉपर १ नग | ६०० |
| ९ | वजनकाटा | २१०० |
| १० | सिलींग मशीन | १००० |
| ११ | इतर खर्च | ५०० |
| | **एकूण नॉन आवर्ती खर्च** | **६४,७४०** |

**तक्ता ०३. पुन:पुन्हा लागणारा (आवर्ती) खर्च**

| ब) | पुन:पुन्हा लागणारा (आवर्ती) खर्च | खर्च (रुपये) |
|---|---|---|
| १ | मजूर शुल्क (८ महिन्यांसाठी दररोज २ तासांसाठी १ कामगार ३००/दिवस) | १८,००० |
| २ | सोयाबीन भुसा (१८०० किलो रु. २/किलो) | ३,६०० |
| ३ | पॉलिथन पिशव्या (१८०० नग,१५० गेज जाडीचे ११ x १.५ फूट रु. २/पिशवी) | ३,६०० |
| ४ | स्पॉनची किंमत (४%, ७२ किलो रु. ८०/किलो) | ५,७६० |
| ५ | बाविस्टिन ७५ एमजी/श्र पाणी (१.३५ किलो रु. ८००/किलो) | १,०८० |
| ६ | फॉर्मेलिन १.२५ एमजी/श्र पाणी (२२ लीटर रु. ११०/श्र) | २,४७५ |
| ७ | सप्लिमेंट्स (५% सॉ डस्ट, ९० किलो रु. २०/किलो) | १,८०० |
| ८ | इतर तत्सम खर्च | २,००० |
| ९ | घसारा (अनावर्ती खर्च) १०% प्रतिवर्ष | ६,४७४ |
| | एकूण आवर्ती खर्च | ४३,८२४ |

करण्याकरिता ३) **फोगर्स/ह्युमिडी फायर -** वातावरण नियंत्रित करण्यासाठी ४) **हेअर हायग्रोमीटर -** आर्द्रता दर्शवण्याकरिता ५) **थर्मामीटर -** तापमानाची नोंद ठेवण्याकरिता ६) **ड्रायर -** अळिंबी वाळवण्याकरिता.

## अळिंबी उत्पादनाचे आर्थिक विश्लेषण

वेगवेगळ्या भागात जमीन, कामगार, कच्चा माल, वीज आणि बाजारभाव यांच्या किमतीमध्ये तफावत जाणवत असल्यामुळे सर्व भागातील नफा खर्च गुणोत्तर देणे खूपच अवघड आहे. तथापि मशरूम उत्पादन घेण्यासाठी काही मार्गदर्शक तत्त्वे दिली जाऊ शकतात. धिंगरी आळिंबीचे उत्पादन घेण्यासाठी खूप कमी खर्च येत असून कमी भांडवलावमध्ये हा व्यवसाय सुरू करता येऊ शकतो. धिंगरी अळिंबीचे उत्पादन तंत्रज्ञानसुद्धा अतिशय साधे, सोपे आहे. त्यासोबतच यासाठी पायाभूत सुविधांसाठी जास्त खर्च येत नसल्यामुळे प्रत्येक शेतकऱ्याला हा पूरक व्यवसाय म्हणून निवड करणे फायदेशीर राहील. शास्त्रीय पद्धतीने लागवड केल्यास प्रत्येक पीक ५५ दिवसांच्या कालावधीमध्ये येऊ शकते. तसेच वर्षातून ५ वेळा अळिंबी उत्पादन घेता येऊ शकते.

**तक्ता ०४. उत्पादन व नफा खर्च गुणोत्तर**

| क) | अपेक्षित उत्पादन | खर्च (रुपये) |
|---|---|---|
| | ताजे मशरूम १५०० किलो रु.९०/किलो | १,३५,००० |
| | वाळलेले (Dry) मशरूम १९ किलो रु.७२०/किलो | १३,६८० |
| | एकूण उत्पादन (रुपये) | १,४८,६८० |
| | निव्वळ नफा | १,०४,८५६ |
| | नफा : खर्च गुणोत्तर (B:C Ratio) | ३.३९: १ |

**टीप:** वरील आर्थिक ताळेबंदात वेगवेगळ्या भागातील बाजारभावानुसार बदल होऊ शकतो.

वरील तक्त्यांवरून असे दिसून येते की, बी:सी गुणोत्तर ३.३९: १ धिंगरी मशरूमची लागवड शेतकऱ्यांनी केली, तर खूप फायदेशीर ठरेल. उत्पादन खर्च रु. ४३,८२४/- आहे. एकूण परतावा रु. १,४८,६८०/-. निव्वळ परतावा सुमारे रु. १,०४,८५६/- होता. भारतात दरवर्षी मोठ्या प्रमाणात कृषी कचरा जसे की, सोयाबीनचा भुसा, ऊसाचा पाला, इ. निर्माण होतो आणि त्यातील एक मोठा भाग नैसर्गिकरीत्या कुजण्यासाठी किंवा जाळून टाकला जातो, जर याचा प्रभावीपणे उपयोग करून अत्यंत पौष्टिक अन्न जसे की, मशरूम आणि मशरूम उत्पादनानंतर उरलेल्या टाकाऊपासून खत/वर्मी-कंपोस्टमध्ये रूपांतरित केले जाऊ शकते. मशरूमच्या उत्पादनाकडे फक्त १% कृषी कचरा वळवून, भारत २ दशलक्ष टन मशरूम आणि अंदाजे सुमारे १० दशलक्ष टन कंपोस्ट तयार करू शकतो.

**(लेखक हे साहाय्यक प्राध्यापक म्हणून सौ.के.एस.के.(काकू) कृषी महाविद्यालय, बीड येथे कार्यरत आहेत.)**

**केंद्रीय पर्यटन मंत्रालयाच्या वतीने घेतलेल्या ‘सर्वोत्कृष्ट पर्यटन ग्राम’स्पर्धेत कोल्हापूर जिल्ह्यातील भुदरगड तालुक्यातील ‘पाटगाव’ हे कास्य श्रेणीतील प्रमाणपत्र विजेते महाराष्ट्रातील एकमेव गाव ठरले आहे. नाबार्ड, जिल्हा नियोजन समिती व महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या वतीने पाटगाव मध उत्पादक शेतकरी कंपनी स्थापन करून येथील मध उद्योगाला चालना देण्यात येत आहे.**

# पाटगावच्या मधाचा **जगभर गोडवा...**

**वृषाली पाटील**

पाटगाव परिसरात मधनिर्मिती आणि विक्री उद्योगाला प्रोत्साहन देऊन पाटगावचे मध जगभरात पोहोचवण्यासाठी राज्य शासन आणि प्रशासनाच्या वतीने प्रयत्न होत आहेत.

जिल्हा नियोजन समितीने यासाठी २२६.७१ लाख रुपयांचा निधी मंजूर केला आहे. आतापर्यंत १४९.८२ लाख निधी वितरित केला असून, यातील ३१.७१ लाख रुपये निधीतून मधाचे गाव पाटगाव उपक्रम राबवण्यात येत आहे. यातून मध उद्योगाबरोबरच पर्यटनपूरक व्यवसायांना चालना देऊन पाटगाव परिसराचा सर्वांगीण विकास साधण्यात येणार आहे.

## नावीन्यपूर्ण संकल्पना

सह्याद्री डोंगररांगांच्या पायथ्याशी वसलेले कोल्हापूर जिल्ह्यातील भुदरगड तालुक्यातील पाटगाव हे निसर्गरम्य ऐतिहासिक गाव. कोल्हापूर शहरापासून साधारण ९० किलोमीटर अंतरावर असलेले १,५०२ लोकसंख्या असलेले ३७५ कुटुंब संख्येचे हे गाव. पाटगावचे क्षेत्रफळ १ हजार ५८.७३ हेक्टर आहे. पूर्वीपासूनच मध हे त्याच्या शुद्धतेसाठी आणि आरोग्यदायी गुणधर्मासाठी प्रसिद्ध आहे. पाटगावअंतर्गत शिवडाव, अंतुर्ली, मठगाव, भारमलवाडी, डेळे, चांदमवाडी, मानी, तळी, भटवाडी या परिसरात मधमाशा पालन उद्योग केला जातो. पाटगाव परिसरात वर्षभरात साधारण ८ ते १० टन मध उत्पादन होते. महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या संकल्पनेतून आता ‘मधाचे गाव पाटगाव’ ही नावीन्यपूर्ण संकल्पना या ठिकाणी राबवण्यात येत आहे.

## राष्ट्रीय पातळीवरील विकास

शाश्वत विकासाचा पथदर्शी प्रकल्प राबविणाऱ्या पाटगावची सामाजिक, नैसर्गिक, आर्थिक निकषाच्या आधारे राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड झाली होती. देशातील सर्व राज्ये व केंद्रशासित प्रदेशांतील ७५० हून अधिक गावांमधून केवळ ३५ गावांना हा राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार मिळाला आहे. युनायटेड नेशन वर्ल्ड टुरिझम ऑर्गनायझेशन, युनायटेड नेशन्स एन्व्हायर्नमेंट प्रोग्राम, जी -२०, केंद्रीय पर्यटन मंत्रालय व केंद्रीय वन



मंत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने या गावांचा वर्षभर विकास करण्यात येणार आहे. रुरल टुरिझम इन्स्टिट्युट ऑफ इंडिया ही देशपातळीवरील संस्था देशातील या ३५ गावांचा विकास करणार आहे.

### लोकप्रतिनिधी व प्रशासकीय यंत्रणेचे सहकार्य

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ व जिल्हा नियोजन समितीच्या वतीने 'मधाचे गाव पाटगाव' हा उपक्रम राबवण्यात येत असून याद्वारे ही गावे स्वयंपूर्ण होण्यासाठी प्रयत्न होत आहेत. हा उपक्रम यशस्वीपणे राबवण्यासाठी तत्कालीन पालकमंत्री दीपक केसरकर यांनी प्रोत्साहन देत निधी उपलब्ध करून दिला, तर पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी पाटगावमधील उर्वरित कामांच्या नियोजनासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन देण्याबरोबरच यादृष्टीने ते प्रयत्नशील आहेत. मध विक्री व पर्यटनातून स्थानिकांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेचे उपाध्यक्ष तथा आमदार प्रकाश आबिटकर यांनी सुरुवातीपासूनच या उपक्रमाला प्रोत्साहन दिले आहे. तसेच जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधींनी यासाठी सहकार्य केले आहे. मध उद्योगाबरोबरच या ठिकाणच्या पर्यटनाला चालना देण्यासाठी जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांनी वेळोवेळी बैठका घेऊन सूक्ष्म नियोजन केले, तर जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी श्रीकांत जौंजाळ, नाबार्डचे जिल्हा विकास व्यवस्थापक आशुतोष जाधव, महात्मा गांधी नॅशनल फेलो संदेश जोशी हे या उपक्रमाची अंमलबजावणी करत आहेत. जिल्हा प्रशासन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, नाबार्ड, खादी व ग्रामोद्योग विभाग, महसूल, ग्रामविकास, पर्यटन विभागासह विविध विभागांच्या अधिकाऱ्यांनी यासाठी समन्वयाने काम केले आहे.

### पर्यावरणपूरक शाश्वत विकास

पाटगावसह पाच ग्रामपंचायती एकत्र येऊन शुद्ध व नैसर्गिक मधाची निर्मिती करण्यात येत आहे. सामूहिक सुविधा केंद्र व कृषी उत्पादक कंपनीच्या माध्यमातून या भागाचा विकास साधण्यात येत असून मधाच्या थिमवर गावाचे सुशोभीकरण होत आहे. याठिकाणी माहिती केंद्र, बी-ब्रीडिंग प्रशिक्षण, मधमाशापूरक व औषधी गुणधर्म असलेली वृक्षलागवड करण्यात येत आहे.

### गावे होणार सक्षम आणि स्वयंपूर्ण

पाटगाव परिसरात मधमाशा पालनासाठी नैसर्गिक परिस्थिती अनुकूल आहे. मधाच्या गावाला भेट देणाऱ्या पर्यटक, शालेय विद्यार्थी सहलींना मार्गदर्शनाकरिता भुदरगड तालुक्यात प्रवेशापासून ते मधाच्या गावात पोहोचेपर्यंत व गावाच्या वेशीवर दिशादर्शक फलक; तसेच गावात मधाच्या गावाचा आकर्षक लोगो तर मधपाळांच्या घरावरही नोंदणीकृत लोगो, फलक लावण्यात आले आहेत. अधिकाधिक मध उत्पादकांना प्रशिक्षण देणे, मधपाळांना मधपेट्या देण्यासह आवश्यक कर्जपुरवठा होण्यासाठी प्रयत्न होत आहेत. पाटगावसह शिवडाव, अंतुर्ली, मठगाव, तांब्याची वाडी या ग्रामपंचायतींतर्गत गावांमध्ये मधपाळ तयार करून येथील नागरिकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवण्यासाठी प्रयत्न होत आहेत. 'पाटगाव मध उत्पादक शेतकरी कंपनी'च्या माध्यमातून मध उत्पादक, विक्रेत्यांसह महिलांनाही रोजगार उपलब्ध करून देत मधनिर्मिती, विक्री उद्योग व पर्यटनपूरक उद्योगांतून पाटगावबरोबरच आजूबाजूच्या गावांना स्वयंपूर्ण होण्यासाठी चालना देण्यात येत आहे.

बी- ब्रीडिंगमधून मधमाशांची संख्या वाढवून परागीभवनाची वाढ होण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. पर्यावरणपूरक शाश्वत विकासाला प्राधान्य देत दिवसेंदिवस कमी होणारी मधमाशांची संख्या वाढवण्यासाठी पाटगाव मधाचे गाव ब्रँड तयार करून मधाला योग्य बाजारभाव मिळवून देऊन मध उत्पादकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवण्यासाठी प्रयत्न होत आहेत.




### पर्यटनस्थळांचा विकास

पाटगावमध्ये शिवकालीन संत मौनी महाराज यांची जिवंत समाधी आहे. याव्यतिरिक्त वेदगंगा नदीवर १९९० मध्ये बांधण्यात आलेले पाटगाव धरण म्हणजेच 'मौनी जलाशय'. निसर्गरम्य ठिकाणी असलेला रांगणा किल्ला ही प्रमुख पर्यटन स्थळे पाटगाव परिसरात आहेत. या परिसरातील दुर्लक्षित पर्यटन स्थळांचा विकास होण्यासाठीही उपाययोजना करण्यात येत आहेत. या ठिकाणांना भेट देणाऱ्या पर्यटकांच्या सोयीसाठी कोल्हापूर ते पाटगाव मार्गावर माहिती फलक लावण्यात आले आहेत. तसेच पर्यटन संचालनालयाच्या वतीने पर्यटकांसाठी याठिकाणी न्याहारी व निवासाची व्यवस्था, स्वच्छतागृह आदी सुविधा अधिक दर्जेदार पद्धतीने देण्यात येणार आहेत.

### मार्केटिंगवर भर

पाटगाव परिसरातील २५० मधपाळांना कौशल्यांचे राष्ट्रीय प्रमाणीकरण व सुलभ पतपुरवठा होण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. तसेच १०० मधपाळांना बी-ब्रीडिंगचे प्रशिक्षण देऊन पेटीवाटपातून उत्पन्नाची संधी देण्यात येणार आहे. मध उत्पादक शेतकरी कंपनीमध्ये सहभागी पाटगाव व आजूबाजूच्या पाच ग्रामपंचायतीतील मधपाळांकडून मध उत्पादन करण्यात येत आहे. या मधपाळांना मंडळामार्फत प्रशिक्षण देऊन सेंद्रिय मध संकलन करण्यासाठी स्टेनलेस स्टिल भांडी पुरवण्यात येणार आहेत. मध संकलनानंतर पाटगाव येथे प्रक्रिया युनिट उभारून प्रक्रिया झालेल्या मधाचे लेबलिंग, पॅकेजिंग व ब्रँडिंग करून तो मार्केटींगसाठी उपलब्ध होईल.

### जनजागृतीसाठी प्रयत्न

हवामान व पर्यावरणातील बदलामुळे मधमाशांच्या वसाहती जगवण्यासाठी, त्यांची संख्या वाढवण्यासाठी त्या एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी राज्यांतर्गत व राज्याबाहेर वाहतूक करून घेऊन जाव्या लागतात. यामुळे प्रतिकूल हवामानापासून मधमाशांच्या वसाहतींचे संरक्षण करता येते. वसाहती जगवण्यासाठी त्यांचे स्थलांतर करण्याविषयी मधपाळांना प्रोत्साहन व मदत देणे, स्थलांतराच्या ठिकाणी तंबू उभारणे, वसाहती जगवण्यासाठी साखरपाक देणे अशा उपाययोजना करण्याबाबत जनजागृती करण्यात येत आहे.

### शैक्षणिक अभ्यासाला प्रोत्साहन

पाटगाव येथील सदाहरित जंगलात मधाचे औषधी व उपयुक्त गुणधर्म आहेत. या परिसरातील सातेरी मधमाशांच्या कार्यप्रणालीचा अभ्यास करून इतर ठिकाणच्या मधापैकी पाटगावमधील मध अधिक उत्कृष्ट असल्याबाबत शैक्षणिक अभ्यासाला प्रोत्साहन देण्यात येणार आहे.

### भविष्यातील नियोजन

गावातील नोंदणीकृत मधपाळांकडून मध संकलन करण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात येणार आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने गावाला भेट देणाऱ्या पर्यटकांना मधाची अद्ययावत माहिती उपलब्ध करून देणे, स्थानिक पातळीवर मधपाळांना मधाची शुद्धता व गुणवत्ता तपासणीसाठी पर्यटकांना लाईव्ह डेमो उपलब्ध करून देणे. मध तपासणीसाठी प्रयोगशाळा, प्रोसेसिंग व पॅकेजिंग सुविधा, ब्रॅन्डिंग करून स्थानिक पातळीवर सीएफसी केंद्रामार्फत विक्री केंद्र उभारणे, मधाचे गाव जागतिक नकाशावर येण्यासाठी चांगले रस्ते, दिशादर्शक फलक लावणे व नकाशा रेखांकन करून घेणे. मध आणि मधाचे उपयोग व उत्पादने याबाबत साहित्य पुस्तके, सीडी विक्रीसाठी उपलब्ध करून देणे, मध व मधाची उप उत्पादने तयार करण्यासाठी फॅकल्टीची निवड करून मधपाळांना मधाची उत्पादने तयार करण्याचे प्रशिक्षण देणे व तयार झालेला माल सीएफसी केंद्र, खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत विक्री करणे. गावपातळीवर तयार झालेल्या मालाचे पॅकेजिंग, ब्रँडिंगसाठी मार्गदर्शन करणे. मध संकलन व विक्रीसाठी ने आण करण्यासाठी वाहन व्यवस्था करणे आदी सुविधाही उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासन नियोजन करत आहे.



### हनी पार्क (मध उद्यान)

पाटगावमध्ये मधुमक्षिकापालनाबाबत माहिती देणारे माहिती केंद्र तयार केले आहे. येथे भेट देणाऱ्या नागरिकांना मधाच्या पेट्या, मधनिर्मिती प्रक्रिया पाहता येण्यासाठी लवकरच या ठिकाणी हनी पार्क (मध उद्यान) तयार करण्यात येणार आहे. पाटगावमध्ये सुरू होणाऱ्या सामूहिक सुविधा केंद्रात पाटगाव परिसरात तयार होणाऱ्या मधाचे संकलन प्रक्रिया व विक्री होणार असल्यामुळे येणाऱ्या पर्यटकांना शुद्ध व नैसर्गिक मध व त्यापासून तयार होणारी दर्जेदार उत्पादने खरेदी करण्याची संधी मिळणार आहे. खादी व ग्रामोद्योग मंडळाचे सभापती रवींद्र साठे, तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी अन्शु सिन्हा यांच्या संकल्पनेतून; तसेच सध्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आर. विमला यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवण्यात येणार आहे.

पाटगावमध्ये उत्तम दर्जाच्या मधाचे उत्पादन, प्रक्रिया आणि मार्केटिंगबरोबरच सामूहिक सुविधा केंद्राच्या माध्यमातून मधप्रक्रिया केंद्र, प्रयोगशाळा, प्रशिक्षण व माहिती दालन करण्यात आले आहे. प्रशासन, खादी व ग्रामोद्योग विभागाच्या वतीने पाटगावमधील मधपाळांना मध उत्पादन व विक्रीसाठी आवश्यक ते सर्व सहकार्य करण्यात येणार आहे. या ठिकाणी माहिती केंद्र, सेल्फी पॉईंट, दिशादर्शक फलक; तसेच होम स्टे, हॉटेल, अन्न प्रक्रिया उद्योगाच्या माध्यमातून पर्यटनपूरक व्यवसायांना चालना देण्यात येत असून यामुळे पाटगावचे 'मध' जगभरात पोहोचेल व यातून रोजगारनिर्मिती होऊन या डोंगराळ भागातील गावे आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यास मदत होईल.

माहिती अधिकारी, कोल्हापूर.

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
(३१ मे १७२५–१३ ऑगस्ट १७९५)

# राजमाता

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
## यांना त्रिशताब्दी जयंती वर्षानिमित्त
## विनम्र अभिवादन!

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2018-20
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th Every Month
Date of Publication : 10th of Every Month


सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# लोकराज्य

## अधिकृत-विश्वासार्ह-वस्तुनिष्ठ




### वाचकांच्या प्रतिक्रियांचे स्वागत!

- राज्याच्या जडणघडणीचा बोलका साक्षीदार ठरलेल्या लोकराज्य मासिकाची गुणवत्ता आणि संदर्भमूल्य अधिक वाढविण्यासाठी वाचकांच्या प्रतिक्रिया अत्यंत मोलाच्या आहेत.
- वाचकांनी विधायक सूचना, लेखांवरील अभिप्राय lokrajya2011@gmail.com या ईमेलवर किंवा खालील पत्त्यावर पाठवावेत.
- निवडक प्रतिक्रियांना अंकात योग्य ती प्रसिद्धी देण्यात येईल.

**अंक ऑनलाइन मोफत उपलब्ध**

संकेतस्थळ : https://dgipr.maharashtra.gov.in
आणि https://mahasamvad.in

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

**पत्ता :** उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७ वा मजला, मंत्रालयासमोर,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई ४०००३२.

Visit: www.mahasamvad.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR


प्रति / TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

*If undelivered, please return to:*

प्रेषक / From

**दयानंद कांबळे**
उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट
हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक दयानंद कांबळे, उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी मे. क्वार्टरफोल्ड प्रिंटेबिलिटीज, प्लॉट क्र. बी-८, तळोजा एमआयडीसी, तळोजा महानगर गॅस, पेंढार फाटा जवळ, नवी मुंबई - ४१० २०८ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक : ब्रिजेश सिंह